UNIVERSAL
LIBRARY

OU_192704

UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83·1 T455 Accession No. M 484

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below

# सुगंध

[ कथासंग्रह ]

लेखक
गजानन लक्ष्मण ठोकळ,
बी. ए.; बी. टी.

आवृत्ति पहिली
१९४४

किंमत २। रुपये

प्रकाशक---

दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर

९२९ सदाशिव पेठ, पुणें २

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक—

अनंत विठ्ठल जुवेकर

न्यू टाईम्स प्रिंटरी लि. मुंबई ४.

तीर्थरूप

लक्ष्मण

सखाराम

ठोकळ

यांस

# फुलदाणी


| | | |
|---|---|---|
| १ | सुगंध ... ... | १ |
| २ | ठेंच ... ... | २५ |
| ३ | उडाणटप्पू ... ... | ३६ |
| ४ | म्हातारपणची शिकार ... | ४५ |
| ५ | फटाकडी ... ... | ५७ |
| ६ | वाघाचा डोळा ... ... | ७२ |
| ७ | प्रेमपत्रांची भानगड ... | ८८ |
| ८ | पुणेरी भेळ ... ... | १०४ |

# सुगंध : : : १

कोजागरी पौर्णिमा. रात्रीचे बारा वाजण्याचा सुमार. आकाशाला मधोमध टांगलेल्या झुंबराप्रमाणे चंद्र प्रकाशत होता. शरणपूर गांवात घरोघर जागरणें चालली होती. पत्ते, गंजिफा, मसाल्याचें दूध, कॉफी, नारळ, खडीसाखर याशिवाय दुसरी बात नव्हती. चांदणे व गप्पांचा गलबला यांनी सारें शरणपूर उतूं चालले होते.

भाऊसाहेब मेहेंदळे—शरणपूरचे पोस्टमास्तर–यांच्या घराच्या गच्चीवर पांचसहा शेलकी मंडळी पत्ते खेळत होती. स्वतः भाऊसाहेब गोविंदराव वखारवाल्याबरोबर बुद्धिबळाचा डाव मांडून बसले होते. अंगणातल्या रातराणीचा उग्र सुगंध हवेत घमघमत होता. मसाल्याच्या दुधाचा हला होऊन गेला होता समोरच पानाचे तबक, सिगारेटची पाकिटें व पिकदाणी पडली होती. राखदानात पानाच्या शिरा, देठ, सिगारेटचीं थोटकें व राख साचली होती.

कचेरीत दोनाचे टोले पडले. माथ्यावरून कलंडलेला चंद्र पश्चिमेकडे घरंगळत चालला होता. कोजागरीचा गलका कमी झाला होता. चांदण्याची शुभ्र दुलई पांघरून शरणपूर झोपी जाण्याच्या तयारीत होतें. मंडळी पत्ते खेळून कंटाळली होती. इतक्यात कॉफीचे कप आले. कॉफी पिऊन झाली. कपबशी बाजूला ठेवून बापूसाहेब फडणीस म्हणाले, " भाऊसाहेब, तुमच्या या रातराणीवर आपण बेहद्द खूष आहोत बुवा ! काय वास येतो आहे ! "

" पण आमच्या या गोविंदरावांना रातराणीचा वास मुळींच खपत नाहीं." भाऊसाहेब म्हणाले.

" मला कोणत्याच फुलाचा वास आवडत नाहीं. एवढेंच नव्हे, तर सिगारेटला थोडाफार चांगला वास येतो म्हणून मी आपली विडीच पसंत करतों." गोविंदराव विडी शिलगावीत बोलले.

" हें पहा गोविंदराव, तुम्हीं लाकूड आणि कोळसाच विकावा. या फुलांच्या भानगडी तुमच्यासाठीं नाहींत." पानाला चुना लावीत मुरकुटे फौजदार म्हणाले.

" खरं आहे तुमचं म्हणणं !" गोविंदराव सुन्नपणें उद्गारले.

सुमारें पांच वर्षांपूर्वी गोविंदराव शरणपुरांत आले व त्यानी लाकडांची व कोळशांची वखार घातली. वखारीजवळच दोन खोल्या घेऊन ते आपल्या म्हाताऱ्या मावशीसह राहात होते. ना कुणाच्या अध्यात ना मध्यांत असा त्याचा साधा व सरळ स्वभाव होता. ते सहसा चारचौघांत मिसळत नसत. आपली वखार बरी नी आपण बरे असें त्यांचें धोरण असे. त्यांच्या बोलण्यावरून व वागण्यावरून ते सुशिक्षित व बहुश्रुत असावेत असा कयास होत असे. भाऊसाहेबांना त्याच्याविषयीं का कोण जाणे, पण एक प्रकारचा आदर व आपुलकी वाटत असे. आज त्यांनीं गोविदरावाना फार आग्रह करून आपल्या घरीं जाग्रणासाठी बोलावलें होतें. त्यामुळे मुरकुटे फौजदारानीं वापरलेली भाषा त्याना आवडली नाही.

इतक्यांत भाऊसाहेबांच्या पत्नी बाहेर आल्या. त्याच्या हातात अत्तरदाणी व गुलाबदाणी होती. त्या जिनसा भाऊसाहेबाच्या पुढ्यात ठेवून त्या माघारीं फिरल्या आणि दारांत जाऊन उभ्या राहिल्या. धुराचा एक भपकारा हवेंत सोडून धनवटे वकील पुढे सरकले व त्या जिनसा हातात घेऊन उद्गारले, " अरे वा ! ही नवीन खरेदी दिसते !"

" होय. परवा नाशिकचा एक व्यापारी चादीच्यीं भांडीं घेऊन आला होता. म्हटलं, अशा जिनसा हव्यात आपल्याजवळ. घेऊन टाकल्या झालं." भाऊसाहेब म्हणाले.

" त्यांत गुलाबपाणी आहे, अत्तर आहे, सगळं काहीं आहे. लावा की मंडळींना." पोस्टमास्तरीणबाई दरवाजांतून बोलल्या.

भाऊसाहेब उठले व त्यांनीं मंडळींना अत्तर लावण्यास सुरवात केली. डाव्या मनगटावर उजवें मनगट घाशीत डॉक्टर आफळे म्हणाले, " हा हीना दिसतो हीना ! कां हो भाऊसाहेब, हीना आहे का खस ?"

" हीना." भाऊसाहेब उत्तरले.

मुरकुटे फौजदारांनीं अत्तरदाणीत बचादिशी बोट घातलें व तिच्यांतला अर्धा फाया काढून तो आपल्या कानाच्या बेचक्यांत खुपसला. बोटाचा वास घेत ते म्हणाले, " अहो वखारवाले, या हीन्याला ' नाहीं ' म्हणू नका अं ! " आपण फार विनोद केला या कल्पनेनें मुरकुटे जोरात हसले.

आणि गोविंदराव हीन्याला खरोखरीच ' नाहीं ' म्हणाले ! भाऊसाहेब यांच्यासमोर येऊन उभे राहिले तरी त्यानी हात पुढे केला नाही. ते मान खालीं घालून बसले होते. अर्धे मिनिट थाबून भाऊसाहेब खालीं बसले व त्यानी गोविंदरावांच्या पाठीवर हात ठेवला. गोविंदरावानी वर पाहिलें. त्यांच्या नजरेंत करुणा व गाभीर्य याचे मिश्रण तरळत होतें. ते म्हणाले, " नका, नका हो ! मला नाहीं अत्तराचा वास सहन होत. "

भाऊसाहेबांनीं झाकण टाकून अत्तरदाणी बाजूला ठेवली आणि ते म्हणाले, " गोविंदराव, मला क्षमा करा. आज नकळत मीं तुमच्या दुःखाची खपली काढली. "

" भाऊसाहेब, यात तुमची काहीच चूक नाही. उलट तुमच्या घरीं जमलेल्या मंडळींचा माझ्यामुळं विरस झाला याबद्दल मला फार वाईट वाटतं. यासाठींच मी नको म्हणत होतो; पण तुमचा फारच आग्रह पडला–"

" तें जाऊं द्या. एक गोष्ट विचारूं का तुम्हाला ? "

" विचारा की. " गोविंदराव म्हणाले.

" तुमचं आणि सुगंधाचं इतकं वाकडं का ? "

थोडा वेळ थांबून गोविंदराव उत्तरले, " ती एक लांबलचक गोष्ट आहे. "

" काय गोष्ट ? वा ! मग सुनवा की ! होऊन जाऊं द्या !" मुरकुटे फौजदार बोलले.

गोविंदरावानीं भाऊसाहेबांकडे पाहिलें. भाऊसाहेबांच्या चेहऱ्यावरून उत्सुकता ओसंडत होती. मग त्यानीं वर पाहिलें. आकाशाच्या निळयाभुऱ्या अंगणात जाई–जुई मोगऱ्याचीं इवलीं इवलीं, पाढरीं पांढरीं फुलें विखुरलीं होतीं. पश्चिमेनें आपल्या कपाळीं चंदनाचा ढळढळीत टिळा लावला होता. हवेंत चांदण्याचा गारठा, सिगारेटचा धूंर व रातराणीचा आणि अत्तराचा

वास या गोष्टी कालवल्या होत्या. त्याचे तांबूस व टपोरे डोळे भूतकालात संचार करू लागले. ते घोगऱ्या आवाजात म्हणाले, "ऐका तर !"

× × ×

महाराष्ट्राच्या कोठ्यात, सह्याद्रीच्या फाठ्यात झुंबरगाव नांवाचं एक छोटंसं गाव आहे. गाव भारी गोडस आणि टुमदार ! या गावात माझ्या आयुष्याची विशी उलटली. झुंबरगाव म्हटलं की, ती गावाला बगल देऊन वाहणारी मणिकर्णिकामाई, तिचं ते नितळ निळं पाणी, लाटांनी घोटीव झालेले तिच्या ऐलतीरावरले घाट, तीं घाटावरलीं उंचउंच देवळ, ते प्रशस्त वाळवंट, पैलतीरावरली ती चौगर्दा झाडी, पश्चिमेकडच्या वळचणीतलं ते केवड्याचं किर्र बन—हा देखावा डोळ्यापुढं उभा राहातो. झुंबरगाव म्हणजे निसर्गाचा कमनीय विलास !

झुंबरगावात मी मावशीच्या घरी राहात होतो. आई मला आठवतच नाही. माय मरून उरलेली माझी मावशी मला मायाममता लावीत होती. आजमितीपर्यंत तिच्या ममतेत खळ पडलेला मला आठवतच नाही. मावशीच्या घरीं मावशी आणि मीच. तिसरं कोणी नव्हतं. वडील आफ्रिकेंत नोकरीला होते. दर तीन वर्षांनी तीन महिन्याची रजा घेऊन ते मला भेटण्यासाठी हिंदुस्थानात येत.

त्या सुमारास मी सोळा वर्षांचा असेन. गावात इंग्रजी शाळा होती. मी चवथ्या इयत्तेत शिकत होतों. मावशीचा जरी मला वचक नव्हता तरी मी हूडपणा कधीच करीत नसे. माझा स्वभाव पहिल्यापासून गरीब व एकलकोंडा. मुलांशी मिसळणं मला मुळींच आवडत नसे. आमच्या शाळेतलीं मुलं रोज संध्याकाळीं मणिकर्णिकेच्या वाळवंटात जात व खो खो, हुतूतू वगैरे खेळ खेळत. कुणी घाटावरून पाण्यांत मुरकाड्या मारीत, कुणी वडाच्या झाडावर सूरपारंब्या खेळत, कुणी झाडावर चढून गोन्या व भोकरं या रानमेव्याचा समाचार घेत. मी मात्र लांब कुठंतरी एकटाच फिरायला जात असे.

गांवापासून दूर अंतरावर, मणिकर्णिकेच्या तीरावर वटेश्वराचं एक जुनं देऊळ आहे. देवळाची पडझड झालेली असल्यामुळं या बाजूला कुणाचा फारसा राबता नसे. देवळाच्या भोंवतालीं नाना परीचीं झाडं गर्दी करून

एकमेकाच्या फांद्यात फांद्या मिसळून उभी असत. नदीच्या बाजूला एक उंच डगरीवर चंदनाचं एक जून झाड होत. हे देऊळ म्हणजे माझं फिरायला जाण्याचं आवडतं ठिकाण. देवळाच्या ओरीत बसून गाभाऱ्यातल्या वटवाघळाचा फडफडाट ऐकत बसावं, किंवा आवारात लुसलुशीत गवतावर अंग टाकून फांद्यांवरल्या पाखराची मजुळ किजबीज कानात भरावी, किंवा डगरीवर चंदनाच्या झाडाखाली बसून चाकूनं त्याच्या धपल्या काढून त्या नाकाशी धराव्यात, किंवा मणिकर्णिकेच्या काठच्या रेतीवर रेलून डोळ्याची पाती रोखून लाटाचा पाठशिवणीचा खेळ पहावा हा माझा तेव्हाचा आवडता क्रम असे.

एके दिवशी संध्याकाळी मी असाच वटेश्वराच्या रस्त्यानं चाललो होतो. डाव्या बाजूला घाटावर म्हातारी माणसं गप्पा मारीत बसली होती. मुलं पाण्यात डुंबत होती. उजव्या हाताला शेताची रांग लागली होती. शेताच्या बांधावर मधूनमधून कमलीकमली झाडं होती. हा देखावा नित्य परिचयाचा असल्यामुळे मी खाली मान घालून चाललो होतो. इतक्यात, " शुकशुक ! ए मुला ! ए मुला ! " असं कुणीतरी हाकारल्याचं माझ्या कानी आलं. मी थबकून इकडे तिकडे पाहिलं. शेताच्या बांधावर चाफ्याच्या झाडाखाली एक मुलगी उभी होती. मी तिच्याकडे पहाताच तिनं मला हातानं पालवलं. मी तिकडे वळलो.

ती मुलगी सुमारे अकराबारा वर्षांची होती. तिचा बांधा उंचमडक आणि रंग नागवेलीच्या पिकलेल्या पानागत पिवळा होता. इतकी सुंदर मुलगी मी आमच्या झुबरगावात तरी अजून पाहिली नव्हती. चाफ्याच्या खाली फुलांची पखरण पडली होती. ती मुलगी जमिनीवरली फुलं वेचून आपल्या रेशमी झुळझुळीत परकराच्या ओच्यात गोळा करीत होती. मी जवळ गेलो. तिनं माझ्याकडे पाहिलं नाही. ती माझ्याशी बोलली नाही. चिंचेच्या फोकाप्रमाणं करकर वाकत ती फुलं टिपीत होती. मला भारी कुचंबल्यासारखं झालं. थोड्याच वेळात जमिनीवरली फुलं संपली. ती माझ्याजवळ आली व ओच्यातली फुलं वैरल्यासारखी करून मला म्हणाली, " किती छान वास आहे नाही ? "

॥ होकारार्थी मान हालविली. तिनं मान वर करून एका ढगळीकडे पाहलं. त्या ढगळीवर फुलाचा एक गेदेदार झुंबका होता. त्याच्याकडे बोट दाखवून ती लाघवीपणानं म्हणाली, " मला किनई तो झुंबका हवाय्. माझा हात पुरेचना, म्हणून तुला हाक मारली. चढतोस का झाडावर ? " झाडावर चढणं मला मुळींच माहीत नव्हतं. मी पडलेल्या आवाजात म्हणालों, " मला नाहीं झाडावर चढता येत. "

" हात्तेरी ! " तिनं आपली नापसंती व्यक्त केली. एकवार ओच्यांतल्या फुलांकडे पाहून तिनं पुन्हा मान उंचावली आणि ती म्हणाली, " ती वरचींच फुलं जास्त सुदर आहेत. मला ती हवींतच ! "

तिच्या काळ्याभोर टपोऱ्या डोळ्यातील आर्जव पाहून झाडावर चढण्याचा हिय्या करावा असं मला वाटलं. पण तसा सराव नसल्याने माझे पाय डळमळत होते. आता काय करावं ? तितक्यात मला एक कल्पना सुचली. वा ! युक्ति पण युक्ति !

मी खाली बसलों व त्या मुलीला माझ्या खाद्यावर बसायला सांगितलं. तिनं परकराचा ओचा खोवला व ओच्यातली फुलं अलगद बाजूला सारून ती माझ्या खाद्यावर बसली. दोन्ही हातात तिचे तळवे गच्च धरून मी हळूच उभा राहिलो व म्हणालो, " हं, तोड आतां. "

" उहुं : ! हात नाही पुरत. "

" नाही ? मग असं कर. माझ्या खाद्यावर उभी राहा. सावकाश ह ! "

आपले पाय वर घेऊन ती हळूहळू माझ्या खाद्यावर उभी राहिली. मी दोन्ही हात वर करून तिचे गुडघे धरले. तिने तो झुबका धरून त्याला हिसका दिला. इतक्यात तिचा ओचा ओघळला आणि त्यांतली फुलं माझ्या डोक्यावर आणि अंगावर सांडली. क्षणभर फुलाच्या पावसात उभं असल्या-सारखं मला झालं. तिनं तो झुंबका तोडला व एक एक पाय हलकेच खाली सोडून ती माझ्या खाद्यावर बसली. मी मोठ्या नाखुषीनं खालीं बसलो. माझ्या खांद्यावरलं गोड ओझं दूर झालं. नंतर आम्हीं दोघानीं जमिनीवर सांडलेलीं तीं फुलं गोळा केलीं.

" चल, आपण आतां माझ्या दादांकडे जाऊं."

" कुठं आहेत तुझे दादा ?"

" तिकडे घाटावर."

आम्ही दोघं तिकडे निघालों. चालता चालता तिनें विचारलं, " तुझं नांव काय ?"

" गोविंद. आणि तुझं ?"

" सुभद्रा. पण मला सारीजणं 'शुभा'च म्हणतात."

शुभाचे दादा घाटावर बसून वर्तमानपत्र वाचीत होते. शुभानें त्यांना तीं फुलं व तो झुबका दाखवला आणि सर्व हकीकत सांगितली. दादानीं माझी पाठ थोपटली व माझं नांव आणि घरची माहिती विचारून घेतली. नंतर ते म्हणाले, " छान झालं ! आम्ही झुंबरगावात आलों न आलों तोंच शुभाला एक मित्र मिळाला."

शुभानं पोलक्याच्या कॉलरला खोचलेला सुईदोरा काढला आणि त्या फुलाचा हार करायला सुरवात केली. दादा वाचीत बसले. मी शुभाला फुलं निवडून देऊं लागलो. त्या दिवशीं वटेश्वराकडे जाण्याचं मी अजी विसरलों !

शुभाचे वडील जंगल खात्यात नोकरीला होते. झुंबरगावला त्याची नुकतीच बदली झाली होती. आदल्याच दिवशीं ते कामावर रुजू झाले होते. त्याना वरचेवर फिरतीवर जावं लागे. यासाठी चागला ओळखीचा शेजार असावा अशी त्याची इच्छा होती. आमच्या शेजारीं एक चागलं घर रिकामं होतं. मीं मावशीला सागून तिच्यामार्फत त्याना ते घर ठरवून दिलं. शुभा आमच्या शेजारी राहायला आली

शुभाची आई भारी गोड स्वभावाची होती. मावशीचं आणि तिचं लवकरच मेतकूट जमलं. शुभा एकुलती एक असल्यामुळे आईबापाची फार लाडकी होती. शुभाच्या मराठी चार इयत्ता शिकून झाल्या होत्या. दादानीं तिचं नांव आमच्या शाळेंत इंग्रजी पहिलींत घातलं. आम्ही दोघं बरोबरच शाळेंत जाऊं व परत येऊं लागलों. दादांचा मुक्काम असला तर आम्ही तिघं आणि नसला तर दोघंच फिरायला जाऊं लागलो. थोडयाच अवधींत आमची चांगली गट्टी जुळली.

शुभाला फुलाची फार म्हणजे फारच हौस ! फुलं गोळा कर, तीं कानावर नाहींतर केसांत खोच, त्यांचे गजरे कर व ते हातांत घाल, त्याच्या वेण्या कर नी त्या डोक्यावर घाल, त्याचे सुबक हार बनव अन् ते देवाला घाल, रंगीबेरंगी फुलं फुलदाणात नीट लावून ठेव असं तिचं सारख चाललेलं असे. तिच्या आईनं तर तिचं नाव 'सुगधा' असंच ठेवलं होतं तिचे दादा तिला गमतीनं 'फुलदाणी' तर कधी 'फुलपरी' असं म्हणत. अशी होती शुभा.

घरामागच्या परसात तिनं एक छोटासा बगीचाच तयार केला. रोपं गोळा करण्याचं काम मला कित्येक दिवस पुरवलं. या छोट्या परसबागेंत तिची सारखी काहीं ना काही लुडबूड चाले. मीहि चिखलाशी हुस्त्या खात तिच्या मागंमागं असे.

शुभाला फुलं आवडत; पण ती वासाची, बिनवासाची नव्हत. जाई, जुई, कुंद मोगरा, निशिगध, चाफा, शेवंती, पारिजातक, गुलाब या फुलावर तिचा भारी जीव. कण्हेर, कोरांटी, गुलबस, तरवड ही फुलं ती हातात धरीत नसे. भडक रंगाच्या विलायती फुलांचा तर तिला तिटकाराच वाटे. तिला वेड होतं तें सुगंधाचं–नुसतं फुलांच नव्हे. शुभाची आई देवपूजा करीत असताना शुभा तिथंच रेंगाळत राही. उदबत्ती आणि कापूर याचा सुगध तिला तिथून हालूं देत नसे.

एके दिवशी मी मोठ्या प्रयत्नान हिरव्या चाफ्याचं एक फूल पैदा केलं व ते तिला नेऊन दिलं. ती किती वेळ तरी ते फूल हुंगीत होती. फूल हुंगताना तिच्या पातळ नाकपुड्याची फुलपाखराच्या पखाप्रमाण होणारी नाजुक हालचाल मी टक लावून पहात होतो त्या फुलाचा दिवसभर आस्वाद घेतल्यावर तिने ते आपल्या कपड्यात ठेवून दिलं. बकुळ–सोनचाफ्याची फुल, गुलाबाच्या पाकळया नी केवड्याच्या पाती आपल्या कपड्याच्या घड्यांत ठेवण्याची तिला भारी खोड. त्यामुळे शुभा ही एक चालती बोलती बहरलेली फुलवेल वाटे. शुभा घरांत आहे किवा नाहीं हें विचारावच लागत नसे मुळीं ! हवा सागत असे सारं काही.

शुभाला खूष ठेवण्यासाठीं कोणती चूष काढावी यासंबंधीचे विचार माझ्या डोक्यात विनाखंड चालत. उन्हाळ्याची ऊब हवेंत वावरूं लागली

म्हणजे मी तिला आबराईत फिरायला नेत असे. मोहोराच्या मादक सुवासानं ती एखाद्या हरिणीप्रमाणं बेभान होई. पावसाळयाचा भर ओसरून श्रावणातला ऊनपावसाचा खेळ सुरू झाला की, उघाडीच्या दिवशी आम्ही केतकीच्या बनाकडे फिरायला जात असूं. त्या पिवळयाधमक कणसाच्या सुगंधानं शुभा एखाद्या नागिणीप्रमाणे धुंद होई आणि खऱ्याखुऱ्या नागिणींची तमा न धरता मी वनात शिरून तिच्यासाठी एखादं कणीस तोडून देत असे. (झाडावर चढण्याची मी अलीकडे सवय केली होती.) या गोष्टीची परतफेड करण्यासाठी म्हणून की काय शुभा त्या केवड्याच्या पानांत काताची भुकटी घालून कातवड्या तयार करी व या सुगंधी कातवड्याचे विडे मला नेहमी खायला मिळत.

एका सुट्टीच्या दिवशी मी एकटाच वटेश्वराकडे गेलो आणि त्या चंदनाच्या खोडावर माझ्या चाकूनं बराच वेळ मेहनत करून 'शुभा-गोविंद' अशीं आमची नांवे कोरली. संध्याकाळी शुभाला घेऊन मी त्या ठिकाणीं गेलो व तिला माझी कामगिरी दाखवली. मला वाटलं, शुभा आनदान नाचायला लागेल. पण तसं काही न करतां ती एकदम गंभीर झाली. मुलांपेक्षा मुलींना जास्त अक्कल असते असं म्हणतात ते काही खोटं नाही. शुभा सकारण गंभीर झाली. आणि मला मात्र ती गंभीर होण्याचं कारण त्या वेळी लक्षांत आलं नाही.

मध्यंतरी माझे बाबा रजा घेऊन आफ्रिकेतून आले. त्यांची व शुभाच्या दादांची चांगलीच मैत्री झाली. शुभा तर त्याना फारच आवडली. त्यांनीं तिचे खूप लाडलाड केले. तीन महिन्याचा मुक्काम संपवून बाबा परत जायला निघाले तेव्हा आमच्या घरातल्याप्रमाणे शेजारच्या घरींहि फार वाईट वाटलं.

दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने व सालामागून साल सरकत होतं. यौवनानं शुभाच्या हृदयाला स्पर्श केला आणि सांगितलं, 'हें बघ, मी आलो आहे!' तिच्या परकराची जागा पातळान घेतली. ती अधिकाधिक सुंदर दिसूं लागली. फुलांच्या समूहात वावरणारी शुभा फुलांबरोबर स्पर्धा करूं लागली. लज्जा ही यौवनाची सख्खी बहीण. तिची संगत माझ्या शुभाला बाधूं लागली. मीं तिच्यासाठीं गोळा केलेलीं फुलं माझ्या हातांतून

घेणं तिनें बंद केलं. माझ्या कोटावर ती फूल खोवेनाशी झाली. आमच्या मनमोकळया गप्पांना खंड पडूं लागला. भाषेवर औपचारिकपणाच्या पंजाची पकड बसली. दादांचा मुक्काम असला तरच शुभा आमच्याबरोबर फिरायला येई. दादाच्याबरोबर आमचं फिरणं फिरतीवर जाऊं लागलं.

मी मॅट्रिकच्या वर्गात गेलों. अभ्यासाच्या निकडीसंबंधीं बाबाचं मला खूप खरपूस पत्र आलं. निरनिराळया विषयाच्या शिकवण्या सुरू झाल्या. मींहि मनावर घेतलं. झाडाची जागा मास्तरानी घेतली. पुस्तकांनी फुलाना खो दिला. आपण होऊन मागं सरकणाऱ्या शुभाला अभ्यासानं आणखी मागं सारलं. मी मॅट्रिकची परीक्षा पास झालो

मावशीला फार आनद झाला. तिने गावभर पेढे वाटले. पेढे घेऊन शुभाची आई मावशीला म्हणाली, "पेढे दिलेत, पण लाडू कधी देणार?"

"देऊं, देऊं. लाडूहि आता दूर नाहींत." मावशी म्हणाली.

परिक्षेंतल्या यशाची गोड निशाणी मला स्वतः शुभाच्या हातात ठेवण्याची इच्छा होती. पण खश्याळ शुभा अलीकडे माझ्या वाऱ्यालाहि उभी राहात नसे. अखेरीस मी तिला एकटीला गाठलं आणि तिच्या हातात दोन पेढ ठेविले. ती हसत हसत म्हणाली, "म्हटलं, आम्हाला एकदा मिळालेत पेढे."

"हो. पण हे माझ्या हातचे आहेत."

"हो खरंच! आणि म्हणून हे जास्त गोड लागतील. होय ना?"

मी काहीच उत्तर न देता स्तब्ध राहिलो. शुभा ते पेढे हातांत चाळवीत उभी होती. जराशानं मी म्हणालो, "शुभा."

"काय?"

"हें बघ ."

शुभानं वर पाहिलं. एके काळी शुभासमोर एकसारखी वळवळणारी माझी जीभ आता शब्दाशब्दाला अडखळत होती. "तुझी फुलाची–सुगंधाची हौस मी काही दिवस थोडीफार पुरवली. पण अलीकडे तूं पहिल्यासारखी वागत नाहींस. त्यामुळें मीं तुझ्यासाठीं आणलेलीं फुलं आमच्या घरींच सुकून जातात."

" पण त्या फुलाचा वास मला आमच्या घरीं येतो. "

शुभाच्या या बोलण्याचा अर्थ मला समजला नाही. पुढं काहींतरी बोलायचं म्हणून मी बोललों, " आता हे पेढे दिलेत ना मीं तुला, त्याना चव आहे; पण सुगंध नाही. "

" खोटं ! " शुभा उसळून म्हणाली.

" म्हणजे ? " मी आश्चर्यानं विचारलं.

" या पेढ्यांमध्ये सर्व फुलाचे सुगंध एकवटले आहेत. " शुभा माझ्या-पुढून लगबगीनं निघून गेली.

या खेपेला बाबाना आफ्रिकेला जाऊन तीन वर्षे होऊन गेलीं होतीं. माझ्या परिक्षेच्या निकालासाठीच ते खोळंबले होते. निकाल समजतांच ते रजा घेऊन हिंदुस्थानात आले. पास झाल्याबद्दल त्यानी माझी पाठ थोपटली. शुभाचे दादा आणि ते जुन्या मित्राप्रमाणे भेटले. शुभासाठीं आणलेले कपडे व अत्तराच्या कुप्या त्यानी तिला दिल्या. दोन्ही घरांत आनंदीआनद झाला. माझ्या आनंदावर बरीक फारच लौकर विरजण पडलं. मला लगेच आफ्रिकेला घेऊन जाण्याचा आपला मनोदय बाबानीं मला सांगितला. माझ्या पुढील शिक्षणाची अगर नोकरीची तिकडेच काहीतरी सोय करावी असा त्याचा विचार होता.

आफ्रिकेला जाण्याचा विचार मला कसासाच वाटला. शुभाला सोडून जाण्याची कल्पना मला सहन होईना. मी खिन्न झालो. माझं कशांतच लक्ष लागेना. वटेश्वराजवळच्या चंदनाच्या झाडाखाली मी दिवसाचा जास्तींत जास्त वेळ काढूं लागलो. त्यात पुन्हा भोवतालच्या माणसाची वागणूक मला चमत्कारिक वाटू लागली. शुभाचं तोंड तर राहोच, पण पदराच टोकहि दिसण्याची मारामार पडू लागली. मावशी व शुभाची आई सदान् कदा एकमेकींच्या कानातोंडाला तोंडकान लावून बसत. बाबा व शुभाचे दादा माडीला माडी लावून नेहमीं कुजबूज करीत. बाकीच्या वेळात बाबा व मावशी यांच्यामध्ये कसली तरी चर्चा चाले. मला पाहिलं कीं, या सर्व कानगोष्टी, कुजबुजी नी चर्चा बंद पडत. मी बुचकळ्यांत पडलों. हें कोडं कांहीं मला सुटेना !

पण मला पडलेलं हें कोडं रेशमासारखं मऊ, खडीसाखरेसारखं गोड आणि गुलाबासारखं सुगंधी आहे असं मला लौकरच कळून चुकलं. माझं आणि शुभाचं लग्न ठरत होतं. ठरत होतं नव्हे, तर ठरलं ! शुभा आणि मी वाचादत्त वधूवर झालो. दोन दिवसांनी माझी आफ्रिकेला उचलबागडी होणार होती. तीन वर्षांनी आम्हीं बापलेकानी हिंदुस्थानात परत यावं आणि मग लग्नाचा समारंभ करावा असं ठरलं. मावशीनं झुंबरगावातून बिऱ्हाड हालवायचं ठरवलं. शरणपूर गावांत तिच्या माहेरची शेतवाडी होती; तिकडे जाऊन राहायचा तिचा विचार होता.

झुंबरगाव सोडण्याच्या आदल्या दिवशी शुभाच्या दादानी आम्हां सर्वांना जेवायला बोलावलं. आम्ही जेवायला बसलो. शुभा दडून बसली होती. ती बाहेर निघेना. शेवटी सर्वांच्या आग्रहाखातर ती वाढायला आली. पहिला भात संपला. मसाल्याच्या भाताचं वाढप झालं. तोहि संपला. नंतर सुधारस व पुऱ्या आल्या. पुरीचा तुकडा मोडून मी तो सुधारसाच्या वाटीत बुच-कळला; इतक्यात शुभा आमटी घेऊन आली. मी तिच्याकडे पाहिलं. ती श्रमानं नव्हे तर लज्जेनं घामाघूम झाली होती. इतक्यात बाबा म्हणाले, "काय लबाड पोर आहे ही ! आम्हाला वाढायला अगोदर गोविंदालाच वाढते !"

शुभाच्या हातून आमटीचं भाडं निसटलं नी खाली पडलं ! माझ्या पानावरल्या सुधारसांत आमटी कालवली गेली !

दुसऱ्या दिवशीं अश्रुपूर्ण नयनानी मी सर्वांचा निरोप घेतला व झुंबरगांव सोडलं. माझ्या लग्नाची काळजी मिटल्यामुळे बाबा आनंदात होते. मला मात्र आफ्रिकेला पोचेपर्यंत समुद्राच्या हरएक लाटेत आणि ढगाच्या हरएक ढिगात शुभाचा गोरामोरा चेहरा दिसत होता. आमची बोट किनाऱ्याला लागली. आम्ही मोंबासामधे पाऊल टाकलं. बाबा आपल्या कामावर रुजू झाले ते ज्या व्यापारी फर्ममधे नोकरीला होते त्याच फर्ममध्ये त्यानी मला नोकरीला लावून घेतलं.

बाबांची व शुभाच्या दादाची पत्रापत्री सुरू झाली. मींहि शुभाला लिहिण्याचं ठरविलं. एक सुंदर सेंटची बाटली खरेदी करून मी ती शुभाला पाटवली व सोबत एक छोटं पत्र धाडलं. बऱ्याच दिवसांनीं मीं उत्तराची

खूप वाट पाहिल्यानंतर शुभाकडून मला एक छोटेखानी पार्सल आलं. फक्त पार्सल...पत्राच नाव नाही ! त्या पार्सलमधे उशीचा एक अभ्रा होता. त्याच्यावर चारहि बाजूनी सुंदर फुलं व वेलबुट्टी विणलेली होती. मध्यभागीं दोनच शब्द होते...' शुभा-गोविंद. ' चार पानाच्या पत्रानं मला जे उत्तर मिळालं नसतं ते त्या दोन शब्दात होतं. तो अभ्रा मीं उशीवर चढवला. त्याला मी पाठवलेल्या सेंटचा घमघमाट येत होता रोज गाढ झोपणारा मी...पण त्या रात्रीं त्या अभ्र्यावर डोकं ठेवून पडल्यावर मला मुळीसुद्धा झोप आली नाही !

दोन वर्षे लोटली. नोकरींत व परदेशी वातावरणात मी चांगलाच रुळलों होतों. शुभाच्या दादाची बाबाना नियमान पत्रं येत. शरणपूरहून मावशीचं एखादं पत्र मधूनमधून येई. इतक्या दिवसात शुभाकडून मात्र एकहि ओळ आली नाहीं. तो उशीचा अभ्रा जीर्ण होऊन त्याचे धागेधागे निघाले होते. मी तो तसाच माझ्या पेटीत जपून ठेवला होता.

एके दिवशी बाबानी शुभाच्या दादाच नुकतच आलेलं पत्र मला दाखवलं. आपण खूपच आजारी असल्याच त्यानी लिहिलं होतं. त्यानंतर कित्येक दिवसात त्याचं पत्र आलं नाहीं. बाबानी बरीच पत्रं लिहिलीं; पण एकाचंहि उत्तर आलं नाही. त्यामुळे आम्ही अत्यंत काळजींत होतों. एके दिवशी अचानकपणे बाबाच्या नावाच हिंदुस्थानातून एक पाकीट आलं. त्यात शुभानं लिहिलेलं पत्र होतं. मजकूर अगदी त्रोटक होता. तिचे वडील वारले होते. मॅट्रिकच्या वर्गामधून तिनं शाळा सोडली होती. तिचे मामा घरची व्यवस्था पहात होते.

ते पत्र वाचून आम्ही बापलेक अत्यंत दुःखी झालों. शुभाला एक मामा असल्याचं मला ऐकून माहीत होतं; पण मी झुंबरगांवला असताना ते तिथं कधीच आले नसल्यामुळे मी त्याना पाहिलेलं नव्हतं.

हिंदुस्थान सोडल्याला तीन वर्षं झाली. या सुमारास आमचं लग्न व्हावं असं ठरले होतं. पण आता परिस्थिति बदलली होती. बाबानी शुभाच्या आईला एकदोन पत्रं टाकलीं; पण महिनेन् महिने लोटले तरी उत्तर आलं नाहीं. बाबांना हरिणकाळजी लागली. त्यांची प्रकृतीहि गेल्या काही दिवसांपासून ठीक नव्हती. या एकंदर प्रकारानं आमचं स्वदेशीं जाणं

लांबणीवर पडत चाललं होतं. उघड्या वाळूवर पडलेल्या माशाप्रमाणं मी तळमळत होतों.

आणखी कांहीं दिवस गेले. बाबाची प्रकृति जास्तच खालावत चालली. अखेरीस त्यांनी रजा घेतलीः व अंथरूण धरलं. प्रथम नोकरी करून मी त्यांची शुश्रूषा करीत असे; पण पुढं मीहि रजा घेतली व त्याच्या उशागतीं व पायागती बसूं लागलों.

अवचित एके दिवशीं शुभाचं मला पत्र–पहिलं पत्र–आलं. आफ्रिकेला येऊन जवळजवळ चार वर्षे झालीं होती. या चार वर्षात शुभाचं मला बोटभरहि पत्र आलं नव्हतं. मी पाकीट फोडून तें पत्र आधीरपणानं वाचलं. त्या पत्रानं माझ्या काळजाचा ठाव घेतला. शुभानं तें अश्रूंच्या शाईनं लिहिलं होतं. तिची आई अंथरुणाला खिळली होती. दादा वारल्यापासून ती खंगतच चालली होती तिच्या डोळ्यादेखत शुभाचं लग्न व्हावं असा मामाचा आग्रह होता. आमचं लग्न ठरल्याची वगैरे सर्व हकीकत शुभाच्या आईनं मामाना सागितली होती; पण मामाना हा प्रकार पसंत नव्हता. झुंबरगावांत नवीनच प्रॅक्टिस करायला आलेल्या एका डॉक्टरांचं स्थळ त्यानीं शुभासाठीं पसंत केलं होतं. त्याच्या हटवादापुढं शुभाच्या आईचं कांहीच चालत नव्हतं ! आणि शुभाच्या संमतीचा प्रश्नच नव्हता मुळीं ! पत्राच्या शेवटीं मीं तावडतोब हिंदुस्थानात यावं अशी शुभानं आग्रहाची सूचना केली होती.

तें पत्र वाचल्यावर गरुडाचे पंख लावून हिंदुस्थानांत जावं असं मला वाटलं. पण माझे पाय बाबाच्या बिछान्याला बांधले होते. विचार करकरून माझं डोकं हिदहिदून गेलं. शेवटीं वडिलाच्या अखेरच्या सेवेला अंतर न देण्याचा मीं निर्धार केला. अंतराळीं लागलेल्या त्यांच्या नजरेला मीं तें पत्रहि दिसूं दिलं नाहीं.

सुमारें एक महिन्यानं बाबांच्या नावानं शुभाच्या लग्नाची कुंकुमपत्रिका आली. ती पत्रिका पाहून माझ्या पायांखालची भुई सरकली. बाबानीं ती पत्रिका वाचली. ते काहींच बोलले नाहींत. एकवार करुण नजरेनं माझ्या-कडे पाहून त्यांनीं माझ्या पाठीवरून हात फिरवला. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं,

आपला सर्व कारभार आटोपला ! एकाच वेळीं शुभा बोहल्यावर आणि बाबा सरणावर चढले.

जगातल्या साऱ्या संकटानी माझ्यावर झडप घातली ! बाबाचं छत्र नाहीसं झालं. शुभा दुसऱ्याचा संसार करूं लागली. मी सडाफटिंग झालो. एकटाच जीव-मग नोकरीची उस्तवारी तरी कशाला ? बाबानी माझ्यासाठीं मूठभर माया ठेवली होती. नोकरीवर पाणी सोडून मी बाहेर पडलो. पण आता जायचं कुठं ? कांहीं दिवस मीं वेड्यासारखे आफ्रिकेतल्या जंगलात काढले. नंतर तिकडचा कंटाळा आला. काळ्या खंडातून मी माझ्या तपकिरी देशात आलों. या गावाहून त्या गावी याप्रमाणे मी हिंदुस्थानांतली कित्येक ठिकाणे फिरलों. फाटलेल्या पतंगाप्रमाणं माझी स्थिति झाली होती.

बाबाचं दुसरं वर्षश्राद्ध घातल्यानंतर माझ्या पायावरचा भोवरा स्थिर झाला. जवळची पुंजी ओसरत आली होती. एकवार मावशीला भेटावं आणि तिच्या सल्ल्यानं कांहीतरी उद्योगधंदा करावा असे विचार माझ्या मनात येऊं लागले. कुठंतरी स्थाइक होऊन काहीतरी करण्यापूर्वी एकवार शुभाला डोळे भरून पहावं अशी मनानं उचल घेतली. माझे पाय झुंबर गांवाकडे ओढ घेऊं लागले. शुभाची एकदा—फक्त एकदाच—गाठ घ्यायची. तिच्याशीं दोन—फक्त दोनच-शब्द बोलायचे. मी हरिणटप्प्यानं झुंबरगांवाकडे निघालों.

गजाभाऊ सात्राळकर नावाचा माझा एक शाळामित्र झुंबरगावांत नुक-ताच वकिली करूं लागला होता. तो कॉलेजमध्ये असताना त्याचं एखाददुसरं पत्र मला आफ्रिकेला येत असे. त्याच्याकडे उतरायचं मी ठरवलं. शुभाला देण्यासाठी तऱ्हेतऱ्हेच्या अत्तराच्या व सेटच्या बाटल्या खरेदी करून मीं झुंबरगावच्या परिसरात पाय टाकला.

मला पाहून गजाभाऊला फार आनंद झाला. त्यानें माझी वास्तपुस्त केली. माझी हकीकत ऐकून त्याला फार वाईट वाटलं. मी कोणत्या हेतूनं झुंबरगांवीं आलों याचा मात्र त्याला पत्ता लागूं दिला नाहीं. त्याच्या घरीं मी खूप मोठा मुक्काम करावा आणि भरपूर विश्रांति घ्यावी असा त्यानें मला मनापासून आग्रह केला. झुंबरगांवला विश्रांति घेण्याची कल्पना मला

निवडुंगाच्या फणीप्रमाणं बोचली. पण गजाभाऊच्या विनंतीला नुसती मान डोलावण्यापलीकडे मी दुसरं काय करणार होतो ?

दुसऱ्या दिवशी सकाळी मी अगदी साधे कपडे चढवले; 'लिली' असं नाव असलेली एक सेंटची बाटली उघडली, हातरुमालावर तो सेंट भरपूर ओतला; तो रुमाल कोटाच्या वरच्या खिशात ठेवला आणि घराच्या बाहेर पडलो. डॉक्टर तिडके याच्या नावाची पाटी शोधीत मी गावातल्या प्रमुख रस्त्यानी भटकू लागलो. लग्नपत्रिकेतल डॉक्टाचं नाव माझ्या स्मृतिफलकावर तापवलेल्या साडशीनं कोरलेल होतं. थोडा वेळ हिंडल्यावर मला ती पाटी दिसली. मी जिना चढून वर गेलो.

डॉक्टर वर्तमानपत्र वाचीत खुर्चीवर बसले होते. दवाखान्यात पेशंटच्या नावानं शुकशुकाट होता. मी त्याना नमस्कार केला व समोरच्या खुर्चीवर बसलो. अकाली पिकलेले केस, डोळयाना जाड भिंगाचा चष्मा, खोल गेलेले गाल, पुढं आलेले दांत व किडकिडीत शरीर असा डॉक्टर तिडके याचा संच होता. मला शुभाची कीव आली. डॉक्टरानीं वर्तमानपत्र बाजूला ठेवून माझ्याकडे न्याहाळून पाहिलं आणि मला विचारलं, "गावात नवीनच दिसता तुम्ही. तुमच नाव काय ? कुठून आला ? कुणाकडे उतरला ? काय दुखतंय् ?"

त्याच्या प्रश्नाच्या सरबत्तीला मी-"गोविंद अतरकर, आफ्रिकेहून आलों, गजाभाऊ सात्राळकराकडे उतरलो व छाती दुखते." अशी अनुक्रमानं उत्तरं दिली.

ते खुर्चीवरून उठले व माझ्याजवळ आले. नाक मुरडून ते म्हणाले, "हा वास कसला हो ?"

"सेंटचा." मीं उत्तर केल,

"छाती दुखते म्हणता आणि सेंट वापरता ? कमाल आहे तुमची ! बर, जीभ बाहेर काढा; नाडी पाहूं; कोटाच्या गुंड्या काढा; हं, सदरा वर करा; श्वास घ्या; म्हणा, एक, दोन......"

तपासणी संपली. कपाळाला आठ्या घालून डॉक्टर गंभीरपणें म्हणाले, "हे पहा, रोगाचं तसं कांहीं स्पष्ट लक्षण दिसत नाही. पण तुम्हाला हार्ट

डिसीझ-हृदयाचा रोग-असावा, असं मला वाटतं. बरं व्हायचं असेल तर इंजेक्शन्स घ्यावीं लागतील. आतां घेतां एक इंजेक्शन ? लगेच सुरवात केलेली बरी !"

मी मान डोलावली. डॉक्टरानीं इंजेक्शन दिलं. मी त्यांच्या हातावर साडेचार रुपये टाकून बाहेर पडलों. साडेचार रुपयाची किंमत देऊन मीं त्याचा दवाखाना आणि घर हीं निरनिराळी ठिकाणे आहेत ही माहिती खरेदी केली.

आता डॉक्टराचं घर कसं शोधायच ? कुणाला विचारायचे तर नाही. गावात नुसतं भटकून काहींच उपयोग नव्हता. इतक्यात मला आठवलं. तो श्रावण महिना होता. दर श्रावणी सोमवारला सोमेश्वराच्या देवळात मोठी पूजा होई. पूजेसाठी चार गाड्या गुलाबाचीं फुलं येत. फुलानीं गाभारा आणि सुगंधानं आवार टाकोट क भरून जाई. देऊळ गावालगतच होतं. दर्शनासाठी येणाऱ्या बायकामाणसानी सध्याकाळच्या वेळी देऊळ गच्च भरून जाई दर श्रावणी सोमवारी या देवळातली शुभाची फेरी कधीच चुकत नसे. गाभाऱ्याच्या दारीं उभी राहून त्या भरगच्च गुलाबाच्या फुलाचा सुगंध मनमोक्त लुटणाऱ्या शुभाची ती बालपणची मूर्ति माझ्या डोळयापुढं उभी राहिली. उद्या श्रावणी सोमवार, आणि तोहि सरता ! पूजा मोठी होणार नि शुभा हटकून तिथ येणार !

दुसऱ्या दिवशी ऐन दुपारीच मी घराबाहेर पडलो आणि सोमेश्वराच्या देवळाकडे वळलो. श्रावणपहाळीची बुरबुर चालली होती. देवळाच्या आवारात काही चिंचेची झाडं होती. मी एका झाडाखाली जाऊन उभा राहिलो. खडा पहारा करीत मला फार वेळ उभं राहावं लागलं. चार वाजण्याच्या सुमारास पूजा सुरू झाली. गाभाऱ्यातल्या गुलाबाच्या फुलाचा धुदकार पावसाच्या तुषारामधून वाट काढीत साऱ्या आवारात घुमूं लागला. सोमेश्वराच्या आसमंतात जणूं काय गुलाबपाण्याचा शिडकावा होत होता.

रस्त्याकडे पाहून पाहून माझ्या डोळ्यातल्या बाहुल्याना रग लागली होती. अखेरीस मंद गतीनं येणारी शुभा मला दिसली. बैंगणी रंगाचं एक साधं पातळ तिच्या अंगावर होतं. तिचा चेहरा पाढुरका आणि डोळे

निस्तेज दिसत होते. गबाळेपणानं बांधलेल्या तिच्या अंबाड्यावर वेणी तर नव्हेच, पण साधं फूलहि नव्हत! निर्माल्यांतल्या फुलाची कळा आलेल्या शुभाला पाहून माझा माझ्या डोळ्यावर विश्वासच बसेना. तीच का ही शुभा?

आजूबाजूला कोणी माणसं नव्हती. गर्दी व्हायला अजून अवकाश होता. शुभा खालीं पाहून चालत होती. तिचं लक्ष माझ्याकडे आलं नाहीं. मी खोडाला बांधल्याप्रमाणं जागींच उभा राहिलों. देवळाच्या पायऱ्या चढताना तिनं सहज मान वळवली. माझ्यावर नजर पडताच ती थबकली. एक मिनिटभर ती जादूनं भारलेल्या पुतळीप्रमाणं स्तब्ध होती. नंतर तिनं मान वळवली व ती देवळात शिरली.

घरून निघताना एक चिठ्ठी लिहून मी ती खिशात ठेवली होती. शुभा जर न बोलली तर चिठ्ठीचा उपयोग करायचा असं मी ठरवून ठेवलं होतं. मनाचा हिय्या करून मीं देवळात शिरलो. शुभा प्रदक्षिणा घालीत होती. मी देवाचं दर्शन घेतलं व तिच्या मागोमाग निघालो मी तिच्या मागे आहे याची तिला जाणीव होती, पण तिनें मान वळवली नाही. चिठ्ठी व जीव मुठीत धरून मी तिला गाठलं आणि ती तिच्या हातातल्या रिकाम्या झालेल्या तादळाच्या फुलपात्रात टाकली. लगेच मी देवळाच्या बाहेर सटकलो. त्या चिठ्ठीत एकच ओळ होती— 'उद्या दुपारीं चार वाजता तुझी वाट पहात मी चंदनाच्या झाडाखाली थांबतो.'

दुसऱ्या दिवशी दुपारी मी त्या अत्तराच्या व सेंटच्या बाटल्या खिशांत घातल्या, परवाच्या बाटलीतलं शिल्लक राहिलेलं लिली सेंट रुमालावर ओतून तो वरच्या खिशात ठेवला आणि बाहेर पडलों. गावाबाहेर पडून मी वटेश्वराच्या रोखानें निघालों. वटेश्वराजळ जाताच माझ्या मनाला धक्का बसला! मी डोळे फाडून पहातच राहिलो! माझं आवडतं चंदनाचं झाड मला दिसेना! मी धावतच पुढे गेलो. त्या चंदनाच्या झाडाच्या फाद्या इतस्ततः पडल्या होत्या. काहीं फाद्याचे कापून तुकडे तुकडे केलेले दिसत होते. खोड बरीक उभं होतं. लहानपणीं चाकूनें केलेली कामगिरी मी शोधू लागलों. पण खोडाची साल ठिकठिकाणी निघून गेली होती. आमच्या प्रेमाची निशाणी— तीं जोडीनें लिहिलेली नांवं सालीबरोबर सोलली गेलीं होतीं. जमिनीवर पडलेल्या एका फादीवर मी बसून राहिलो.

थोड्या वेळानें शुभा आली. कालच्या मानाने आज तिचे कपडे नीटनेटके होते; पण तिचं डोकं फुलाशिवाय ओकं होतं. माझ्यासमोर पडलेल्या एका फांदीवर ती बसली. थोडा वेळ कुणीच काहीं बोलल नाहीं. बाळपणच्या आठवणी उधाणाच्या लाटाप्रमाणे आमच्या डोक्यात गर्दी करीत होत्या. जराशाने शुभा म्हणाली, " कशाला आलात इथ ? "

" तुला भेटायला. "

" जेव्हा यायचं तेव्हा नाहीं आलास ! आता येऊन काय उपयोग ? "

मीं तिला त्या वेळीं न येण्याचं कारण सांगितलं. बाबाच्या मृत्यूची खतमी ऐकून ती हळहळली. मी तिच्या आईची विचारपूस केली. मांडवपरतणं झाल्यावर तिसऱ्याच दिवशीं तिच्या आईची राख मणिकर्णिकेच्या पात्रात पडली होती. माझ्याप्रमाणेच तीहि त्याच वेळीं पोरकी झाल्याचं तिने मला सांगितलं. प्रेमळ पितराच्या आठवणींनी आम्हा दोघांचेहि डोळे आसवांनीं डवरले. थोड्या वेळाने मी म्हणालो, " शुभा, या चंदनाच्या झाडाप्रमाणेच आपल्या प्रेमाची स्थिति झाली. "

" माझ्याच नशिबात सुख नाहीं, त्याला कोण काय करणार? तूं लग्न करशील, मजेत राहाशील. तुम्हां पुरुषाना काय ! की केलंस तूं लग्न ? "

" गोविंद आणि शुभा याची लगीनगाठ बसता बसता निसटली. आता माझ्या पुढ्यात अंतरपाट धरला जाणार नाहीं. " मीं माझा निश्चय तिला सांगितला.

" असला वेडेपणा करण्यात काय अर्थ आहे ? तुला बायकोची हौस नसेल, पण मला वहिनीची हौस आहे ना ! "

" वहिनी ? " मी चमकून विचारलं.

" होय वहिनी. गोविंद, तं आता माझा भाऊ नव्हेस का ? मला आता जगात कोण आहे ? दादा गेले, आई गेली. माझं वाटोळ करून मामानें इथून काळं केलं ! तुझ्यासारखा भाऊ दुनियेच्या पाठीवर कुठं तरी आहे यातच मला आता समाधान आहे. "

शुभानें माझ्यावर लादलेला भाऊपणा मला कबूल करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. ती आतां दुसऱ्याची होती. तिच्याविषयी विकारवश भावना जवळ

बाळगणं मला उचित नव्हतं. ती मला चटदिशी 'भाऊ' म्हणून गेली; पण मला मात्र तिची 'ताई' बनवायला बरंच जड गेलं.

शुभाला तिच्या नवऱ्याकडून त्रास होत असावा हें मीं एकंदर प्रकारावरून जाणलं होतं. तिच्या लांबसडक रेशमी केशपाशाकडे पहात मी म्हणालों, "शुभा, वेणी नाही दिसत तुझ्या डोक्यावर ?"

"मीं फुलं घातलेलीं त्याना मुळींच आवडत नाहीत." शुभा खिन्नपणें म्हणाली.

"का ?" मीं विचारलं.

कांहींच उत्तर न देता ती स्तब्ध राहिली. मग मी माझ्या खिशातून अत्तराच्या व सेंटच्या कुप्या बाहेर काढल्या व म्हणालो, "हे बघं, मीं तुझ्यासाठीं काय आणलंय् !"

त्या कुप्याकडे एकवार हपापलेल्या नजरेनें पाहून तिनें मान खालीं घातली. "मी अत्तर वापरलेलंहि त्याना खपत नाही."

मी मुकाट्याने त्या कुप्या खिशात ठेवून दिल्या; उठून तिच्याजवळ जाऊन बसलो; आणि तिच्या खांद्यावर हात ठेवला. जबर हादरा बसलेल्या वेलीप्रमाणें ती कोलमडली व तिने माझ्या खांद्यावर मान टेकली. तिच्या पाठीवरून हात फिरवीत मी उद्‌गारलो, "ताई !"

थोडा वेळ कुणीच कांहीं बोललं नाही. मी शुभाकडे पाहिलं एखादं भुकेलं वासरू आईच्या कासेला चिकटतं ना-तशी शुभा माझ्या वरच्या खिशातून बाहेर डोकावणाऱ्या रुमालावर नाक टेकून भारल्याप्रमाणे स्वस्थ होती. जराशानं तिनं तो रुमाल बाहेर काढला व आपल्या नाकाला लावला.

"भाऊ, त्या अत्तराच्या कुप्या मी घेतल्या नाहीत म्हणून रागावू नकोस. हा हातरुमाल मी घेते. तुझी आठवण म्हणून मी हा मरेपर्यंत जवळ बाळगीन."

तिने तो रुमाल आपल्या चोळींत ठेवून दिला व ती उठून उभी राहिली. "जातें मी. हीच आपली शेवटची भेट !" असं म्हणून ती झपझप चालायला लागली व थोड्याच वेळात दिसेनाशी झाली. मीहि उठलों व हळूहळू चालत गांवाकडे निघालो.

रात्रीं अकराचा सुमार. मी गजाभाऊच्या ओसरीवर झोंपलों होतों. स्वप्न पडत होतं मला—

शुभा व मी–आम्ही दोघं केवड्याच्या बनाच्या कडेला उभी होतो. बन चिकार फुलल होतं कणसाच्या भारानं फाद्या गदरून गेल्या होत्या. बनाला मक्याच्या शेताची विपुलता आली होती. कणसाचा मादक सुगंध नाकात शिरून केसाच्या मुळापर्यंत पोचत होता. कणस हातालगत नव्हती. मी एका झाडावर चढलो. शुभा त्या झाडाखाली उभी राहिली. पिढरीएवढं एक कणीस पाहून मी त्याला हात घातला आणि ते तोडणार इतक्यात माझ्या पायाला मऊमऊ कायसं लागल. मीं चमकून पाय उचलला. तो काळा कुळकुळीत नाग होता ! त्यानं चवताळून माझ्यावर झेप घातली, पण ती चुकली; आणि तो खाली पडला. फुस्स करून त्यानं केवड्याच्या कणसा-सारख्या शुभाच्या पिढरीला विळखा घातला आणि—

मी मोठ्यान किंकाळी मारून उठलो ! मला दरदरून घाम आला होता. गजाभाऊ दार उघडून ओसरीवर आला. “ का रे गोविंदा ? काय झालं ?”

“ माझ्या तोंडातून शब्द फुटेना ! इतक्यात बाहेरचं दार ठोठावल्याचा आवाज आला. गजाभाऊनं दाराची कडी काढली. घोगऱ्या आवाजात शब्द आले, “ तुमच्याकडे आफ्रिकेहून आलेले कुणी पाहुणे आहेत ना ?”

“ होय. ” गजाभाऊ उत्तरला.

“ उठवा त्याना. माझं त्याच्याशी जरा काम आहे. ”

“ जागेच आहेत ते. ” गजाभाऊ म्हणाला.

मी बिछान्यावरून उठलो. गजाभाऊने दिव्याची वात वर केली. दरवाजात डॉक्टर तिडके उभे होते. मला उद्देशून ते म्हणाले, “ कपडे घाला आणि माझ्याबरोबर चला. ”

मी कपडे घातले आणि त्याच्याबरोबर निघालो. मला त्याना विचारण्याचा धीर झाला नाही आणि तेहि काही बोलले नाहीत आम्ही मुकाट्यान रस्त्यानं चाललो होतो.

डॉक्टर एका घरापुढे थांबले व त्यानीं दार उघडलं. त्यांचंच घर होतं तें. मी त्यांच्या मागोमाग घरात शिरलो. माझी विचारशक्ति बधिर झाली होती. डॉक्टरानी एका खोलीचं दार उघडलं. एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें मी त्यांच्या मागोमाग त्या खोलीत शिरलो. दिवा ढणढण जळत होता. कसल्याशा उग्र वासानं खोली भरून गेली होती. डॉक्टरानीं माझ्याकडे पाहिलं व पलंगाकडे बोट दाखवलं. पलंगावर शुभा अगदी शांतपणानं झोपली होती. मला कांहीं उमज पडेना ! हा आहे काय प्रकार ?

इतक्यात पलंगाजवळच्या तिवईकडे माझं लक्ष गेलं. त्या तिवईवर माझा हातरुमाल होता. डॉक्टराना वाचा फुटली. " हा हातरुमाल तुमचा होय ना ? "

" होय. "

" त्या सेंटच्या वासावरूनच मी तो ओळखला. तुमचा हार्टडिसीझ हा असा होता तर ! तुम्ही माझ्या बायकोला कधी भेटला ? कुठं ? "

मीं काहीच उत्तर दिलं नाहीं. डॉक्टराच्या बोलण्यानें शुभा अजून जागी कशी होत नाहीं याचंच मला आश्चर्य वाटत होतं ! डॉक्टर पुढे म्हणाले, " चोरूनमारून झालेली भेट तो ! पुरी पडली नसेल. भेटा आता पोटभर. "

डॉक्टर खोलीच्या बाहेर गेले आणि त्यानी दार लावून घेतलं मी पलंगाजवळ गेलो आणि शुभाचा हात हातात घेतला. बर्फासारखा थडगार होता तो ! मी तिच्या नाडीवर हात ठेवला आणि गुडघे टकून तिच्या कुशीवर डोकं टेकलं आणि लहान मुलासारखा रडूं लागलो. शुभाची व माझी दुपारी झालेली भेट खरोखरीच शेवटची ठरली !

शुभा गेली खरी; पण कशानं ? काही क्षणापूर्वी ती झोपेत आहे असेच मी समजत होतों. मी ताडदिशी उठून उभा राहिलो व शुभाकडे न्याहाळून पाहू लागलो. तिच्या डाव्या गालावर बोटाच्या खुणा उमटलेल्या होत्या. तिच्या दंडावर हिरवेनिळे वळ होते. पारिजातकाच्या फुलाप्रमाणे नाजूक व पवित्र असलेल्या शुभावर तिच्या नवऱ्यानें हात टाकला होता. पण हें असं झालं कशानें तिवईवर माझ्या रुमालाजवळ एक बाटली होती; तिच्याकडे माझं लक्ष गेलं. मीं ती उचलली व तिच्यावरचं नांव वाचलं. क्लोरोफॉर्मची रिकामी बाटली

होती ती ! मीं माझा रुमाल उचलला व हुंगला. लिली सेंटच्या सुगंधाऐवजीं माझ्या नाकात क्लोरोफॉर्मचा उग्र सुगंध शिरला !

एका क्षणात सर्व प्रकार माझ्या लक्षांत आला ! नवऱ्यानं केलेला आरोप व दिलेला मार सहन न होऊन शुभाने आपण हाऊन आपल्या आयुष्याचा अंत केला होता. माझा हातरुमाल मरेपर्यंत जवळ बाळगण्याचं तिनं मला दुपारी वचन दिलं होतं. तोच रुमाल तिच्या मृत्यूला दुहेरी कारण झाला ! मरेपर्यंतच नव्हे, तर मरताना व मेल्यावरहि तो रुमाल तिच्या नाकावरच होता. आणि सुगंधाची आत्यंतिक हौस असणाऱ्या शुभानं सुगंधानं येणारं मरण स्वेच्छेनं पत्करलं होतं.

हलक्या पावलानी डॉक्टर खोलींत आले व मला म्हणाले, " हे पाहा मिस्टर, झाला हा प्रकार एकंदरीनं वाईट झाला ! पण त्याला आता काही इलाज नाहीं. गेल्या गोष्टी विसरणं आता भाग आहे. कारण पुढील कार्याला ताबडतोब लागल पाहिजे. आता बारा वाजून गेले आहेत. उजाडायच्या आत सर्व काही आटोपलं पाहिजे. "

घुमिल्या नजरेनं डॉक्टराकडे पहात मी वेधळ्याप्रमाणें विचारलं, " म्हणजे ? मला नाही समजलं ! "

" तुम्हाला ते कस समजेल ? उद्या सकाळपर्यंत हे प्रेत माझ्या घरात राहिलं तर पोलीस येतील, पंचनामा होईल आणि खुनाच बालंट माझ्यावर येईल. तुम्ही मात्र करून सवरून नामानिराळे ! "

" बरं मग ? "

" मग काय ? मी सरळ तुमच्याकडे बोट दाखवीन. माझ्यावर काही एक जबाबदारी नाही यातून सुटायचं असेल तर एवढं हे निस्तरा म्हणजे बस्सं झालं ! बाकीचं मी पाहून घेईन. चला, लागा व्यवस्थेला. "

मी मुकाट्यानं बाहेर पडलो व गजाभाऊच्या घरी गेलो. तो अजून जागाच होता. मी त्याला सर्व हकीकत सांगितली. गजाभाऊनं पडवींत झोपलेल्या आपल्या कारकुनाला जागं केलं व त्याला काहींतरी सांगितलं. कोटटोपी घालून कारकून लागलीच बाहेर पडला.

मीहि गजाभाऊला घेऊन बाहेर पडलों. एका माळ्याच्या घरीं जाऊन आम्हीं त्याला उठवलं व त्याच्याजवळ होतीं नव्हती तेवढी फुलं खरेदी

केली. नंतर एका वाण्याला उठवून आम्ही त्याच्या दुकानांतून कापूर व उदबत्त्या विकत घेतल्या आणि घरी परत गेलों. वहिनी गजाभाऊची पत्नी जाग्याच होत्या. त्याना घेऊन आम्ही डॉक्टरच्या घरीं गेलों.

वहिनींनी स्टोव्ह पेटविला आणि पाणी तापत ठेवलं. गजाभाऊ कारकुनाची वाट पहात दरवाजात बसून राहिला. डॉक्टर आपल्या खोलीतून बाहेर आले नाहींत. मी शुभाजवळ बसून राहिलो.

पाणी तापलं. कारकून आला. आम्ही शुभाला उचलून चौकात ठेवलं. वहिनींनीं तापलेलं पाणी बादलीत ओतलं. मीं खिशातल्या सर्व कुप्या त्या पाण्यात रिकाम्या केल्या. वहिनींनीं शुभाला स्नान घातलं व कपडे नेसवले. आम्हीं तिला उचलून बाहेरच्या ताटीवर ठेवलं.

गजाभाऊने डॉक्टराना हाक मारली व त्याना शिकाळं धरण्याची विनंती केली. त्यांनीं ते साफ नाकालं व घराचा दरवाजा लावून घेतला. आम्हीं वहिनीना घरीं परत जाण्यास सांगितलं; पण त्या ऐकेनात. गजाभाऊचा कारकून शिकाळं घेऊन पुढे निघाला. वहिनींनी फुलाची टोपली खांद्यावर घेतली. मी पुढे व गजाभाऊ मागे अशी आम्हीं ती ताटी उचलली व वंटेश्वराच्या रस्त्याने चालूं लागलो. शुभाच्या ओळखीची सुरवात माझ्या खांद्यावर झाली होती आणि शेवटहि माझ्या खांद्यावरच झाला !

आम्हीं वंटेश्वराजवळ पोंचलो तेव्हा उगवतीला किंचित् उजवूं लागलं होतं.

आम्ही सर्वांनी चंदनाच्या झाडाची लाकडं भराभर गोळा करून मणिकर्णिकेच्या वाळवंटात चिता रचली. माझ्या आवडत्या चंदनानं माझ्या शुभाला शेवटींहि अंतर दिलं नाहीं.

चितेवर फुलं पसरून आम्ही शुभाला वर ठेवलं. मी चितेवर कापूर पसरला, उदबत्त्या पेटवून लावल्या व चितेला अग्नि दिला.

दुसऱ्या दिवशीं मी झुंबरगांव सोडले.

*　　*　　*

मावळत्या चंद्राच्या खिन्न चादण्यात गोविंदरावाची गोष्ट संपली. सर्वजण अत्यंत शांतपणें त्याची गोष्ट ऐकत होते. मुरकुटे फौजदारांना मात्र केव्हाच

झोप लागली होती. कोणीच काहीं बोलले नाहीत. भाऊसाहेबांनीं मुरकुट्यांना हालवून जागे केले. मुरकुटे डोळे चोळीत चोळीत उठले व म्हणाले, "वा! छान होती अ गोष्ट! अगदीं झकास!!"

डॉक्टर आफळे म्हणाले, "चला. जाऊं."

मंडळी मुकाट्याने उठून घरी निघाली. जिना उतरतां उतरता मुरकुटे म्हणाले, "गोविंदराव, आम्हाला आज एक कोळशाचं पोतं पाठवून द्या अं! विसरूं नका."

"कोळसा!" गोविंदराव उद्गारले.

★

## ठेंच : : : २

दुपार टळेपर्यंत आकाशात ढगाचा शितोडाहि दिसत नव्हता. संध्याकाळीं कोठून कोण जाणे, पण चोरपावलानी ढग गोळा झाले; आणि हां हा म्हणता वळवाची सर कोसळूं लागली. फिरायला निघालेल्या लोकाची ही त्रेधा-तिरपीट उडाली!

आपल्याला आंघोळ करायला वेळ लागतो ना! तितकाच वेळ ती सर बरसली. ढग आले तसे गेले. पुन्हा सगळे पूर्ववत्! जणू काय सर आली होती की नाही!

सहामाही परिक्षेच्या अभ्यासाने शिदूचे डोके कलकलत होते; म्हणून तो फिरण्यासाठी बाहेर पडला होता. अवचित आलेल्या वळिवाचा फटकारा चुकविण्यासाठी तो एका झाडाच्या अडोशाला उभा राहिला. वळीव थांबतांच तो रंकाळा तलावाच्या रस्त्याने पुढे चालूं लागला. चालता चालतां त्याच्या डोक्यात विचार सुरू झाले.

'निसर्गाची काय गंमत आहे! मघाचा पाऊस आता नाहीं. आजची थंडी उद्या नसते. उद्याचे ऊन परवां नसतें. निसर्गांत हा असा एकसारखा

बदल होत जातो. आणि अवचित गोष्टी तरी किती होतात! अगाऊ सूचना न देता वादळ येतें. डोळयाचें पातें लवतें ना लवतें तोंच वीज लवते. कल्पना नसतांना धरणीकंप होतो. बिऱ्हाड उचलायला अवधि न देतां ज्वालामुखी आग ओकूं लागतो. आतांची ही सरच पहा ना. किती अवचित आली! निसर्ग व माणूस याचा भारी निकटचा संबंध आहे, म्हणे. मग माझ्या आयुष्यात असे बदल कां होत नाहीत? लोकाच्या आयुष्यात होतात असे लोक सागतात. पण मला त्याचें काय होय! माझा आला दिवस मागील पानावरून पुढे चालू, असे का? तेच कॉलेज, तेच प्रोफेसर, तीच बी. ए. चीं पुस्तके, तीच खोली आणि तीच खाणावळ!...'

शिदूचे वडील साताऱ्याला राहात असत. शिदू मॅट्रिक झाल्यावर त्यानीं त्याला पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला ठेवले होतें. तो राजाराम कॉलेजमध्ये शिकत होता.

**शिदू या नांवाचें समीकरणः—**

श्रीधर = श्री + धर

श्री = श + री

श्रीधर − ( र + र ) = शीध

शीध − इ + ऊ = शिधू

बोलताना धू चा दू करतात.

∴ ( एतदर्थ ) शिदू

**शिदू या व्यक्तीचें समीकरणः—**

सर्व साधारण चेहरा — दाढी व मिशा ( बोडल्यामुळें ) + डोक्यावर केस ( टेवल्यामुळे ) + चार पाच फुटकुळया + थाडासा गंभीरपणा ( बावळटपणाच्या सदरात मोडणारा ) = शिदूचा चेहरा.

पपलिनचा सदरा ( मळका ) + रिपकॉर्डाचा कोट ( बिन इस्तरीचा ) + फिनले मिलचें पातळ धोतर ( ताबूस रंग चढलेलें ) + बनातीची टोपी + चपला ( कोल्हापुरी ) = शिदूचा पोषाख.

**शिदूचा चेहरा + शिदूचा पोषाख = शिदू ही व्यक्ति.**

**शिंदूचे राजकीय विचारः—** गांधी म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. पण त्याचें पुष्कळ वेळा चुकतें. हिंदुस्तानला स्वराज्य मिळायला पाहिजे, ही गोष्ट खरी, पण स्वराज्य म्हणजे काही परसातला भाजीपाला नाहीं. ते सावकाशपणें कधीं तरी मिळेल.

**शिंदूचे सामाजिक विचारः—** समाजात सध्या ज्या गोष्टी चालल्या आहेत, त्या बदलल्या पाहिजेत. पण समाज हा अनादि कालापासून सारखा बदलत आला आहे. तरी याहि गोष्टी बदलतील. काळजी करण्याचें काही कारण नाहीं.

**शिंदूचे प्रेमविषयक विचारः—** स्त्री ही प्रेम करण्यासाठीं आहे. तरी पुरुषाने प्रेम हे करायलाच पाहिजे. सहवासजन्य प्रेम हें केव्हाहि चांगलेंच! पण प्रथमदर्शनी प्रेमहि काही वाइट नाही. एकदरीत काय कीं,

प्रेमाशिवाय लग्न = शुद्ध घोडेपणा

लग्नाशिवाय संसार = शुद्ध गाढवपणा

∴ प्रेमाशिवाय संसार = शुद्ध (!) खेचरपणा.

**शिंदूचें ध्येयः—**प्रश्नचिन्ह, कारण अजून ठरलेलें नाहीं.

अशा प्रकारचा शिंदू तशा प्रकारचे विचार करीत रंकाळयाच्या कडेनें चालला होता.

कोणत्याहि गोष्टीत एकतान होऊन बाकीच्या गोष्टी विसरणें हें शिंदूच्या स्वभावांतलें वैशिष्ट्य होते. 'निसर्गात होणारा फेरबदल' या विषयात त्याची इतकी तंद्री लागली होती की, त्याला पुढचे काहीं दिसत नव्हतें; मागचे काही कळत नव्हते.

संध्याकाळचा अंधार, ओबडधोबड रस्ता आणि शिंदूची लागलेली तंद्री याचा समन्वय होऊन त्याला एक झकारेशीं ठेच लागली. अशी ठेच लागली की यंव्! निसर्गातले वादळ, विजा, धरणीकंप व ज्वालामुखी या सर्व गोष्टी अवचित एकत्र झाल्याचा त्याला भास झाला. 'अग आई ग!' असें किंचाळून तो मटकन् खालीं बसला. त्याच्या उजव्या पायाचा अंगठा रक्तबंबाळ झाला.

शिदूच्या पाठीमागून हळूहळू चालणारी निमा धावतच पुढें गेली आणि म्हणाली, "काय झालं हो?"

शिदूच्या डोळ्यांपुढें तारे चमकत होते. त्यापैकीच हा एक तारा असावा, असे वाटून तो गप्प बसला. इतक्यात निमाचें लक्ष त्याच्या पायाकडे गले. अंगठ्यांतून रक्ताची धार वाहात होती.

निमा चटदिशी पाण्याजवळ गेली. रंकाळयाचे पाणी तिनें आपल्या ओंजळींत भरून आणले आणि शिदूच्या अंगठ्यावर त्याची धार धरली. झंपरच्या खिशातून आपला छाटेखानी हातरुमाल काढून तिने तो त्याच्या अंगठ्याला बांधला.

"आतां बरं वाटतय् ना?" तिने विचारले.

"अं! होय, बरं आहे आता."

"चालता येइल का?"

"अ! हो, बघतो."

शिदू उठूं लागला; पण लगोलग अगठ्याला कळ येऊन तो खाली बसला-

"थाबा, इतक्यात नका उठूं. आपण बसू थोडा वेळ." निमा त्याच्या. जवळ बसून राहिली.

जराशाने त्याच्या वेदना कमी झाल्या. आपल्या कॉलेजमध्ये प्रीव्हियसमध्ये आलेली निर्मला साठे आपल्याजवळ बसाली आहे, याची त्याला जाणीव झाली. मघाच्या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडले निसर्गातच वळवाची सर येते, असं नाही. अधुक अंधारात त्याच्या चेहऱ्यावर हसू खेळूं लागले. निमा (निर्मला - र् - ला + आ = निमा) त्याला म्हणाली, "चल् या ना आता?"

शिदूने मान हलवली. तो उठूं लागला. निमाने त्याला हात दिला. दोघेहि हळूहळू चालूं लागले. निमा व शिदू याची नजरओळख होती. प्रीव्हियसच्या नवीन तापयातील सुंदर मुलगी म्हणून शिदूने निमाला मनातल्या मनांत हेरून ठेविले होते. हातात पुस्तकाचें ओझे घेऊन बी. ए.च्या वर्गांत शिरणारा एक विद्यार्थी म्हणून निमा त्याला ओळखीत होती.

"कोणी तरी आवडत्या माणसानं तुमची आठवण केली असावी." निमा शिदूला म्हणाली.

"कशावरून ?" शिदूनें चमकून विचारलें.

"त्याशिवाय गुचकी किंवा ठेच लागत नाहीं."

आवडतें माणूस जर रोजच्या रोज इतक्या जोरानें आठवण करूं लागलें, तर आटोपलाच कारभार!"

शिदूच्या या कोटीक्रमानें निमाला चांगलेंच हंसू आलें. शिदू पुढें म्हणाला, "पण मला आवडतें असं कोणीच माणूस नाहीं."

"म्हणजे तुमच्या घरी कोणीच नाहीं ?"

"तशी पुष्कळ माणसें आहेत. आई आहे. वडील आहेत. बहीण आहे. भाऊ आहे."

"मग राहिले कोण ?—अगबाई ! खरंच !"

शिदूला काय म्हणावयाचें होतें, ते निमाला समजलें. दोघेहि जण मोकळे-पणानें गप्पा मारीत गावात आले. शिदूची खोली जवळ आली. तो म्हणाला, "ही माझी खाली. या ना कधी तरी. आता आपली ओळख झालीच आहे."

"हो. येईन की ! आणि तुम्हीहि आमच्याकडे नेहमीं यायला पाहिजे. अंबाबाईच्या देवळामागें शेळक्याच्या वाड्यात आम्ही राहातों. याल ना ?"

"हो. अगदीं एका पायावर !"

"दुसऱ्या पायाला ठेच लागली, म्हणून कीं काय ?"

दोघहि हसू लागलीं. 'अच्छा' करून निमा निघून गेली.

शिदू खोलीत शिरला. त्यानें टोपी काढली नाहीं की, कोट काढला नाहीं. त्याला जेवायला जाण्याची सुद्धा आठवण झाली नाहीं. पायाची आग मस्तकाला जाते, असें म्हणतात. पण ही म्हण शिदूच्या बाबतींत अगदी खोटी ठरली. त्याचा अंगठा चांगलाच ठेचला होता. त्याची आग आग होत होती. पण अमृताचा शिडकावा झाल्याप्रमाणें त्याचें डोकें थंड व शांत होतें. वळवाची सर ! वळवाची सर !!

पहाटेच्या साखरझोपेंत त्याला एकसारख्या ठेंचा लागत होत्या. निमाच्या खिशांतून हातरुमाल भराभर बाहेर निघत होते. ते हातरुमाल त्याच्या अंगठ्याला एकामागून एक गुंढाळले जात होते. त्याच्या अंगठ्याचा वरवंटा होऊं लागला होता.

इतक्यात आकाशात वळीवाचे ढग गोळा झाले. त्या ढगामधून एक परी खालीं उतरली आणि तिने आपल्या रेशमी बोटानी शिदूला गुदगुल्या केल्या. तो जागा झाला.

शिदूनें आपल्या अंगठ्याकडे पाहिले आणि त्याच्यावरून—नव्हे, त्या रुमालावरून—अलगत बोटे फिरवलीं. त्याने तो रुमाल सोडला. खूप साबण लावून त्यानें तो स्वच्छ धुतला; त्याची घडी केली व तो ट्रंकेच्या तळाशीं ठेवून दिला. तो रुमाल निर्मलेला परत करणे ठीक नाही, असे त्याने ठरविले.

शिदूला एकदम आठवण झाली. काल निर्मलेनें आपल्यासाठी इतकी तसदी घनली ! आपण तिच्याशीं बोलत बोलत गावात आलो. पण आपण तिचे आभार मानायला अजिबात विसरलो ! तिला काय वाटले असेल ? छे, अगदी शुद्ध घोडेपणा झाला !

दुपारच्या वेळी तो निमाच्या घरीं गेला. निमाने त्याचे स्वागत केले; अंगठ्याची विचारपूस केली; आणि आतल्या घरात जाऊन चहा सांगितला. कालच्या प्रसंगानें त्याच्यामधली भीड चेपली होती; संकोचाला मुरड पडली होती. शिदूनें थकलेले आभार मानून टाकले. दोघानीं चहा घेतला. त्याच्या पैस गप्पा सुरू झाल्या. नंतर ते दोघे स्टेशनच्या बाजूनें पुढे जाणाऱ्या निपाणीच्या रस्त्याने फिरायला गेले.

दुसऱ्या दिवशीं शिदूच्या आग्रहावरून निमा त्याच्या खोलीवर गेली. चहापाणी झालें. गप्पासप्पा झाल्या. नंतर ते दोघे जुन्या राजवाड्याच्य रस्त्यानें फिरायला गेले.

आग लागायचा अवकाश कीं, ती हां हा म्हणतां भडकत जाते. तरुण स्त्रीपुरुषांची ओळख झाली कीं, ती सारखी वाढत जाते. आग भडकल्यावर ती काय स्वाहा करील, याचा कांहीं नेम नसतो. तरुणतरुणींची ओळख दाटल्यावर ती कोणत्या पल्ल्याला पोंचेल, हें सांगता येत नाहीं.

शिदू दोन दिवस भेटला नाहीं कीं, निमाला रुखरुख लागे. निमा एक दिवस दिसली नाहीं कीं, शिदू बेचैन होई. प्रेम आणि वेड वाढायला उशीरच लागत नाहीं.

नाताळच्या सुट्टीत शिदू साताऱ्याला गेला नाहीं. 'बी. ए. ची परीक्षा जवळ आली आहे. अभ्यासाचे डोंगर पडले आहेत' वगैरे सबबींचें एक लाबलचक पत्र त्याने आपल्या वडिलाना पाठविले. तें पत्र वाचून आणि शिदूला लागलेली अभ्यासाची निकट पाहून त्याच्या वडिलाना हायसे वाटलें.

निमाचे वडील धड जुन्या वळणाचे नव्हते नी धड सुधारकहि नव्हते. मुलींना माफक स्वातंत्र्य असावे, असे त्याचें मत होते. पण शिदूचा रागरग पाहून तो आपल्या मुलीच्या बाबतीत तावडा कंदील ठरणार नाहीं, असें त्याचें मत झाले. साहजिकच निमाला जास्त स्वातंत्र्य मिळूं लागले.

शिदू व निमा सकाळ संध्याकाळ हिंडायला जाऊं लागले. त्याचा दुपारचा वेळ पत्ते किंवा कॅरम खेळण्यात जाऊं लागला. रात्रीच्या वेळीं सिनेमाला जाण्याचा बूट निघूं लागला. नाताळ त्यानी अगदी 'ना-ताळ' घालवला.

नवीन वर्ष सुरू झाले. संक्रातीच्या दिवशी तिळगुळाची देवघेव झाल्यावर शिदूने जिवाचा धडा केला आणि निमाजवळ मुद्याची गोष्ट काढली. गोड बोलण्याची हमी त्याने तिच्याकडून अगोदरच घेतली होती. निमानें त्याला साखरसंमति दिली. कॉलेजच्या उंबऱ्यावरून लग्नाच्या बोहल्यावर चढण्याचें तिने त्याला वचन दिले. शिदू साखरेच्या पाकात घोळका गेला. त्याच्या अंगावर काटे उभे राहिले.

निमा थोडे फार वाचीत असे. शिदूच्या अभ्यासाचा मात्र खेळखंडोबा चालला होता. निमाची परिक्षा अगोदर झाली. तिचे पेपर बरे गेले. प्रीव्हियसची परिक्षा पास होणे पोरीना अवघड जात नाही. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत परिक्षेचा निकाल लागला ती पास झाली. शिमग्याच्या सुमारास शिदूनें बी. ए. च्या परिक्षेचे पेपर लिहिले.

परिक्षा संपल्यावर शिदू काहीं दिवस कोल्हापुरातच राहिला. पंचगंगेच्या घाटावर दोघाच्या पुन्हां एकदां आणा-शपथा झाल्या. शिदू साताऱ्याला गेला.

लग्नाचा मोसम सुरू झाला. यंदा निमाला उजवून टाकावें, असें तिच्या वडिलानीं डोक्यात घेतलें. लग्नाच्या बाजारांत तिचा भाव घटूं नये, म्हणूनच त्यांनीं तिला कॉलेजमध्ये घातलें होतें. अलीकडचीं वडील माणसे पोरासोराना स्वतंत्रपणे वागायला मुभा देतात. याचा अर्थ, त्याची लग्नें त्यानीं ठरवावींत, असा मात्र ते करीत नाहींत. यंदा कर्तव्य असलेले एक स्थळ त्यानीं निमासाठीं हेरून ठेविले होते. घरात कसलीच वाच्यता न करता त्यानीं त्या गृहस्थांना एक दिवस घरीं बोलावलें.

त्या गृहस्थाचे नाव वसंतराव असे होते. ते तिच्याच कॉलेजमध्ये फेलो होते. ( प्रोफेसर × $\frac{1}{2}$ = फेलो किंवा निमप्रोफेसर ) निमाची व त्याची चागलीच ओळख होती. दिसण्यात उमार, बोलण्यात हुषार, खेळण्यात झुंजार व स्वभावानें दिलदार असे वसतराव सर्वांना प्यार होते.

वसंतराव आपल्याला 'पहायला' आले आहेत, हें समजताच निमा फार गोंधळली. वडिलानीं हाक मारताच तिला बाहेर जाणे भाग होते. वसंतराव तिच्याकडे पाहून हसले. तिलाहि हसावें लागले. ते बोलू लागले निमाहि बोलूं लागली. जरा वेळाने वसंतरावनी तिला लग्नाच्या बाबतीत विचारलें. तिला विचार करायला सवड मिळाली नाही, आणि तिने ती मागून घेतली नाहीं. तिनें होकार दिला.

शिदूला साताऱ्याला एक एक दिवस जड जात होता. उन्हाळयाचा मे महिना त्याला अगदीं वैराण गेला. आईबापाची धास्ती असल्यामुळे पत्रापत्री करूं नये, असे निमाचे व त्याचे ठरले होते. त्यामुळे काही इलाज नव्हता. ट्रंकेच्या तळाशीं ठेवलेला निमाचा हातरुमाल काढून तो त्याला कुरवाळीत बसे. एखादे वेळी तो त्याच्यावर सेंट शिंपडी, मधून मधून त्या घडींत गुलाबाच्या पाकळ्या ठेवी.

मे महिना संपला. आता मात्र शिदूला राहवेना. वडिलाच्या तोंडावर एक सबब टाकून तो कोल्हापूरला जाणाऱ्या मोटारीत बसला.

कोल्हापूरला आल्याबरोबर प्रथम तो निमाच्या भेटीला गेला. ओसरीवर निमाचे वडील बसले होते. त्यानीं शिदूचे स्वागत केले, "या हो श्रीधरपंत. केव्हा आला? मधेंच इकडे कसे? अरे पण हो, आमच्या निमानें तुम्हाला पत्रिका पाठविलीच असेल. तरीच!"

शिदूला काहींच बोध झाला नाही. तो चाचरत म्हणाला, "निमाने–आपलं निर्मलाताईने–मला पत्र... ? छे बुवा !"

म्हाताऱ्याने सरबत्ती सुरू केली, "काय मूर्ख कारटी आहे ! या अलिकडच्या पोरींना अक्कल म्हणून काडीची नाहीं. आता हेच पहा ना. तुमची आणि तिची इतकी ओळख असून तिने तुम्हाला पत्रिका पाठवूं नये म्हणजे काय ?"

शिदूला अजूनहि उमज पडेना. तो म्हणाला, "पत्रिका ? कसली बुवा ?"

"अहो, लग्नाची आमंत्रणपत्रिका ! तुमच्या कॉलेजमधले प्रोफेसर (निम्मे) ते वसंतराव आहेत ना ! त्याच्याशीं आमच्या निमीच लग्न ठरलं. परवाच्या दिवशी लग्न आहे. तुम्ही आला, हे फार बर झालं. आता हे लग्न झाल्याशिवाय साताऱ्याला जाऊ नका. बर पण श्रीधरपंत, तुम्हाला जोडा कसा काय वाटतो ?"

तोंडात जोडा मारल्याप्रमाणें शिदूला झाले. तो गप्प बसून राहिला. इतक्यात आतून चहाचा कप आला. चहा न घेताच तो तेथून बाहेर पडला.

पाय नेतील तिकडे तो भटकत होता. खोली अजून त्याच्या ताब्यांत होतीच. रात्री तो आपल्या खोलीवर येऊन तळमळत पडला. निमाच्या लग्नाची बातमी त्याच्या कानशिलाना इंगळीसारखी डसली होती. दुसऱ्या दिवशी तो खोलीच्या बाहेर पडला नाही.

लग्नाचा दिवस उजाडला. लग्नाला जायचे नाहीं, असे त्यानें ठरविलें होतें. पण पुन्हा त्याचा विचार बदलला. तो लग्नाला गेला. त्याने आपल्या हाताने निमाच्या अंगावर अक्षदा टाकल्या. निमा दुसऱ्याची झाली.

लग्नाला आलेले लोक पांगूं लागले. गर्दी कमी झाली. बोहल्यावर मांडलेल्या दोन पाटावर वधू व वर बसले. लाजाहोम सुरू झाला. निमाचें तोंड पहायचे नाहीं, असें त्यानें ठरविलें होते. पण त्याचे पाय मंडपाच्या दाराकडे न वळतां बोहल्याकडे वळले. त्याने निमाकडे पाहिले. तिचा चेहरा फुलाच्या मुंडावळयानी पूर्णपणे झाकला होता. इतक्यात वसंतरावाचें लक्ष त्याच्याकडे गेले. नवरदेवाने दंतपंक्ति दाखाविली. शिदूहि गाल बळेंच मागें सरकावून हसला.

होमांत सटरफटर वस्तू पडूं लागल्या. धूर झाला. निमानें मुंडावळ्या बाजूला सारल्या. शिदूने तिच्याकडे पाहिले. निमाचे डोळे पाण्याने भरून आले होते. शिदूच्या मनात कालवाकालव सुरू झाली. तो झटकन् पुढें झाला. त्यानें आपल्या खिशातला हातरुमाल काढला व तो निमाच्या हातात दिला. निमाने वर पाहिले. तिच्या डोळयात साऱ्या दुनियेतले कारुण्य मूर्तिमंत उभे राहिले आहे, असे शिदूला दिसलें. निमानें त्या रुमालानें आपले डोळे पुसले. शिदू मागे सरकला. त्याला तेथे उभे राहवेना. तो बाहेर पडला.

संतापाची जागा अनुकंपेने घेतली. हे लग्न तिच्या इच्छेविरुद्ध झाले आहे, अशी शिदूची खात्री झाली. पण आता काहीच इलाज नव्हता. पिजऱ्यातल्या सिंहाप्रमाणें तो आपल्या खोलीत येरझारा घालू लागला.

असे आठ दिवस गेले. साताऱ्याला न जाता शिदू कोल्हापूरातच वेड्या सारखा दिवस काढीत होता. निमाची एकदा गाठ घेऊन सर्व प्रकरणाचा उलगडा करुन घ्यावा, असा त्याचा बेत होता. निदान निमाचें दर्शन व्हावें, अशी त्याची फार इच्छा होती. अंबाबाईच्या देवळाभोवतालच्या रस्त्यानें त्यानें पुष्कळ चकरा मारल्या. पण प्रदक्षिणाचे पुण्य त्याच्या पदरी पडलें नाहीं. निमाने नव्या ससाराला सुरवात केली होती.

एके दिवशीं त्याला वसतराव रस्त्यात भेटले. बोलावे की नाही, या विचारात शिदू घुटमळला. वसंतराव त्याच्या पाठीवर थाप मारुन म्हणाले, " गृहस्था, लग्नाला आलास, पण बोलायला काही थाबला नाहीस. मिसेस्नें तुमची बरेच वेळा आठवण काढली. एकदा या ना घरी. "

शिदूनें मान हलवली. वसंतराव पुढे म्हणाले,

" मग काय, उद्या येणार कां ? या, मी दिवसभर घरीच असतो. आणि-हो-उद्यां बी. ए. च्या परिक्षेचा निकाल आहे. पेढेच घेऊन या झालं ! आमचं तोंड गोड करा. "

एक बाची ( बायकोची ) परिक्षा हातची गेल्यामुळे दुसऱ्या बाच्या ( B + A = बा ) परिक्षेविषयीं शिदूला फारसा उल्हास वाटत नव्हता. निमाला एकदा डोळे भरून पहाण्यासाठीं तो जास्त उत्सुक झाला होता.

दुसऱ्या दिवशीं शिदू निर्मेला भेटण्यासाठीं वसंतरावच्या घरीं गेला. जिना चढून तो वर गेला. दार उघडेच होते. तो आंत गेला. बाहेच्या घरात कोणीच नव्हतें. शिदू मुकाट्याने खुर्चीवर बसला.

वसंतरावच्या खोलीचा जामानिमा पार बदलला होता. व्यवस्थितपणें माडलेले नवे फर्नीचर चमचम करीत होते. दाराना व खिडक्याना नवीन रेशमी पडदे सोडलेले होते. भितीवर लावलेल्या तसबिरीत निमाच्या फोटोची भर पडली होती. टेबलावरच्या फुलदाणीतली फुलें शिदूकडे पाहून हसत होती.

आतल्या घरातून बोलण्याचा व हसण्याचा आवाज शिदूच्या कानावर आला. वसंतरावच्या व निमाच्या गप्पा निर्वेधपणे चालल्या होत्या निमा मधून मधून हसत होती. शिदूच्या टाळक्यावर घणामागून घण बसूं लागले. त्याचा आपल्या कानावर विश्वास बसेना. आपल्याला लग्नाच्या आणाभाका देणारी हीच का ती निमा ? अखेरीला ही सर वळवाचीच ठरली का ?

इतक्यात वसंतराव बाहेर आले. शिदूला पाहून ते म्हणाले,

" ओ हो ! पेढे आणले का नाही ? "

" अजून निकाल समजला नाही. "

" अग निमू , हे बघ बाहेर कोण आलंय्. "

" कोण ? " असें म्हणत निर्मलेनें हिरवे चुडे भरलेल्या हाताने पडदा बाजूला केला व ती बाहेर आली.

वसंतरावांनी तिच्या खांद्यावर हळूच एक चापट मारली व ते म्हणाले, " अग, तुझे शिदोबा आहेत शिदोबा ! "

कात टाकलेल्या नागिणीप्रमाण निमाच्या अंगावर तेज चढलें होतें. नुकत्याच उमललेल्या व दहिवराने भिजलेल्या कमळाप्रमाणे ती सुंदर दिसत होती. ती हसत हसत शिदूला म्हणाली, " का हो, आमच्यावर रागावलात होय ? लग्नाला आलात, पण एक शब्दहि न बोलता परत गेलांत."

" छे, राग कुठला ? " आवंढा गिळीत शिदू म्हणाला.

इतक्यांत रस्त्यावरून आवाज आला, " बी. ए.च्या परिक्षेचा निकाल! ज्ञानप्रकाश, एक आणा!"

वसंतराव लगबगीने गॅलरीत गेले व त्यांनी त्या पोऱ्याला हाक मारली. एक आणा देऊन त्यानीं तो अंक घेतला. गॅलरीतच उभे राहून त्यानीं नावें पहावयास सुरुवात केली. त्याना शिदूचे नाव सापडले नाही.

शिदूला दम निघेना. खुर्चीवरून उठून तो गॅलरीकडे निघाला. उंबऱ्या-वरून पाय टाकताना त्याला ठेच लागली. तो तेथेच पायपुसण्यावर बसला. त्याच्या अंगठ्यातून रक्त वाहूं लागले.

निमा धावतच आत गेली. एक काळें मिचकट फडके घेऊन ती बाहेर आली शिदूजवळ बसून ती त्याच्या अंगठ्याला ते फडके बाधूं लागली. बांधता बाधता ती म्हणाली, "दुसरें चागले फडकेच सापडेना. मग हें चुलीजवळचे सोधणेंच घेऊन आले."

शिदूनें आपल्या अंगठ्याभोवती गुडाळल्या जाणाऱ्या सोधण्याकडे पाहिलें. लाजाहोमाच्या वेळीं त्याने निमाला डोळे पुसण्यासाठी दिलेला तो त्याचा हातरुमाल होता.

★

## उडाणटप्पू : : : २

स्नेहलतनें प्रणयनिर्भर दृष्टीने शशिकाताकडे पाहिलें.

...मृदुमधुर स्मित करतांना तिच्या डाव्या गालावर उमटलेल्या नाजूक खळीकडे बेभानपणें पहात उल्हास उद्गारला...

...शालन अजून कशी येत नाहीं असा विचार तो आपल्या खोलींत अस्वस्थ मनानें येरझारा घालीत होता. इतक्यांत दारावर टक्टक् असा आवाज झाला आणि...

...यापैकीं कोणत्या वाक्यानें लघुकथेला सुरुवात करावी याचा विचार करीत मी येरझारा घालीत होतों इतक्यात दारावर टक्‌टक् असा आवाज झाला आणि माझे संपादक-मित्र आत आले.

" या. मी तुमच्याच कामाचा—लघुकथेचा विचार करीत होतो. "

" छान ! काय नांव आहे गोष्टीचं ? "

" गालावरली खळी "

आरामखुर्चीवर अंग टाकीत संपादक म्हणाले, " कॉलेजमधली प्रणयकथा दिसते ? "

" बरोबर ओळखलंत. तुम्ही संपादक लोक म्हणजे भारी चाणाक्ष ! "

मी केलेल्या स्तुतीने खूष होण्याऐवजीं संपादक गंभीर झाले आणि व्याख्यान देण्याच्या अवसानात बोलूं लागले,

" हिंदुस्थान हे एक भलें मोठे कॉलेज असून त्यांत वीस कोटि तरुण व वीस कोटि फॅशनेबल सुंदर तरुणी शिकत आहेत व ते एकमेकांवर प्रेमाशिवाय दुसरं कांहीं करीत नाहीत, अशी तुम्हा लेखकलोकांची कल्पना दिसते. तुम्हांला पुण्या-मुंबईच्या बाहेर पडायला नको. देशात काय चाललंय्, लढाईनं कोण हाहाःकार उडवलाय्, लोकांचे किती हाल होताहत-या गोष्टींकडे तुम्ही लक्ष देत नाही. जरा हिंडा, फिरा, डोळे उघडून पहा. "

" हिंडाफिरायला पैसे पडतात म्हटलं तुम्हाला स्वस्त्यात गोष्टी पाहिजेत. तुमचा प्रेमोपहार म्हणजे पंधरा रुपये ! " मी खवचटपणानें म्हणालों.

" आम्हाला चालू परिस्थितीवर चुरचुरीत गोष्टी पाहिजेत. द्या एक लिहून. प्रवास करा. सगळा खर्च मी देईन. "

" मला नुसता आशीर्वाद नको आहे. तुम्ही संपादक लोक म्हणजे महाचिक्कू. "

संपादकांनीं उसळून खिशात हात घातला व पन्नास रुपयांच्या नोटा माझ्या पुढ्यांत टाकीत ते म्हणाले, " हे घ्या अगाऊ. आणखी खर्च लागला तर कळवा. पाठवून देईन. "

एवढें बोलून ते निघून गेले. त्या नोटाकडे पाहून मी विचारात पडलों. चालू परिस्थितीवर चुरचुरीत गोष्ट ! कशी काय लिहायची बुवा ती ?

संपादकानीं पैसे दिलेत. प्रवास तर करायला हवा ! कुठे जावें ? कुठे गेल्याने चालू परिस्थितीचे निरीक्षण करता येईल ? आणि चालू परिस्थिति म्हणजे काय ? आम्ही इतक्या गोष्टी लिहिल्या त्या काय साऱ्या ऐतिहासिकच ? म्हणे प्रवास करा ! पैसेहि घेऊन बसलो. व्यापच झाला हा !

कोल्हापूरला माझे एक मेव्हणे राहातात. ‘आमच्याकडे या’ असें त्यांचे बऱ्याच दिवसांचे टुमणे होते. अमक्याच ठिकाणीं प्रवास करा अशी संपादकानीं अट घातलेली नाही. जावें झालें कोल्हापूरलाच. गोष्टीचे पुढे पहाता येईल. सध्या फुकटांत प्रवास तर करून घ्या ! अखेरीस मीं कोल्हापूरला जाण्याचा बेत कायम केला.

रात्रीं साडेनऊ वाजतां मी पुणे स्टेशनवर गेलों व कोल्हापूरचें इंटरचे तिकीट काढलें. हमालाच्या डोक्यावर बॅग व होल्डऑल देऊन मी शेवटच्या प्लॅटफॉर्मवर गेलो. गाडी उभी होतीच. तिसऱ्या वर्गाचे डबे माणसानीं इतके गच्च भरले होते, कीं त्यांत अक्षरशः उभें राहायलाहि जागा नव्हती. इंटरचे दोनच डबे होते. त्यात दाटीवाटीने बसलेल्या उतारूंकडे पाहून मला आत शिरण्याची इच्छाच होईना. दुसऱ्या वर्गाच्या डब्यात मात्र गर्दी नव्हती. एक तर अगदी रिकामाच होता. त्या डब्यात सामान टाकून मी तिकीट बदलून आणलें. हो, उगीच कटकटर कशाला ? होल्डऑल पसरून मी अंकपैकीं तणावून दिली.

दहा वाजतां गाडी ढळली. तोंपर्यंत दुसरे कोणिच डब्यात आलें नाहीं. गाडी डकाव डकाव करीत चालूं लागली. मी आरामशीरपणे झोपून राहिलों.

मधेंच मला जाग आली. मी मनगटावरल्या घड्याळात पाहिलें. बारा वाजून गेले होते. गाडी कोणत्या तरी फडतूस स्टेशनवर उभी असावी. चोहीकडे सामसूम होती. शिट्टीचा आवाज झाला. गाडी हलूं लागली. इतक्यांत डब्याचें दार उघडून एक बाई आंत आली. इकडे तिकडे पाहून ती माझ्या

समोरच्या बाकावर बसली. मी डोळे किलकिले करून तिच्याकडे पाहूं लागलों.

ती बाई अगदीं तरुण होती. बाई कसली ? मुलगीच म्हणा ना ! आपल्या इरकली लुगड्याचा तिने डोक्यावरून पदर घेतलला होता. गळ्यात एकदोन दागिने होते. मराठमोळा पद्धतीची दिसली ती मला. चेहरामोहरा पुष्कळच सुंदर होता.

तिच्या गोऱ्यापान हातावरले हिरवे चुडे विजेच्या प्रकाशात चमकत होते. नुकतेच लग्न झालेले असावे पण...पण मग ही अगदी एकटी कशी? आणि बरोबर सामानहि नाही. शिवाय ती वरीच बावरलेली दिसली. काहीं भानगड तर नसेल ? बहुतेक ही पळून जात असावी. बहुतेक का ? नक्कीच. आणि या डब्यात तिच्याबरोबर मी एकटाच ! ही फुकट बलामत अंगावर यायची ! दुलईच्या आतून मला दरदरून घाम आला.

गाडी थांबली. ती बाई उठून दाराजवळ गेली व बाहेर डोकावूं लागली. याहि स्टेशनवर सामसूम होती. गाडी बराच वेळ उभी होती व ती बाईहि तशीच उभी होती. गाडी हलूं लागली. ती बाई मागे सरकली. दार उघडून एक धटिंगण इसम आत शिरला. त्याची ती वाढलेली दाढी आणि राकट चेहरा पाहून मी गारठूनच गेलो. अंगात एक सदरा व जाकीट आणि पायात पठाणी पायजमा व चढाव असा त्याचा विचित्र पोशाक होता. या इसमाचे दुसऱ्या वर्गाच्या डब्यात काय काम ? आता काय होणार ? कोणत्या मुहूर्तावर प्रवासाला निघालों असे मला झाले !

त्या इसमाने एकवार माझ्याकडे न्याहाळून पाहिलें व तो घोगरट आवाजात बोलला, “ हा मुडदेफरास झोपलेला दिसतो. ”

किंचित् किलकिले ठेवलेले डोळे मीं गपदिशी मिटून घेतले व झोपेचें सोंग चालू ठेविले.

आता या बाईचे काय होणार ? हा मनुष्य तर नंबर एकचा उडाणटप्पू दिसतो ! ही बाई एकटी. मी हा असा झोंपेत. हा धटिंगण या बाईच्या अंगावर हात टाकणार. ही ओरडणार. मग मात्र आपल्याला उठावे लागणार. पण उठून काय करणार ? या इसमापुढें आपला कसा निभाव

लागणार ? किंकाळी ऐकण्यासाठीं कान सरसावून मी तसाच पडून राहिलो. पण पाच मिनिटे गेली तरी डब्यात अगदी गडीगुप्प शातता.

आणखी पाच मिनिटे गेली. मग मात्र मला राहवेना. मी डोळे किंचित् उघडले आणि तो प्रकार पाहून स्तंभितच झालो !

तो उडाणटप्पू समोरच्या बाकावर पसरलेला होता. त्याचे डोकें त्या बाईच्या माडीवर होते आणि तिचा डावा हात तो आपल्या दोन्ही हातानीं कुरवाळीत होता. त्याचे डोळे तिच्या चेहऱ्यावर खिळलेले होते. त्याच्या नजरेतला रानदाडगेपणा पुरता-पुरता विरघळून गेलेला होता. त्याचे नाक तरतरीत व कपाळ उंच होते. एकंदरीनें दिसायला तो तसा वाईट नव्हता.

ती बाई आपला उजवा हात त्याच्या पिंजारलेल्या केसावरून फिरवीत होती. तिच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. तो प्रकार पाहून माझें डोकें सुन्न झालें.

हा वाह्यात माणूस कोण ? ही बाई तर चांगली घरंदाज दिसते. हीं दोघं कुठे पळून जात असावीत ? आणि ही अशी अगदीं गप्प का ? ही काय भानगड ? मीं डोळे मिटून घेतलें.

अशी पांच मिनिटे गेली. पुन्हा डोळे उघडून पहाणे मला प्रशस्त वाटलें नाहीं. मीं हलकेच कूस बदलली आणि त्याच्याकडे पाठ फिरवली. थोड्याच वेळांत मला झोपेनें घेरलें.

मला पुन्हां जाग आली. किती वाजले होते कुणास ठाऊक ! पण डोळे न उघडताच माझ्या छातीत दचका भरला. माझ्या डोक्याखालीं काहींतरी मऊ आणि ऊबदार असे लागत होते. ती माझी उशी नव्हती हे खास. आणि माझ्या केसांवरून कुणाचा तरी हात फिरत होता. स्वप्न तर नाहीं ? पण छे ! मला खडखडून जाग आली होती. मनाचा हिय्या करून मीं डोळे उघडले; आणि खात्रीच झाली माझी ! माझे डोके त्या बाईच्याच माडीवर होतें आणि ती हळुवारपणें माझ्या केसांवरून हात फिरवीत होती. काहींतरी अद्भुत चमत्कार होऊन आमच्या आत्म्याची अदलाबदल तर नाहीं झाली ? मीं हळूच हनुवटीला हात लावून पाहिला. हाताला दाढी लागली नाहीं, तेव्हा कुठें मला जरा हुश्श वाटलें !

आणि तो काळभैरव कुठे गेला ? झोपेंतच असल्यासारखे दाखवून मीं कूस बदलली. समोरचा बाक रिकामा होता. आम्हां दोघांशिवाय डब्यांत कुणीच नव्हतें. उतरला वाटतें तो ? पण तो जर पुन्हा आला आणि त्यानें हे पाहिलें तर ? माझी छाती धाडधाड उडूं लागली.

प्रथमदर्शनी ही बाई किती सोज्वळ दिसली ! त्या उडाणटप्पूबरोबरचा तो प्रकार पाहिल्यावर माझे तिच्याविषयीचे मत बदलले होतें म्हणा. पण हा काय प्रकार ? मी कोण ? ही कोण ? तो इसम गेल्याबरोबर ही मला पकडते काय नी माझे डोके माडीवर घेते काय ! जगात इतक्या वाईट बाया असतील अशी माझी कल्पना नव्हती. पण आता पुढे काय ? आमच्या सौभाग्यवतीला हा प्रकार कळला म्हणजे आटोपलाच सारा कारभार !

जराशाने गाडी थांबली. बाहेर कुणीतरी ' भिलवडी, भिलवडी ' असें ओरडलें. आता मात्र मला राहावेना. मीं डोळे सताड उघडले. पहाटेचा प्रकाश बाहेर फाकूं लागला होता. डब्याच्या दाराबाहेर दोनतीन माणसें उभीं होतीं. तीं आपसात हळूहळू बोलत होतीं व मधूनमधून आमच्याकडे पहात होती. मीं त्या बाईच्या चेहऱ्याकडे पाहिलें. ती फारच कावरीबावरी झालेली दिसत होती. मी जागा झालो आहे हें तिच्या लक्षांत आलें होतें. पण तिची दृष्टि माझ्याकडे नव्हती. मी डोकें उचलणार इतक्यांत ती दाबलेल्या आवाजात म्हणाली,

" खबरदार ! उठूं नका. हलूं नका. "

तिने दुलई वर ओढून माझ्या तोंडावर टाकली. म्हणजे हा जुलूमच झाला ! मी तोंडावरली. दुलई काढणार इतक्यात डब्याचे दार वाजले व कुणीतरी आत आले. आता काय करवे ? मी निपचीत पडून राहिलो. गाडी सुरू झाली. डब्यात शिरलेला मनुष्य समोरच्या बाकावर बसलेला असावा असे मला वाटले.

हा नवीन मनुष्य कोण ? ही बाई माझ्यावर अशी बळजबरी कां करते ? आणि उठायला लागलो तर बेशक दरडावते ! अगदीं कहर झाला ! झक मारली आणि प्रवासाला निघालों. लपेटलेल्या दुलईतून संपादकांना शिव्या देण्याचें कार्य मी करूं लागलो.

असा किती वेळ गेला कुणास ठाऊक ! पुन्हां गाडी थांबली. बाहेरच्या बाजूला कुणीतरी 'मिरज' म्हणून ओरडलें. डब्याचें दार वाजलें. तो मनुष्य खाली उतरला असेल अशी मी कल्पना केली. शिट्टीचा कर्कश आवाज झाला. पाठोपाठ बुटाचा खाडखाड असा आवाज आला. चांगलीं चारपाच माणसें धावत आलीं असावींत. कुणीतरी कर्कश आवाजात ओरडले,

" व्हा पुढ. पकडा त्या हरामखोराला. "

त्या दिवशी माझे जे सतरा सोपस्कर झाले ते मी या जन्मांत विसरणार नाहीं. मी तोंडावरली दुलई दूर केली. माझ्यासमोर तीनचार पोलीस उभे होते. त्यांनीं मला खस्सदिशीं उठविलं. साध्या पोशाखातला एक मनुष्य पुढे आला व त्यानें घाईघाईने माझ्या हातांत बेड्या अडकविल्या. तो मनुष्य बहुधा फौजदार असावा आणि भिलवडी स्टेशनपासून त्यानेच आम्हाला सोबत केली असावी. एव्हाना डब्याबाहेर बघ्या लोकाची खूपच गर्दी जमली होती. मी इतका गांगरून गेलों होतों, की माझ्या तोंडून शब्दच बाहेर पडला नव्हता. तो मला खाली उतरायला सांगूं लागला, तेव्हा मी म्हणालों, " अहो, हें काय ? मला का पकडतां ? "

" काय कांगावा करतो लेकाचा ! " तो गृहस्थ बोलला. बाकीचे पोलीस फिदी फिदी हसूं लागले. मी त्या बाईकडे पाहिले. ती डब्याच्या खिडकीजवळ पाठमोरी उभी होती. जणूं काय कांहींच झालें नाही असा तिचा आविर्भाव होता. एका पोलिसाने माझा होल्ड-ऑल गुंडाळून घेतला, दुसऱ्याने बॅग उचलली व आम्ही खाली उतरलो. पुढे एक पोलीस मागे एक पोलीस आणि त्या गृहस्थानं मला दंडाला धरलेले-अशा थाटात मी चालूं लागलो. जमलेल्या गर्दीतल्या लोकाचे चेहरे आश्चर्याने प्रश्नांकित झाले होते. त्यांनीं भराभर बाजूला सरून आम्हाला वाट करून दिली. एकदोघेजण उद्गारले, " जंटल-मन डाकू दिसतो ! "

त्यांनीं मला पहिल्या वर्गाच्या वेटिंग रूममध्ये नेलें. त्या गृहस्थानें मला एका खुर्चीवर बसविले व एका काढणीने मला त्या खुर्चीशी गच्च बांधून टाकले. फौजदारच होते ते गृहस्थ.

" काय रे ए बदमाष, आज अगदीं जंटलमनचा रुबाब आणलास ! काय बेत आहे ? पण माझ्या तावडीतून सुटतोस होय ? अखेरीस पकडला

की नाही ? बाकी फार छळलंस अं बाबा. माझी नोकरी जायची वेळ आली होती. "

एवढे बोलून फौजदारसाहेबांनी बाकीच्या पोलिसाना माझ्यावर नीट लक्ष ठेवण्यासाठी बजावले व ते निघून गेले. मी चालू परिस्थितीवर विचार करीत असलो. चालू परिस्थिति !

मी बराच वेळ त्या खुर्चीवर अवघडल्यासारखा बसलो होतों. माझ्यावर पहारा करणारे पोलीस हसतखिदळत विड्या फुंकीत होते. सुमारें दोन तासानी फौजदारसाहेब घाईघाईने आले व त्यानी मला बांधलेली दोरी सोडायला सुरवात केली. माझ्या हातातल्या बेड्या काढून घेऊन ते म्हणाले,

" काहो मिस्टर, तुमचं नाव काय ? "

मी माझें नाव त्याना सांगितलें. ते पुढे म्हणाले, " मग तुम्ही हें आम्हाला अगोदरच कां नाही सांगितलं ? "

" मी सांगत होतों, तर तुम्ही लक्षच दिलं नाहीं. "

" आमची चूक झाली हं. त्या बयान मला चांगलंच बनवलं. माफ करा. चलारे. "

मला बोलायला सवड न देता फौजदार त्या पोलिसाना बरोबर घेऊन गेले. माझे सामान तिथेच होते. मी होल्डऑलला टेकून स्वस्थ पडून राहिलों. हातापायाना अशी रग लागली होती की विचारूं नका !

सुमारे अर्ध्या तासाने मी बाहेर पडलो व चांगला दोन कप चहा ढोसला. कोल्हापूरची गाडी केव्हाच निघून गेली होती. पुण्याकडे जाणारी गाडी लवकरच येणार होती. झाला एवढा प्रवास बस्स झाला ! आता कोल्हापूर नको अन् बिलापूर नको ! पुण्यालाच परत सायसंगीत जाऊन पोचलों तर नशीब ! मी पुण्याचे दुसऱ्या वर्गाचे तिकीट काढले

जराशाने गाडी आली. दुसऱ्या वर्गाचा एकच डबा होता आणि तो रिकामा होता. सामान आत टाकून मी त्या डब्यात बसलों. गाडी सुटायला अजून पांच मिनिटें अवकाश होता. इतक्यात दार वाजलें. ' चला, सोबत झाली, ' असें वाटून मला हायसे वाटलें. मी मान वर करून पहातों, तों

ती बाई समोर उभी ! अजून हिनें माझा पिच्छा सोडला नाही म्हणजे काय ! मी संतापाने तिला काही बोलणार इतक्यात ती हात जोडून म्हणाली,

" माफ करा हं. तुम्हाला माझ्यामुळं फारच त्रास झाला. "

" आणि तुझा तो उडाणटप्पू कुठं आहे ? "

" ते सातारा जिल्ह्यातल्या तरुणाच्या हृदयात आहेत. त्यांना पकडून देणाऱ्याला पांचशे रुपयांचें इनाम लागले आहे. पण यानीं जंगजंग पछाडले तरी त्यांचा पत्ता लागणार नाही. तुम्ही मात्र बहिणीचा दुवा घेतलात. "

" हा चांगला न्याय ! " कांहीतरी बोलायचे म्हणून मी बोललों.

" त्यांना पकडण्यासाठी यानीं माझ्यावर पाळत ठेवली होती. यांना वाटलं ते मला भेटायला कधींतरी घरीं येतील. आमची गाडीत भेटण्याची युक्ति कुणालाच माहीत नव्हती. पण या मेल्यानं मधल्या एका स्टेशनवर मला अवचित पाहिलं. मग त्याच्या लक्षात आलं. हे लगेच दुसऱ्या बाजूनं उतरून गेले आणि मग त्याचा पाठलाग होऊं नये म्हणून याना फसविण्यासाठीं मी... "

इतक्यांत गाडी सुटण्याची शिट्टी वाजली. ती पुढें म्हणाली,

"तुम्हाला मात्र त्यामुळं फारच त्रास झाला. मला धर्माची बहीण समजा."

" बरं, बरं ! तुम्ही उतरा आता. गाडी सुटेल. "

ती जाण्यासाठीं वळली, पण लगेच माघारीं फिरून म्हणाली,

" मला माहीत आहे, तुम्ही जागे होता म्हणून. पण आमचं लग्न होऊन एकच महिना झाला होता. अन् लगेच याच्यावर वॉरंट सुटलं. म्हणून मग...मग. ..माफ करा हं ! "

गाडी हलूं लागली होती. ती चट्दिशी खालीं उतरली व दिसेनाशी झाली.

आणि अखेरीस ती गोष्ट लिहायची तशीच राहून गेली.

★

## म्हातारपणची शिकार : : : ४

या तरुण लोकाची मोठी चैन असते! लग्न म्हणजे याच्या हातचा मळ. पोरी भराभर सांगून येतात. त्याच्यातून एखादी पसंत केली कीं झालें काम! वाजली टाळी! म्हणजे मी त्याचा हेवा करतों असें नाहीं; पण आम्हां म्हाताऱ्या विधूर लोकाचे भारी हाल होतात. लग्नासाठी जीव हपापलेला असतो. पण एका पोरीचा बाप आमच्या घराचा उंबरा चढेल तर शपथ! यातल्या त्यात चाळिशीच्या आत असलेले विधूर खपून जातात. पण चाळिशी उलटली कीं बायको मिळविण्याचे काम मोठें कठीण होऊन बसते! तेंहि साहजिकच आहे म्हणा. म्हातारा कुत्रा शिकारीला निघाला म्हणजे त्याच्या हातात ससा कुठला लवकर सापडायला!

आता माझीच गोष्ट घ्या ना! मी काहीं तसा फारसा म्हातारा नाहीं. नुकतेंच पंचेचाळिसावें वर्ष उलटले माझे. केसहि काही सगळे पांढरे झाले नाहीत. आणि अलीकडे पोरासोराचे केस पिकून डोकीं पांढरीं फक्क दिसतात; तर आमचे काय एवढे मोठेसे! बरे, माझ्या डोक्यावर अर्धेअधिक टक्कल पडलेलें असल्यामुळें त्या ठिकाणचे केस पांढरे होते कीं काळे हेंहि कळायला कोणाला काही मार्ग नव्हता. तब्येतहि तशी काही वावगी नव्हती. पोराबाळांचें लचांडहि पाठीमागे नव्हते. झालीं होतीं तीनचार, पण तीं तिच्या-अगोदरच आटोपलीं होतीं. इतके असूनहि बायको मरून दोन वर्षे झालीं तरी एकाहि पोरीचा बाप माझ्याकडे फिरकला नाहीं.

एका परीनें त्याचेहि बरोबर आहे. कारण मी पडलो शाळामास्तर. पगार म्हटला म्हणजे माझ्या वयाच्या इतक्याच टिकल्या पदरात पडतात. पैशाचा महिमा हा असा आहे. असेल पैसा तर या आणि बसा! घरदार, शेतीभाती असती तर लागले असते लोक मागें. तरी बरें, की कुमारी-विधवा, गरीब-श्रीमंत, सुरूप-कुरूप हे कसलेहि भेद न ठेवण्याचें उदार धोरण मीं स्वीकारलें होतें. पण तें काहीं जमेना! मनांत वाटे, असावी बायको. पण ती

आणावयाची कोठून? पुष्कळ वाट पाहिली आणि शेवटीं तो नाद सोडून द्यायच्याच बेतात आलो होतों; पण दिला अखेरीस नशिबानें हात आणि आली संधि चालून. तीच गोष्ट सांगणार आहे मी आता तुम्हांला.

तुम्ही म्हणाल, लागला हा प्रेमाची गोष्ट सागायला. पण तसे घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं. अहो, लग्नाचा आणि प्रेमाचा काय सबंध? मी बायको कशी पटकावली याची ही सारी हकीकत आहे. म्हणजे आम्हा म्हाताऱ्याना प्रेमबीम करता येत नाही असे मात्र समजू नका हं! प्रेम करून करून मुरब्बी झालेले लोक आम्ही. प्रेमाच्या बाबतीत तसे फार खर्पा. या पोरासोरानीं काय प्रेमाच्या गोष्टी कराव्यात आमच्यापुढे! बरे, ते असो!

आमच्या शाळेपासून पाच मिनिटाच्या रस्त्यावर एका दुमजली घरात राहात होतो मी. माडीवरली कोपऱ्यातली एक खोली भाड्याने घेतली होती. ती गेल्यानंतर संसारातून मनच उठले. कामापुरते सामानसुमान ठेवून बाकीचे फुंकून टाकले आणि या जागेत राहायला आलो. सकाळी उठून प्रातर्विधी उरकून एकटेच काहीतरी वाचीत पडावे; दहा वाजतां खाणावळीत जाऊन तुकडा मोडून तसेच परभारे शाळेत जावे आणि शाळा सुटल्यावर कुठेतरी पाय मोकळे करून पुन्हा खाणावळीला भेट देऊन परत खोलावर येऊन पडावे, हा माझा नेहमीचा क्रम. तिचा फोटो मोठा करून भिंतीवर लावला होता; त्याला दर गुरुवारी एका दिडकीचा हार घालायला मात्र मी विसरत नसे. सति सावित्री होती बिचारी. फार खस्ता खाल्ल्या तिने. गेली सोडून, करायचे काय? तिच्या फोटोकडे पाहून पूर्वीच्या आठवणी मात्र नेहमीं डोक्यात येत. अंगावरचें पांघरूण ओढून तिनें मला रोज सकाळीं उठवावें आणि अंथरुणात चहाचा कप माझ्या तोंडाला लावावा. एखादे दिवशीं माझ्या आग्रहाखातर तिने मला आंघोळसुद्धा घालावी. पिशवी घेऊन तें मंडईला भाजी आणायला जाणें, तिने केलेली चविष्ट आमटी भुरकून भुरकून खाणें, त्या गप्पा, ती चेष्टामस्करी,... जाऊं द्या; आता त्याचें काय होय! एकंदरींत काय, की बायकोशिवाय संसारांत राम (की सीता?) नाहीं आणि म्हणून पुन्हां या लग्नाच्या फंदांत पडलों. म्हातारपणीं जिवाभावाचें माणूस जवळ असावें.

एक एक दिवस असा कोरडा कोरडा चालला होता. शेवटीं आली संधि चालून, हें मी सांगितलेंच तुम्हाला. त्याचें असें झालें—

मी राहात होतों त्या माडीवर आणखी एका बिऱ्हाडाची सोय होती. ती जागा बरेच दिवस रिकामी पडली होती आणि त्यामुळेंच मला जास्तच एकटें एकटें आणि भकास वाटत होतें. शेवटी एक दिवस त्या शेजारच्या खोलीत सामानाची खडखड ऐकूं आली. म्हटलें, बिऱ्हाड आलें, चला, बरी सोबत झाली. इनमिन दोन माणसें होती ती. सुंदराबाई आणि त्याचा अकराबारा वर्षांचा भाचा शांताराम. सुंदराबाईना पाहिल्याबरोबरच माझें त्याच्याबद्दल भारी अनुकूल मत झालें. विधवा होती बिचारी. रंग गोरा असल्यामुळें कपाळ जास्तच फटफटीत दिसत असे. शरीर जरा स्थूल—म्हणजे लठ्ठ या सदरात मात्र जमा नाही अं! चेहऱ्यावर पोक्तपणा, साधी राहाणी, अगदी योग्य माणूस. हातात चांगल्या आंगठ्यासारख्या जाड गोठपाटल्या होत्या. पोरगाहि मोठा चुणचुणीत होता. सुंदराबाईना सांगून मी त्याचें नांव आमच्या शाळेंत घातलें.

एकंदरीत सर्व ठीक आहे असें मी ठरवलें आणि आणि कार्याला लागलों. प्रथम शांतारामला आमच्या शाळेतून त्याला लागणारी सर्व पुस्तकें फुकट देवविलीं आणि रोज सकाळी त्याला घेऊन एक तास बसूं लागलों. सुंदराबाईनी या गोष्टीला सुरवातीला जरा आढेवेढे घेतले. पण शिकवणीचा एक पैसाहि मी घेणार नाहीं, हे समजताच त्यांनी या गोष्टीला संमति दिली. शांतारामकडून मी त्यांची सर्व माहिती काढून घेतली. सुंदराबाई फारसें बोलत नसत माझ्याशी. बोलत ते अगदीच मामुली असे. माझ्या अंदाजाप्रमाणे बाई चांगलीच पैसेवाली पण खर्चायला चिक्कू अशी होती. मूलबाळ नसल्यामुळें बहिणीच्या मुलालाच त्यांनीं जवळ ठेवलें होतें. वास्तपुस्त करायला वरी वडीलधारी माणसें कोणी नव्हतीं.

सुंदराबाई सौभाग्यवती झाल्यानंतर आमचा संसार कसा चालेल याचीं कल्पनाचित्रें मी फावल्या वेळात रेखाटूं लागलों. निराशामय वातावरण नाहींसें झाल्यामुळें आता दिवस जरा बरे जाऊं लागले होते. पण खुद्द कार्याला अजून म्हणावी अशी सुरवात झाली नव्हती. सुंदराबाई अजूनहि अगदीं आल्या दिवसाइतक्याच परकेपणानें वागत होत्या. शांतारामला रोज खाऊ

देऊनहि काहींच प्रगति झाली नव्हती ! पण एवढ्यातच निराश होण्याइतका कः च्या दिलाचा नव्हतों. बराचसा विचार करून मीं एक कार्यक्रम ठरवून टाकला आणि त्याप्रमाणे कामाला लागलों.

ज्याना आवाजाची देणगी आहे अशाच माणसानीं फक्त गाणी म्हणावींत आणि आमच्यासारख्या भसाड्या आवाजाच्या माणसानी काय गाणीं म्हणूं नयेत असे थोडेच आहे ! अहो आम्हालाहि गाणी म्हणता येतात. म्हणता येतात म्हणजे काय–म्हणायला सुरवातच केली मीं—

**प्रीति मिळेल का हो बाजारीं**

**प्रीति मिळेल कां हो शेजारीं ?**

'शेजारीं' या शब्दावर जोर देऊन हें गाणे घोळायला सुरवात केली. अगदीं पिट्टा पाडला त्याचा. पण सुंदराबाईच्या चेहऱ्यावर त्याचा काहींच परिणाम होतोसा दिसेना ! नतर मग—

**नच सुंदरि, करूं कोपा**

**मजवरि धरि अनुकंपा !**

या दोन ओळींवर झोड उठविली. या ओळी म्हणतांना कोणत्या शब्दावर जोर दिला असेल, हे आता तुम्हीच सागा ! तरीहि पण अनुकंपेचा एक पिंटहि उद्भवण्याचें लक्षण दिसेना. पण निराश न होता रोज एक नवे गाणें ( साजेसे ) शोधून काढून ते हवेंत फेकण्याचा क्रम चालू ठेवला. 'कर्मण्येवाधिकारस्ते' असे कायसें भगवान् श्रीकृष्णानी गीतेंत सागितलें आहे ना ! अर्थात् फलावर नजर न ठेवण्याचें श्रीकृष्णाचे धोरण मला पसंत असणे शक्य नव्हतें.

नंतर मग निराळ्या दिशेनें प्रयत्न करायला सुरवात केली. एक दिवस लायब्ररीत जाऊन तिथलीं पुस्तकें उचललीं आणि त्यातलीं दोनतीन वेचक अशीं निवडून घरीं आणली. त्यात एक हडपाचीहि कादंबरी होती. ती पुस्तकें शातारामजवळ देऊन त्याला ती मावशीला वाचायला दे असें सागितलें.

दुसऱ्या दिवशीं तीं पुस्तकें गेलीं तशींच परत आलीं !

"काय रे, झालीं का वाचून इतक्यात ?" मीं विचारलें.

" मावशी म्हणाल्या, ' असलीं चावनट पुस्तकं पुन्हां आणूं नकोस ! ' " शांताराम उत्तरला,

जड अंतःकरणानें मीं तीं पुस्तकें परत करून टाकलीं. एक एक उपाय फसत चालले. अजूनहि त्या शिलेला घाम फुटेना !

एक दिवस शांतारामचा हात हातांत धरून मी त्याकडे पुष्कळ वेळ निरखून पहात बसलों. त्याच्या बोटांवरचे शंख आणि चक्रें मोजलीं. एका कागदावर बराच वेळ आकडे मोडले आणि त्याला त्याच्या आयुष्याची उज्ज्वल रूपरेखा सांगितली. अशा प्रकारें अस्मादिकाची स्वारी भविष्यवादी बनली. हा बाण मात्र छान लागू पडला. संध्याकाळीं शाळेंतून परत आल्यावर ( अलिकडे मी फिरायला जात नसे. ) शांताराम खोलींत आला आणि म्हणाला,

" मास्तर, तुम्हाला मावशींनी बोलावलय्. "

अंगावरचे कपडे उतरून तोंडानें शीळ घालीत मी त्याच्या खोलींत शिरलों. इतके दिवस शेजारीं राहून त्या बयेने आत काही बोलावले नव्हतें मला. स्वच्छ घासलेलीं भांडीं भिंतीवर हारीनें लावलेलीं होतीं. शेणाने सारवलेली जमीन हिरवीगार व स्वच्छ दिसत होती. सामान भरपूर पण आटोपशीर जागेंत शिस्तीनें लावलेलें होतें. हा शिस्तीचा हात माझ्या घरातून केव्हा फिरेल याचा विचार करीत मीं उभा राहिलों. सुंदराबाईनी मला बसायला एक पाट दिला आणि शेगडी पेटवून चहाचें आधण ठेवलें. चहा होईपर्यंत इकडच्या तिकडच्या मामुली गोष्टी झाल्या. चहा झाल्यानंतर मुद्याची गोष्ट निघाली.

" मास्तर, तुम्हाला हात पाहता येतो म्हणे ? "

" नाहीं, तसं कांहीं नाहीं. पण समजतं थोडंसं " मी विनयानें म्हणालों.

" आमच्या शांतारामचं कसं काय आहे ? "

" वा वा, हें काय विचारायचं ! भाग्यवान आहे पोरगा. त्याच्या हातावर साडेसात चक्रं आहेत. खूप शिकेल. अगदीं बी. ए., पी. सी. एड्. ची परीक्षा पास होईल. हजारांनीं पगार मिळवील. "

"अस्सं !" सुंदराबाई आनंदातिशयानें उद्गारल्या.

"रेषाच सांगताहेत हातावरल्या. घरदार, इस्टेट चागली कमावील. अगदीं आईबापांचं, मावशीचं नांव काढील."

"बरं झालं बाई !" हर्षातिरेकानें आता काहींतरी बोलायचे म्हणून सुंदाराबाई बोलल्या. सगळेच चागले सांगितले तर शंका येऊं नये म्हणून मीं ऐक खुसपट काढले—

"एक मात्र वाईट आहे..."

"अगऽबाई ! सागा मास्तर काय तें ?"

"त्याचं असं आहे, बायका काही टिकायच्या नाहीत या पोराच्या. चांगल्या दोन तीन बायका खाईल."

उरावरचें ओझें उतरल्यासारखा निःश्वास टाकून सुंदराबाई म्हणाल्या,

"एवढंच ना ! मला वाटलं दुसरं काय !" नंतर शांतारामाकडे वळून, "काय रे ए गुलामा ! बायका खाणार होय तूं ?"

तें पोर काय बोलणार ? लाजेनें त्याचा अगदीं टोमॅटो झाला ! बायको म्हणजे एक टपोरी पिवळीधमक काकडी असून ती आपण दातानी करंडीत आहोंत अशी भावना झाली असेल त्याची ! नंतर पुढें हात करून सुंदराबाई म्हणाल्या,

"मास्तर माझा हात प्हा ना जरा ! माझं मेलीचं काय नशीब पाह्यन्चं... पण आपलं वाटतं जरा."

पाटावरून पुढें सरकून मी त्याचा गुबगुबीत लालबुंद हात हातांत घेतला आणि निरखून पाहूं लागलो. त्या जाडजूड गोठपाटल्या किती भाराच्या असाव्यात याचा हिशेब करीत मी म्हणालो,

"वाः ! अगदीं छानच हात आहे."

सुवार्ता ऐकण्याच्या अपेक्षेनें त्यांनीं आपले डोळे माझ्या चेहऱ्याकडे लावले होते. रेषा पाहण्याच्या निमित्तानें मी तो हात माझ्या हातात चाळवीत होतो. आज दोन वर्षांनीं स्त्रीचा स्पर्श झालेला ! माझ्या अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या.

परंतु एखाद्या कासाराच्या हातीं बांगड्या भरायला हात द्यावा त्याप्रमाणें सुंदराबाई निर्विकार बसल्या होत्या. तें पोरगें मी काय सांगतों तें ऐकण्यासाठीं मधूनमधून पुढें तोंड घालीत होतें. असा बराच वेळ झाल्यावर अधीर होऊन त्या म्हणाल्या,

" कां हो, सांगा ना काहींतरी. "

एक भला मोठा आवंढा गिळून मीं धोतराच्या सोग्यानें कपाळावरला घाम पुसला आणि शातारामला उद्देशून म्हणालों,

" तूं बाहेर जा पाहूं जरा. तें बघ रस्त्यावर काय वाजत आलय् तें ! "

तें पोरगें काहीं हलेना ! मीं त्याला पुन्हा जायला सांगितलें. शेवटीं सुंदराबाईनीं त्याला बाहेर जाण्यासाठीं खडसावल्यावर तो बाहेर गेला. अगोदर मिळविलेल्या माहितीवर मीं थोडी वेळ भागवून नेली आणि मग जिवाचा हिय्या करून हलक्या आवाजांत म्हणालों,

" तुमच्या नशिबांत दुसऱ्या लग्नाचा योग... "

मुंगळा डसल्याप्रमाणें हाताला हिसडा मारून सुंदराबाई मागें सरकल्या. त्याचा चेहरा रागानें लालबुद झाला, ओठ थरथर कापूं लागले. काहींतरी निभावणी करायची म्हणून मी म्हणालों,

" हातात जें दिसलं तें मीं सांगितलं. "

पुढें काहीं सुचेना म्हणून टकलावरून उजव्या हाताचा तळवा फिरवीत मी उभा राहिलों. रागाची उबळ कमी झाल्यावर सुंदराबाई बोलूं लागल्या,

" हें पहा मास्तर, मला तुमचे चाळे समजतात. अगदीं आल्या दिवसापासून मी तुम्हांला ओळखून आहे. तुमचीं तीं आचरट गाणीं, तीं चावनट पुस्तकं देणं, सगळं सगळं मला कळत होतं. पण म्हटलं आपल्याला काय करायचय् ! राहातात शेजारीं, शिकवतात शातारामला म्हणून मीं तुमची गय केली. पण आज अगदीं ताळच सोडला तुम्हीं. आज सांगून ठेवतें मी तुम्हांला, हा असला पाणचटपणा मला इथून पुढं खपायचा नाहीं. "

शाळा तपासणाऱ्या दिपोटीला न टरकणारा आणि हेडमास्तरचे तीन तेरा अन् नऊ बारा करणारा मी; पण अगदीं चूप बसलों. जीभ कशी

टाळयाला चिकटून बसली होती, अन् नाहीतरी बोलणार काय? थोडासा दम खाऊन त्या पुढें म्हणाल्या,

" म्हटलं मला जगांत कुणी भाऊ नाहीं. बरा शेजारींच भाऊ भेटला. ते गेल्यापासून मला निदान तरी शंभरजणांनीं लग्नासाठीं हटकलं. आता मेली ही पुन्हा लग्न करण्याची पद्धत निघाली ना! म्हणे विधवाविवाह, पुनर्विवाह, एक ना दोन! मला सळो कीं पळो करून सोडलं मेल्यांनीं. म्हटलं, तुमच्या डोक्यात तरी हें वेड नसेल. पण सारे एकाच माळेचे मणी! आता म्हातार पणी तुम्हाला कशाला हे थेर पाहिजेत!"

इतक्यांत जिन्यामध्यें शातारामचे पाय वाजूं लागले. त्या पोराच्या देखत आपली शोभा नको म्हणून मीं चट्दिशीं काढता पाय घेतला आणि खोलीत येऊन कॉटवर अंग टाकलें.

आतां हाच प्रसंग घ्या. माझ्या जागीं एखादा तरुण असता तर तो पार नाउमेद झाला असता. दुसरी खोली पाहून त्याने लागलीच आपले बिऱ्हाड हलवलें असते.

पण आम्ही? छे! एवढ्यानें काय झालेय्! सुरवातीला जरा वाटले थोडेसें वाईट. अगदींच नाहीं असें नाहीं म्हणता येत. पण याच प्रसंगातून आतां कोणता मार्ग काढावा याचा मी जारीने विचार केला.

दुसरे दिवशीं सकाळीं खोलीचें दार व खिडक्या न उघडतां तसाच पडून राहिलों. आंघोळीला वगैरे फाटा दिला. रोजच्या वेळेला दप्तर घेऊन शाताराम आला. त्यानें हाक मारल्यावर कॉटवरून उठून दार उघडलें आणि पुन्हां पांघरूण घेऊन पडून राहिलों. शांताराम आपल्याशीच चुळबुळ करीत तसाच उभा राहिला होता. जराशानें मी त्याला कण्हत कण्हत म्हणालों.

" 'शांताराम, आज नको अं बाळ शिकवणी. रात्रीपासून ताप चढलाय् मला. पहाटे तर एकशेंचार होता. रात्रभर डोळयाला डोळा नाहीं. हा चार दिवसांच्या रजेचा अर्ज लिहून ठेवला आहे मीं. तेवढा शाळेंत गेल्या-बरोबर हेडमास्तरांना दे. जा तूं आतां."

शांताराम अर्ज घेऊन निघून गेला. तो सबंध दिवस मी खोलीच्या बाहेर न पडतां आंतल्या आंत बसून घालवला.

संध्याकाळीं शाळेतून परत आल्याबरोबर शांताराम खोलीत आला.

" मास्तर, मावशी म्हणते, कीं डॅाक्टरला बोलावणं पाठवायचं का ?

दाराबाहेर काकणांचा झालेला आवाज मीं ऐकला आणि जोर कण्हायला सुरवात केली.

"नको रे बाबा, डॅाक्टर नको अन् औषध नको. आहे तें ठीक आ जा तूं आतां. मला स्वस्थ पडूं दे."

शातराम बाहेर गेला. दाराबाहेर कांहींतरी कुजबूज झाली. तिकडे ल नाहीसें दाखवून मी आईला आणि रामाला हाका मारीत राहिलों,

"हरे राम ! अग आई ग ऽ !"

पुन्हां आत येऊन शातराम म्हणाला,

"मास्तर, काहीं खायला आणूं का ? थोडीशी भाताची पेज नाहीं साबुदाण्याची खीर ?"

" अंहं, मला काहींच खायची इच्छा नाहीं."

असें म्हणून मी त्याच्याकडे पाठ वळवून पडून राहिलों. तें पोर मुकाट्य निघून गेलें.

चोवीस तास अन्नावांचून गेले. पोटांत नुसती आग भडकली होती. प अजून थोडी कळ काढण्याखेरीज इलाज नव्हता. रात्रीं नवाच्या पुढें शेजा सामसूम झाल्यावर मी हळूच उठलों आणि खाणावळींत जाऊन यथे ताव मारला. दुसऱ्या दिवसाच्या प्राणांतिक उपोषणासाठीं भरपूर मिठ व फळें खरेदी केली आणि पुन्हां मघाप्रमाणें पाय न वाजवता खोली येऊन कॅाटवर पडलों आणि दिली तण्णावून !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शांतारामने येऊन कालच्याप्रमाणेंच मावशीप्रे आग्रह केला. पण त्याला माझ्याकडून कण्हण्याखेरीज काहींच उत्तर मिळा नाहीं. दुपारीं बारा वाजता खोलीला आतून कडी लावून रात्रीं आणलेल मिठाईचा आणि फळांचा फडशा पाडला आणि पडून राहिलों. रा पुन्हां खाणावळींत जाऊन दोन वेळचें जेवून घेतलें. अशा रीतीनें माझ आजारीपणाचे दोन दिवस लोटून तिसरा दिवस उजाडला. आज

शांतारामच्या हाकांना दाद न देतां दाराची कडीच उघडली नाहीं! दाराबाहेर काकणांचा आवाज येत होता. माझें कण्हण्याचें संगीत सुरू होतें.

इतकी तपश्चर्या ( निराहार ) केल्यानंतर कैलासांतला शंकर खालीं उतरून आला असता, मग सुंदराबाईची काय गोष्ट! दुपारीं दोन वाजतां दारावर थाप पडली. गोठपाटल्या व बांगड्या याचा सामिश्र किणकिणाट झाला. तरीपण उठलों नाहीं. सुंदराबाईनीं हाक मारली.

" मास्तर, दार उघडा. "

" अग आई ग " करून मी दार उघडलें आणि चालताना हेलपाटे खात कॉटवर येऊन पडून राहिलों. सुंदराबाई माझ्या उशाशीं येऊन बसल्या. मीं डोळे वासून वर छताकडे पहात राहिलों.

" मास्तर, हें काय चालवलय् तुम्हीं? डॉक्टरला बोलावून औषधपाणी कां घेत नाहीं? "

" काय करायचंय् औषध घेऊन? "

" वा, म्हणजे हें काय बरं का? "

" सुंदराबाई, मला आता जगायची इच्छा नाहीं. आटोपलं...संपलं! "

" असं नका बोलूं मास्तर. तुम्हाला तें माझं बोलणं इतकं जिव्हारी लागेल हें नव्हतं माहीत मला. माझी जीभ मेली अशीच दळभद्री आहे. आतां असं करा. तुम्ही बरे व्हा लौकर. डॉक्टरला बोलावून काहीं औषधबिवषध घ्या. माझी शप्पथ आहे तुम्हाला. पाठवूं का डॉक्टरला निरोप? "

सुंदरबाईचे डोळे पाण्यानें डबडबले होते. अश्रूंचे एकदोन थेंब माझ्या टकलावर पडले. मग मी म्हणालों,

" आता तुम्ही इतकं हें म्हणता म्हणून तुमच्या शब्दाखातर घेतों औषधपाणी. डॉक्टरला निरोप नका पाठवायला. मीच जातों बाटली घेऊन. "

" अहो, मी एवढी धर्माची बहीण असताना... "

" तेवढं नका बोलूं. नाहींतर मी नाहीं जात डॉक्टरकडे. "

"बरं राहिलं. नाहीं तसं बोलत. उठा आतां तुम्ही. जा, औषध घेऊन या. तोंपर्यंत मी तुम्हांला थोडंसं खायला करून ठेवतें. तीन दिवसांचा उपवास म्हणजे काय बाई हा आक्रस्ताळेपणा!"

कॉटवरून उठून मी झोकांडे खात खात कोट व टोपी चढवली, गळ्याला मफलर गुंडाळला आणि हातात काठी घेऊन बाहेर पडलों. सुंदराबाईंनीं खोलीचें दार लावून घेतलें. जिन्याकडे जाताना एक जंगी झोकांडा घेतला. पण सुंदराबाईंनीं हात पुढें करून ते लगेच चमकून मागें घेतल्यामुळे माझा मींच तो झोकाडा सावरून घेतला आणि खाली उतरलों. थोडा वेळ पाय मोकळे केल्यानंतर रस्त्यावरल्या एका नळाचे पाणी बाटलींत भरून घेतलें आणि मागे फिरलों. जिना चढताना भाजलेल्या रव्याचा खमंग वास वरून येत होता. जिना चढून धडपडत खोलीपर्यंत आलो. सुदराबाईंनीं बाहेर येऊन माझ्या खोलीच्या दाराची कडी उघडून दिली आणि म्हणाल्या,

'आलेंच हं मी इतक्यात.'

जराशानें शिऱ्यानें भरलेली बशी घेऊन त्या खोलींत आल्या. नको नको म्हणत मी चाखतमाखत शिऱ्याचा एकएक चमचा खाऊं लागलों. लहान मुलाला भरविणाऱ्या नजरेनें सुंदराबाई माझ्याकडे पहात होत्या.

"काय म्हणाले डॉक्टर?"

"हें दिलय् औषध." पाण्याच्या बाटलीकडे बोट करून मी भरल्या तोंडानें बोललो.

"नाहीं, पण ते काय म्हणाले?"

"ते म्हणाले, तुमच्या मनाला काहींतरी एक भयंकर धक्का बसलेला आहे तुमच्या जिवाभावाच्या माणसानं तुम्हाला दुखावलेलं आहे. दोनतीन दिवस औषध घ्या, पण नुसत्या औषधानं कांही बर वाटणार नाही. तुमच्या मनाला झालेली जखम त्याच माणसाच्या हातून झाली तर नीट होईल. नींहात तुमचे कोणी सगेसोयरे असतील त्याना पत्र पाठवून बोलावून घ्या. आन आज रात्रीं अकराच्या सुमारास एक जोराची फीट येण्याचा संभव आहे त्या वेळीं कोणाला तरी तुमचं मस्तक हातानं चोळायला सागा. तेवढी वेळ निभावली म्हणजे टळेल."

एवढें बोलून मीं शिऱ्याची चांगलीं अर्धीपाऊण बशी बाजूला सारली. सुंदराबाईनीं एका कपांत औषधाचा डोस दिला तो तोंड वेडेंवाकडें करीत घेतला आणि पांघरूण घेऊन पडून राहिलों. सुंदराबाई अवघडल्यासारख्या खालींच बसून राहिल्या म्हणून माझें डोकें दुखू लागले. तसे मीं त्याना सांगितलें. त्यानीं सुंठीचा तुकडा आणून तो सहाणेवर उगाळला आणि कपाळावर लेप लावला. एवढें झाल्यावर त्या पुन्हा खालीं बसून राहिल्या म्हणून माझ्या छातींत दुखायला लागलें. तसें मी त्याना सांगितले. मग त्यानीं शेगडी पेटवून एक विटकरीचा टोला तापविला आणि माझी छाती शेकूं लागल्या. शातारामची शाळेंतून परत यायची वेळ झाली तेव्हा माझी छाती दुखायची थाबली आणि मला झोप येऊं लागली. मग त्या निघून गेल्या.

त्या दिवशीं रात्रीं मला जेवायला जाण्याची इच्छाच झाली नाहीं. सारी भूक पळाली होती. इथून पुढें खाणावळींत जेवायचे कीं घरीं, हा महत्वाचा प्रश्न पोटाला पडल्यामुळे त्याने कुरकुर केली नसावी. रात्रींचे दहा वाजून गेले. शेजारीं सामसूम झाली होती. परंतु सुंदराबाई झोपल्या नाहींत ही माझी खात्री होती. पलिकडच्या घरांतल्या मोठ्या घड्याळयात अकराचे टोले पडले आणि मी सावरून बसलों. जीव मुठींत धरून तोंडाने किंचाळून मी कॉटवरून खाली उडी मारली. दाराची कडी उघडीच ठेवली होता. जमिनींवर हातपाय आपटीत मी उताणा पडून राहिलों. थोड्याच वेळात माझ्या खोलीचे दार उघडलें गेलें आणि सुंदराबाई लगबगीनें आंत आल्या. दिवा मालवलेला होता. उघड्यां खिडकीतून चंद्राचा मंद प्रकाश आंत शिरत होता; त्यामुळें पुसट पुसट दिसत होते. खालीं बसून सुंदराबाईनीं माझें डोकें आपल्या मांडीवर घेतलें आणि घाबरलेल्या आवाजांत म्हणाल्या,

" मास्तर, मास्तर! असं काय करता? काय करावं बाई आता!" मी पूर्ववत् जमिनींवर हातपाय आपटीत होतो. मी दुपारी सांगितलें त्याची सुंदराबाईना आठवण झाली असावी! कारण त्यानी आपल्या हाताच्या तळव्यानें माझा टक्कल पडून साफ झालेला मस्तकाचा भाग जोरजोराने चोळायला सुरवात झाली. थोड्या वेळाने मी हातपाय आपटणें जरा कमी केलें. सुंदराबाईचा चोळण्याचा सपाटा जोरानें चालला होता. माझ्या मस्तकाची आग व्हायला लागली होती पण कांही इलाज नव्हता. जराशानें

मी स्वस्थ पडून राहिलो आणि त्याचाहि चोळण्याचा सपाटा कमी झाला. असा थोडा वेळ गेल्यानंतर सुंदराबाईंनीं चमकल्यासारखें करून माझें डोकें उचललें आणि आपल्या मांडीवरून खालीं ठेवलें. लगेच मला जोराची फीट आली. पुन्हा मांडीवर डोकें आणि मस्तक खसाखस चोळणें !...मग त्यांनीं पुन्हां माझें डोकें खालीं ठेवण्याचा प्रयत्न केला नाहीं. पहाट होऊन थंडगार वारा वाहूं लागला. उगवतीला फटफटूं लागलें.

अशी झाली आमच्या लग्नाची गंमत !

★

## फटाकडी : : : ५

अकरा वाजण्याचा सुमार. कॉलेजची वेळ झाली होती. खाणावळींतलें कायम ठशाचे अन्न अचावचा खाऊन मी हात धुतला; मालकाच्या टेबला-वरील बशींतून सुपारीचीं दोन खाडे उचलून तोंडात टाकलीं आणि बडीशेपेचा बकाणा मारून मी बाहेर पडलों. इतक्यात मोटार सायकलचा रोजच्या ओळखीचा फट्फट् असा आवाज कानांवर आला. आमच्या कॉलेजमधली नायिका सुषमा तळेकर मोटार सायकलवरून भर वेगानें कॉलेजकडे चालली होती. आपल्या फटफटीच्या आवाजानें सारा रस्ता गर्जवीत ती एका क्षणात माझ्यासमोरून गेली; पण तिचे गडद डाळिंबी रंगाचें पातळ, त्याच रंगाच्या फिकट छटेचा बिनबाह्यांचा झंपर, कानात लाल खड्याचे डूल व पायात लालभडक सॅंडल्स ही तिच्या वेषभूषेची झकपक माझ्या नजरेतून सुटली नाही ! पोशाखातली रंगसंगति साधावी अशी सुषमेनेंच ! तोंडातली बडीशेप चघळायचें विसरून मी तिच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पाहातच राहिलो. तिचे बॉब केलेले पिंगट रंगाचे केस वाऱ्यानें उडून तिच्या मानेवर झिपकारत होते. पलिकडच्या वळणावर तिची मोटार-सायकल दिसेनाशी झाली. मीं खोलीवर जाऊन अंगात कोट चढवला, पुस्तकें हातात घेतली आणि घाईघाईने कॉलेजकडे निघालो.

सुषमा तळेकर म्हणजे एक और छोकरी होती. आपल्या फटफटीवरून ती कॉलेजच्या फाटकांतून आंत शिरली कीं कॉलेजच्या आवारांत थवे करून उभे राहिलेल्या मुलांच्या गप्पाझप्पांत खंड पडे व त्याचे डोळे गरॉदिशीं तिच्याकडे वळत फटफटीवरून उतरून सुषमा सरळ पोर्चमध्ये शिरे. तिच्या दृष्टीनें सारी पुरुषजात म्हणजे कःपदार्थ! ती पायऱ्या चढून वर जाताना किती डझन हृदयें तिच्या उंच टाचेच्या सँडलखालीं रगडलीं जात याचा हिशोबच नाहीं करतां यायचा!

प्रत्येक बाबतीत सुषमेचे पाऊल पुढें असे. ती टेनिसची चँपियन होती. बॅडमिंटन खेळायला तिला कमीपणा वाटत असे. आणि यंदा तर कॉलेजच्या क्रिकेटच्या टीममध्ये शिरकाव करून घ्यावा असा तिचा बेत होता. खेळण्यांत जशी ती आघाडीवर, तशी इतर बाबतींतहि ती पुढेंच होती. गेल्या सालीं प्रीव्हियसच्या परिक्षेत तिनें पहिला वर्ग पटकावला होता. याशिवाय कॉलेजच्या त्रैमासिकांत तिनें लिहिलेलीं दोन गद्यकाव्यें झळकलीं होतीं. मीं त्यांचा अर्थ लावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण अखेरीस तो नाद सोडून दिला. गद्यकाव्येंच तीं! वादविवादसभेत सुषमा हिरीरीनें भाग घेई. ती स्टेजवर उभी राहिली कीं लाह्या काय फुटतात असें बोले. मीं तिला आमच्या कॉलेजमधली नायिका असें जें म्हटलें तें उगीच नाहीं. कॉलेजमधलीं सारीं मुलें तिला 'फटाकडी' या नावाने ओळखीत.

...फटाकडी! खरेच फटाकडी!!

सुषमेसंबंधी विचार करीत मी चाललों होतों. पण असे हे विचार करणारा मी कोण? माझीहि थोडीशी ओळख करून द्यायला पाहिजे ना! ना आगा ना पिछा असा मी एक गरीब विद्यार्थी. आई व बाप लहानपणीच वारले होते. थोरामोठ्यांच्या घरीं कामे करून माझ्या शिक्षणाचा गाडा मीं कसातरी लोटीत बी. ए. च्या फाटकापर्यंत आणला होता. पण मी हुषार बरीक होतों हं!—म्हणजे आहें. नादारी, बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळाल्या नसत्या तर कॉलेजचें शिक्षण परवडलेंच नसतें मला. याशिवाय खिसा-खर्चासाठीं मी एखादी शिकवणीहि करीत असे. मात्र हें वर्ष सीनिअरचें असल्यामुळें मीं यंदा शिकवणीला फाटा दिला होता.

सुषमेला मी गेल्यावर्षापासून बघत होतों; पण इतर मुलांप्रमाणें भिरभिर भिरभिर नव्हे हो ! मी हा असा भणंग. आजचा दिवस गेला, आता उद्याचा कसा जाईल ही मला काळजी. तिची ओसंडणारी श्रीमंती, तो तिच्या सौंदर्याचा लखलखाट, तो तिचा मर्दानी बडेजाव ! मला तिची अभिलाषा कशी वाटणार ? तिच्या डोळयाना डोळा लावण्याचें धैर्य मला अजून झालें नव्हतें. पण आज मात्र तिच्याशी बोलावयाचे असें मीं ठरावलें होतें. कॉलेजचें वर्ष नुकतेच सुरू झाले होते. निवडणुका जवळ आल्या होत्या. वादाविवाद-सभेच्या चिटणिशीच्या जागेसाठी मी उभा राहिलो होतों. एक धिमा व अभ्यासू विद्यार्थी म्हणून मला सर्वजण ओळखीत. बोलण्याचा बरा सराव असल्यामुळे मला पाठिंबा चागला होता. मुलाचीं पुरेशीं मते मिळ-तील अशी मला अपेक्षा होती. प्रश्न होता मुलींच्या मताचा. कोणत्याच मुलीला मी अजून भेटलो नव्हतो. सुषमेपासून सुरवात करावी असे मीं योजून ठेविले होतें.

कॉलेजची घंटा वाजली. मी वर्गात शिरलो. पण आज माझें शिकण्याकडे लक्ष नव्हते. सुषमेशीं कधी बोलावें. कुठे बोलावें, कसे बोलावे आणि काय बोलावें या विचाराची मनात भवति न भवति चालली होती. तिन्ही तास संपून गेले तरी मी विचारच करीत होतों.

कॉलेज सुटलें. मुली ताफ्याताफ्याने बाहेर पडल्या. मुलें आवारांत घुटमळूं लागलीं. सुषमा जी सरळ निघाली ती सायकल शेडजवळ गेली व आपल्या डाव्या पायानें मोटार-सायकल स्टार्ट करूं लागली. फाड्फाड् असा आवाज कॉलेजच्या आवारात घुमूं लागला. मी हिय्या करून तिच्याजवळ गेलों व उभा राहिलों. तिने आपल्या भिवयाना प्रश्नार्थक मुरड देऊन माझ्याकडे पाहिलें. मी म्हणालो, "मी अबादास गाजरे. माझं तुमच्याशीं थोडंसं काम आहे."

न ऐकल्यासारखें करून तिने आपल्या डाव्या पायाला एक जोराचा हिसका दिला. मोटार-सायकल स्टार्ट झाली. मागच्या नळकाड्यातून धूर निघूं लागला. सुषमा सायकलवर स्वार झाली. तिच्या उपेक्षेनें माझा जीव कासावीस होऊं लागला. पाय पॅडलवर ठेवीत तिनें माझ्याकडे पाहिलें व ती म्हणाली, "संध्याकाळीं माझ्या बंगल्यावर येऊन भेटा."

संध्याकाळीं पांच वाजतां मी डेक्कन जीमखान्यावरल्या सुषमेच्या भव्य बंगल्यावर गेलों. दारावलें बटन दाबून मीं माझ्या आगमनाची वर्दी दिली. गड्यानें दार उघडलें. मी जिना चढून वर गेलों. एका मोठ्या आरशासमोर उभी राहून सुषमा आपले कमी तेल लावलेले आखूड केस कंगव्यानें विंचरीत होती. तिनें वायलचें पांढरें शुभ्र पातळ गुंडाळलें होतें. तिच्या अंगांत दोरव्याचा पांढरा झंपर होता. आरशांतल्या माझ्या प्रतिबिंबाकडे पाहून ती म्हणाली, "बसा."

मी एका दुलदुलीत कोचावर चोरूनमारून बसलों. चेहऱ्यावर पॉवडरचे फपकारे मारण्याचें काम संपल्यावर सुषमेने माझ्याकडे तोंड वळवलें व ती म्हणाली, "काय काम आहे तुमचं ?"

"आपल्या कॉलेजमधील वादविवादसभेच्या चिटणिशीच्या जागेसाठीं मी एक उमेदवार म्हणून उभा राहिलो आहें; तरी आपलं मत..."

तुम्हांला बोलतांना मीं ऐकलं आहे. बरं बोलतां तुम्ही."

"मग आपलं मत मला मिळेल का ?"

तें नाहीं जमायचं." सुषमेचें उत्तर ऐकून मी सर्दच झालों. ती पुढें म्हणाली, "कारण त्या जागेसाठीं मी स्वतःच उभी राहणार आहे. तुमचं स्वतःचंच मत तुम्हीं मला दिलं पाहिजे."

"माझं मत ?" मीं चाचरत विचारलें.

"हो, तुमचं मत. अर्थात् तुम्ही त्या जागेसाटीं केलेला अर्ज जर मागं घेतला तर..."

"अस्सं होय ! बरं, मी जातों."

मी मुकाट्यानें खालीं उतरलो. इतक्यात दरवाजाची घंटी वाजली. गडी खालीं उतरण्याच्या आत मीं दरवाजा उघडला. माझ्यासमोर बापूराव पिंगळे उभा होता. मला पाहतांच त्याने सरबत्ती सुरू केली, "हॅलो ! कोण अंबादास ? तूं इकडे कसा ? या अंबेचा दास तूं कधीपासून झालास ?"

"थोडंसं काम होतं."

"फटाकडी आहे का बर ?" बापूरावाने विचारले.

मीं मान हलविली व त्याला विचारलें, “पण बापूराव, तूं कसा इकडे?”

“क्रिकेटच्या सेक्रेटरी होण्याचा माझा विचार आहे. या बयाचं मत मागायसाठीं आलो. क्रिकेटचं खातं म्हणजे नंबर एकचं खाबू. याशिवाय मौज नाही बाबा.” उजव्या हाताच्या दोन बोटानीं रुपया वाजविण्याचा अभिनिवेश करीत बापूराव उद्गारला.

“अच्छा! गुड् लक्!” असें म्हणून मी सटकलों.

बापूराव पिंगळे म्हणजे आमच्या कॉलेजमधला खेळाडू व अतिशय आनंदी प्राणी शरिरानें तो पुरेपूर उंच व दांडगादुंडगा होता. आपल्या उंच कपाळावरून केस उलटे फिरवण्याची त्याची लकब डोळयांत भरण्या-सारखी होती. त्याच्या रुंद चेहऱ्याला मिशाचा लष्करी कट शोभून दिसत असे. त्याचा पोशाखाची टापटीप वाखाणण्यासारखी होती. त्याचा आवाज एखाद्या घंटेसारखा खणखणीत होता; आणि निष्कारण उच्च आवाजांत बोलण्याची त्याला खोड होती. कुणालाहि थाबवून त्याच्याशीं तोंडभर हसल्याबोलल्याशियवाय तो सोडीत नसे. सर्व खेळांत तो दर्दी म्हणून समजला जात असे. अभ्यासाच्या बाबतींत मात्र ‘वेळचं मिळत नाहीं’ ही सबब तो पुढें करी. आम्ही एकाच वर्गात होतों. अनेक टप्पे खात तो या वर्गापर्यंत येऊन पोचला होता. थोडक्यात सांगायचें म्हणजे सुषमा ही जशी आमच्या कॉलेजची ‘हिरॉइन, त्याचप्रमाणें बापूराव हा कॉलेजचा ‘हिरो’ होता.

मी खोलीवर आलों आणि बराच वेळ विचार करीत बसलों. वादविवाद-सभेच्या चिटणिशीसाठीं सुषमा जर उभी राहिली तर आपल्याला विचारतों कोण! उगीच हात दाखवून अवलक्षण नको. सुषमेबरोबर अहमहिका करण्यापेक्षां ती म्हणते त्याप्रमाणें अर्ज मागे घ्यावा हेंच ठीक. माझें उभें राहण्याचें अवसान पार खचलें. दुसऱ्या दिवशीं मीं अर्ज मागें घेतला व खालीं बसलों.

निवडणुकी झाल्या. मी माझें मत सुषमेला दिलें. सुषमा निवडून आली. बापूरावहि क्रिकेटचा सेक्रेटरी म्हणून निवडून आला. सुषमेचा क्रिकेटच्या

टीममध्यें शिरकाव झाला. स्त्री-भिडू असलेली आमच्या कॉलेजची ही पहिलीच टीम. पावसाच्या तुषारात क्रिकेटची प्रॅक्टिस सुरू झाली. बॅटी गरगरा फिरूं लागल्या. दाड्या कोलमडूं लागल्या. गवती बिछायतीवरून क्रिकेटचे चेंडू लोळण घेऊं लागले.

क्रिकेटचे परस्पर सामने सुरू झाले. आमचें कॉलेज व वाडिया कॉलेज यांमध्यें तगडबद स्पर्धा होती. वाडिया कॉलेजशी सामना म्हटला कीं क्रिकेटच्या मैदानावर मुलांची ही झिम्मड व्हायची आणि दोन्ही टीममधले गडी जीव तोडून खेळायचे. हा विशेष सामना पुढल्या आठवड्यात शनिवारीं होणार होता.

शनिवारचा दिवस. मैदानावर खूपच गर्दी झाली होती. दोन तंबू उभारले होते. त्यांत दोन्ही कॉलेजमधले प्राध्यापक, खेळाडू व पुढारीपण घेणारीं मुलें बसलीं होतीं. आमच्या कॅप्टननें टॉस जिंकला. खेळ सुरू झाला. वाडिया कॉलेजच्या टीममध्यें रुस्तुम बाटलीवाला हा नामांकित बोलर होता. त्याच्या चेंडूफेकीला आमचे खेळाडू टरकून होते. आमच्या पहिल्या गड्यानें दहा धावा काढल्या आणि रुस्तुमनें त्याला बाद करून पाठविलें. दुसरा गडी पाच धावा काढल्याबरोबर खालीं बसला. नंतर बापूराव पुढे गेला व धीमेपणानें खेळूं लागला. बापूरावाचा जोडीदार नऊ धावा काढून तंबूत परत आला. फळ्यावरली धावांची सख्या काही चढेना. शेजारच्या तंबूत टाळ्या कडकडूं लागल्या. आमच्या तंबूंतलीं तोंडें हिरमुसूं लागलीं.

बापूराव पिंगळे व बबन साठे बॅटिंग करीत होते. बबन साठे टोले लगावूं लागला. बापूरावानें चिकाटी लावून धरली. वाडिया कॉलेजमधले खेळाडू डोळ्यांत तेल घालून फील्डिंग करूं लागले. कॅप्टनच्या सांगीवरून सुषमेने पायांना पॅडस बांधलीं व ती तयार झाली. रुस्तुमनें बबन साठेचा बळी घेताच सुषमा हातात बॅट घेऊन पुढें सरकली. टाळ्यांचा कडकडाट झाला. फुल शर्ट व पांढरी पॅंट या पोशाखांत सुषमा एखाद्या कोवळ्या पोरासारखी दिसत होती. भुऱ्या केसांच्या बटा पुंडगिरी करून तिच्या गालांना कुरवाळीत होत्या. एखाद्या संस्थानच्या राणीप्रमाणें उद्दाम पावलें टाकीत सुषमा पुढें गेली.

सुषमेनें बापूरावाकडे हसून पाहिलें आणि ती बॅट सावरून उभी राहिली. बापूराव धाव काढण्याच्या तयारीत उभा राहिला. रुस्तुमनें स्टार्ट घेऊन चेंडू फेकला. सुषमेने बॅट उचलली. चेंडू झपाट्यानें तिच्याजवळ गेला; पण बॅटीचा आणि त्याचा समन्वय झाला नाहीं. तो सरळ दांडीवर जाऊन आदळला. पहिल्याच चेंडूनें सुषमा बाद झाली. शेजारच्या तंबूंत हशा आणि टाळ्या याना ऊत आला. अमच्या तबूंत 'च्‌ च्‌,' 'अरेरे' आणि सुस्कारे सुटले बापूरावाचा चेहरा खरदिशी उतरला. सुषमा गोरीमोरी झाली. रुस्तुम खो-खो हसूं लागला.

सुषमेनें रुस्तुमकडे संतापानें पाहिले. तो जास्तच मोठ्याने हसून तिला म्हणाला, "मिस् तळेकर, हा पुरुषाचा खेळ आहे. इथं बायकाचं काही काम नाहीं."

"शट् अप्!" सुषमा त्याच्यावर खेकसली.

बापूराव तांबारलेल्या नजरेनें रुस्तुमकडे पहात होता. सुषमा तांबडीलाल पडली होती. रुस्तुमला आणखी जोर चढला व तो सुषमेला खिजवीत म्हणाला, "ही बॅट तुमच्या हातात चागला नाहीं दिसत. तुमी हातात लाटणं घ्या लाटणं!"

बापूरावाचा संतापाने तोल सुटला. त्याने हातांतली बॅट टाकून दिली, जवळचा स्टम्प उपसून घेतला आणि तो रुस्तुमच्या अंगावर धावला. बापूरावानें रुस्तुमच्या अगावर स्टम्पनें तडाखे लगवायला सुरवात केली. रुस्तुम गुरासारखा ओरडूं लागला. फील्डिंग करणारे इतर खेळाडू त्याच्या मदतीला धावले. दोन्ही तंबूंतले लोक भराभर धावत मैदानावर गेले. हां हां म्हणता मारामारीला जंगी स्वरूप आलें. साऱ्या मैदानावर एकच हलकल्लोळ उडाला. चवताळलेल्या वाघाप्रमाणें बापूराव जवळ येईल त्याला बदडीत होता. त्याच्या अंगावर बसणाऱ्या टोल्यांची त्याला दिक्कत नव्हती. सुषमा बाजूला उभी राहून बापूरावाकडे कौतुकानें पहात होती. तिच्या डोळ्यात प्रेम, आदर व भीति यांचें मधुर मिश्रण तरळत होतें.

दोन्ही प्रिन्सिपॉलनीं व प्राध्यापकांनीं बरीच कोशीस केल्यावर मैदानावर शांतता झाली. रुस्तुम रक्तबंबाळ होऊन खालीं पडला होता आणि मोठ्यानें

विव्हळत होता बापूरावाला बराच मार लागला होता. पण साठमारी करून विजयी झालेल्या बैलाप्रमाणें सुस्कारत तो उभा होता. बाकी कोणाला विशेष लागलें नव्हतें. सुषमा बापूरावाजवळ जाऊन त्याला बिलगून उभी राहिली.

ॲम्ब्युलन्स गाडीमधून रुस्तुमला दवाखान्यांत पोचविण्यांत आलें. सामना अर्धवटच राहिला. दोन्ही कॉलेमधल्या स्पर्धेला तिखट स्वरूप आलें.

कांही दिवसानीं रुस्तुमच्या जखमा बऱ्या झाल्या. प्रिन्सिपालनें नेट धरल्यामुळे बापूरावानें त्याची मामुली स्वरूपात माफी मागितली. दोन्ही कॉलेजामध्यें तात्पुरता समेट झाला. बापूरावाची लोकप्रियता वादळी वाऱ्याप्रमाणें वाढूं लागली. त्याच्या तपश्चर्येचें फळ त्याच्या आटोक्यात आलें. साऱ्या पुरुषजातीशीं फटकून वागणारी फटाकडी त्याच्यापुढे नरम आली. प्रखर विष धारण करणाऱ्या इंगळीने बापूरावापुढें नांगी टाकली ! सुषमा मोटारसायकलवर बसली असून तिच्या पाठीमागच्या सीटवर बापूराव तिच्या खांद्यावर हात टाकून बसला आहे, हें दृश्य आम्हांला वारंवार दिसूं लागलें.

सहामाही परीक्षा संपली. दिवाळीची सुट्टी सुरू झाली. मी कंबर मोडून अभ्यासाला लागलों. बापूरावाला अभ्यासाची घम नव्हती. प्रणयाच्या रेशमी बोटांनीं त्याचे डोळे झाकले होते. आतापर्यंत वर्गातल्या पोरींच्या रांगेंत कागदाचे बाण फेकणारा हा मर्द खऱ्याखुऱ्या पुष्पबाणांनीं जर्जर झाला होता.

दुसरी टर्म सुरू झाली. बापूरावाचें व सुषमेचें संघटन जास्त वाढूं लागलें. मीं तिला मनोमन सौ. पिंगळे असें ठरवून टाकलें. बापूराव नशीबवान तर खराच ! तो बंगला सुषमेच्या स्वतःच्या मालकीचा होता. तिच्या घरीं वडील माणसें कुणीच नव्हतीं. कोर्ट ऑफ वार्डस्‌मध्ये तिच्या नांवावर चाळीस हजार रुपयांची रक्कम आहे अशी गुणगुण मला समजली होती.

परीक्षा संपल्या. लगोलग उन्हाळ्याची सुट्टीहि गेली. परिक्षाचे निकाल लागले. मी दुसऱ्या वर्गात पास झालों. सुषमा इंटरच्या परिक्षेंतून निसटली. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें बापूराव नापास झाला; पण त्याला खंत वाटलीसें दिसलें नाहीं.

जूनमध्यें कॉलेजचें फाटक उघडलें. सुषमा ज्यूनिअरच्या वर्गात गेली. बापूरावानें पुन्हा पाहिले पाढे सुरू केले. कॉलेजचा संबंध संपला म्हणून मीं

सुखंमिश्रित दुःखाचा निश्वास टाकला व पोटापाण्याच्या तयारीला लागलों. अर्ज, वशिले, मुलाखती व शेवटीं नकार या ठराविक चाकोरींतून मी चकरा खाऊं लागलों. अखेरीस मुंबईच्या एका प्रकाशन-संस्थेचा फिरता प्रचारक म्हणून मला नोकरी लागली. पगार शंभर रुपये म्हणजे पुष्कळच बरा असें म्हणायला पाहिजे. याशिवाय भत्ता मिळे तो निराळाच.

पुस्तकाचे गठ्ठे घेऊन मी गावोगाव फिरूं लागलों. निरनिराळ्या शिक्षण-संस्थाच्या अधिकाऱ्याना भेटणें, त्याच्यापुढें पुस्तकांचा पसारा माडणें, पुस्तकांच्या गुणाची तोंड फाटपर्यंत स्तुति करणें आणि ऑर्डरी मिळविणें या कामाचा मला सराव झाला. माझी जुनी खोली मीं अजून ठेवली होती. फिरतीखेरीज इतर दिवस मी पुण्यातच घालवीत असे. कॉलेजमधील जीवनाच्या माझ्या आठवणी पुसट होऊं लागल्या. बापूराव व फटाकडी ही अविभाज्य दुक्कल मात्र मधूनमधून फटफटीवरून फिरताना दिसे. मला पाहिलें की बापूराव फटफटीच्या आवाजाला जिरवील अशा आवाजात ओरडे, "हॅलो अंबादास ! कसं वाटतंय् ?"

"ठीक आहे." असे मी म्हणेपर्यंत त्याची फटफटी गल्लीच्या कोपऱ्यापर्यंत गेलेली असे. सुषमेने मात्र मला बघून आपल्या गालाची घडी कधीच मोडली नाही.

कॉलेजची पहिली टर्म संपली. दिवाळीची सुट्टी सुरू झाली. हायस्कूलसना सुट्टी लागायला अजून एक आठवडा अवकाश होता. तेवढ्यात धुळ्याला एक चक्कर मारण्यासबंधी साहेबाचा हुकूम सुटल्यामुळे मी पुस्तकाचे गठ्ठे घेऊन धुळ्याला गेलो. पुस्तकानी कातडी बॅग भरून मी तिथल्या हायस्कूल-मध्यें गेलों. हेडमास्तर कामात होते, म्हणून मी शिक्षकाच्या खोलीत गेलों व तिथे बसलेल्या दोन शिक्षकाशी गप्पा मारूं लागलो. इतक्यात माझ्या कानाचे पडदे हलले—

"हॅलो गणपतराव, कसं वाटतंय् ?"

मी उठून खिडकींतून बाहेर डोकावलें. नवशिखान्त साहेबी पोशाख केलेला बापूराव एका गृहस्थाशीं आपल्या खणखणीत आवाजांत बोलत होता. ते दोघे शिक्षकहि उठून खिडकीजवळ आले. त्यातल्या एकानें दुसऱ्याला विचारलें, "हे कोण ? इन्स्पेक्टर तर नाहीं ?"

" अरे, हे आपल्या हेडमास्तराचे जावई. " दुसऱ्या शिक्षकानें हसून उत्तर केले.

मी एकदम चपापलों ! बापूरावाला हाक मारून त्याच्याशीं बोलावें असा माझा विचार होता; पण मी लगेच मागें झालों व विशेष उतावळी न दाखविता त्या शिक्षकाजवळ विचारपूस करावयास सुरवात केली. तीनचार वर्षांपूर्वी बापूरावचें लग्न झालें असून हेडमास्तराना एक नातूहि आहे, असें मला समजले. माझा कानावर विश्वासच बसेना ! बापूराव निघून गेल्यावर मी देशपाडे हेडमास्तरांच्या खोलीत गेलें नेहमीच्या रीतीप्रमाणें मीं त्याना पुस्तकें दाखविलीं आणि माझे चऱ्हाट सुरू केलें. त्यांनीं कांहीं पुस्तकाची ऑर्डर दिली. तिची नोंद करून मी पुस्तकें परत बॅगमध्यें भरलीं व म्हणालो, " दिवाळी संपेपर्यंत जावईबुवाचा मुक्काम असेल ? "

" सीनिअरचं वर्ष. त्याना अभ्यासाची निकड आहे. येणारच नव्हते; पण छोकरा आजारी होता म्हणून मी बोलावून घेतलं. दोनचार दिवसानी जातील. तुमची अन् त्यांची ओळख आहे का ? "

" नाही. तसं कांहीं नाही. " असे म्हणून मी काढता पाय घेतला.

दुसऱ्या दिवशीं मी पुण्याला परत आलों. शाळाना सुट्टया लागणार असल्यामुळे मी तीन आठवडे मोकळाच होतो. माझ्या डोक्यात एकच विचार घोळत होता आणि तो म्हणजे बापूरावाची कारवाई. धुळ्याच्या लोकाना बापूरावाच्या पुण्यातल्या भानगडीचा पत्ताहि नव्हता. आणि आपल्या लग्नासंबंधी बापूराव पुण्यात कुणाजवळ कांहींच बोलला नव्हता. पहिल्या बायकोला माहेरी झुलवीत ठेवून दुसरी फटाकडी बायको व तिची इस्टेट लाटण्याचा बापूरावाचा बेत माझ्या पूर्णपणे लक्षांत आला. पण आता मी काय करावें ? बापूरावाचा बेत सिद्धीस जाऊं द्यावा का ? पदोपदीं गुर्मीनें वागणाऱ्या सुषमेचा आपोआप नक्षा उतरेल. पण... पण ...

वेळ जाईना म्हणून मी एके दिवशीं संध्याकाळी सिनेमा पहाण्यासाठीं डेक्कन टॉकीजमध्ये गेलों. तिकीट काढून मी आत जाऊन बसलों. अंधार झाला व पडद्यावर जाहिराती दिसूं लागल्या. इतक्यात बापूराव व सुषमा ही जोडी माझ्या समोरच्याच रांगेत येऊन बसली. त्याचें माझ्याकडे अर्थातच लक्ष गेलें नाहीं. सिनेमा सुरू झाला. जराशानें नायक आणि

नायिका याच्या प्रणयाचा प्रसंग पडद्यावर दिसूं लागला. बापूरावानें सुषमेच्या खांद्यावर हात टाकला. तीहि त्याला बिलगली. पडद्यावरचा सिनेमा ठीक होता; पण हा सिनेमा मला बघवेना !

मध्यंतरची पाटी दिसली. दिवे लागले. लोक बाहेर उठून जाऊं लागले. मला राहावेना. मीं बापूरावाच्या खांद्यावर हात टाकला. त्याने मागे पाहिले व तोंडभर हसून तो म्हणाला, " हॅलो अंबादास, कसं वाटतंय् ? "

" जरा बाहेर या. मला तुमच्याशीं थोडंसं बोलायचं आहे. " मी म्हणालो.

" चला. " असे म्हणून बापूराव उठला.

आम्ही दोघे बाहेर पडलों व व थिएटरच्या आवारांतल्या कारंजाजवळ उभे राहिलों. बापूरावानें विचारलें, " हं, काय ? "

" गेल्या आठवड्यात मी धुळ्याला गेलो होतों. तुम्ही दिवाळीसाठीं सासुरवाडीला थांबत नाहीं म्हणून देशपांडेमास्तर कुरकुरत होते. "

बापूरावाचा चेहरा खर्रदिशी पडला. त्याने मागें वळून पाहिलें. सुषमा दरवाजातून बाहेर आमच्याच रोखानें येत होती. बापूरावाच्या कपाळावरल्या शिरा ताठरू लागल्या. त्याने माझ्याकडे पाहिले. मी जवळ येणाऱ्या सुषमेकडे हसून पहात होतो. सुषमा जवळ आली व म्हणाली, " कसल्या खाजगी गोष्टी चालल्या आहेत ? "

मी आता तिच्याशी बोलणार हे पहाताच बापूरावाने उजवा हात उचलला आणि काडदिशी माझ्या कानशिलावर थप्पड मारली. हा इतक्या थराला जाईल अशी मला कल्पना नव्हती. मी गैरसावध होतो. त्या धक्क्याने मी कारंजाच्या चौथऱ्यावर आपटलो. माझ्या कपाळाला खोच पडली व तिच्यातून भळभळ रक्त वाहूं लागलें. लोक भराभर माझ्याभोवती गोळा झाले. माझ्या डोळ्यासमोर अजून काजवे चमकत होते. बापूरावानें माझा रुस्तुम करून टाकला होता !

मी कसाबसा उठून उभा राहिलों. बापूरावाने माझ्याकडे तिरस्कारानें पाहिलें व तो सुषमेला म्हणाला, " हलकट मनुष्य आहे. तुझ्यासंबंधीं वेडंवाकडं बोलत होता. मी आणखी मारणार होतो; पण आता जाऊं द्या. "

माझ्याकडे अत्यंत कडवट व तिखट नजर टाकीत सुषमा बापूरावाबरोबर आंत निघून गेली. एखाद्या लूत भरलेल्या कुत्र्याकडे पहावे त्याप्रमाणें भोवतालचे लोक माझ्याकडे पहात होते. घंटा वाजली. पडदे सरकले. लोक भराभर आत निघून गेले. मीं कपाळावरचे रक्त हातरुमालानें पुसलें व डॉक्टरच्या शोधार्थ बाहेर पडलों.

डॉक्टरकडे जाऊन मीं कपाळाला पट्टी लावून घेतली व पाय नेतील तिकडे हिंडूं लागलों. आतून विचाराची भिणभीण व बाहेरून जखमेचा ठणका यामुळें माझ्या डोक्याची फटफटी झाली होती. बराच वेळ हिंडल्या-नंतर एखादे थंड पेय घ्यावें म्हणून मी लकी रेस्टॉरंटमध्यें गेलो. माडीवरच्या एका खोलींत जाऊन मीं व्हिम्टोची ऑर्डर दिली. बॉयने थंडगार व्हिम्टोचा ग्लास टेबलावर आणून ठेवला. मी एक एक घोट पिऊं लागलों, इतक्यात शेजारच्या खोलींत कुणीतरी शिरले व बॉयला ऑर्डर मिळाली, " हॅलो बॉय, दो पुडिंग लाव. "

बापूरावच तो ! दोन पुडिंग म्हणजे सुषमा बरोबर असावी... होतीच ती. दोघेहि पुडिंगचा समाचार घेत बोलू लागले. दोन्ही खोल्यांमधली विभाजक फळी छताला भिडलेली नसल्यामुळे मला त्याचे बोलणे स्पष्टपणे ऐकूं येऊं लागले.

" तो हलकट गाजरे माझ्यासंबधी काय बोलत होता ? " सुषमा.

" जाऊं दे ! तें तुला सांगण्यासारखं नाही. " बापूराव.

" तुम्ही मात्र त्याची चांगलीच खोड मोडली. " सुषमा.

" आता पुन्हा तोंड उचलण्याची त्याची काय बिशाद आहे ! पण सुषा, लोकांच्या तोंडाला कुठवर हात लावायचा ? ते काहीं नाही. आपण आता थांबायला मुळींच तयार नाहीं. " बापूराव.

"पण मी अजून कायदेशीरपणें वयात आलें नाहीं. येत्या गुरुवारी माझा वाढदिवस आहे. मग मी वाटेल तें करायला मोकळी आहे. तुमचं हें वैदिक पद्धतीचं थोतांड नसतं तर शुक्रवारींच आपण रजिस्टर पद्धतीनं उरकून टाकलं असतं. "–सुषमा.

" वैदिक पद्धत काय शुक्रवारीं नको म्हणते आहे ? आपल्याला जास्त गाजावाजा करायचा नाहीं. दोन भटजी आणि तीनचार दोस्त लोक असले

कीं बस्स ! म्हणजे मग अंबादाससारख्या कुत्र्यांचं भुंकणं आपोआप बंद पडेल." इति बापूराव.

थोड्या वेळानें ती दोघें बाहेर पडलीं. व्हिम्टोचा ग्लास अर्धाच ठेवून मीहि बाहेर पडलों व खोलीवर गेलों. आज मंगळवार. शुक्रवारला अजून दोन दिवसांचा अवधि होता. दोनचार कपडे कसेतरी बॅगमध्ये कोंबून मी स्टेशन गाठलें.

गुरुवारीं संध्याकाळी मी गाडींतून पुणें स्टेशनवर उतरलों. माझ्यामागोमाग देशपांडे हेडमास्तर व छोट्या शरदला घेऊन त्याची मुलगी उतरली. दोन टांगे ठरवून आम्ही सर्वजण माझ्या खोलीवर गेलों. प्रवासाचे कपडे उतरण्याच्या भानगडींत न पडता मी बबन साठेच्या घरीं गेलो. बापूरावाची व त्याची चागलीच दोस्ती होती मी सहज भेटायला आल्यासारखें दाखवून बबनला चाचपायला सुरवात केली. माझा अंदाज खरा ठरला. बबनला आमंत्रण होतें. लग्नाचा समारंभ अगदी खाजगी रीतीनें उद्या सकाळीं दहा वाजतां सुषमेच्या बंगल्यावर होणार होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळी आठ वाजता आम्ही सर्वजण सुषमेच्या बंगल्यावर गेलों. दरवाजाला केळीचे खुंट उभे केले होते. आंब्याच्या पानाच्या माळा आडव्या बांधल्या होत्या. आतल्या बाजूला सनई व चौघडा वाजत होता. आम्ही सर्वजण वर गेलों. मी मास्तराना व त्याच्या मुलीला हालमध्यें बसायला सांगितलें व छोट्या शरदला कडेवर घेऊन सुषमेच्या खोलीत शिरला.

सुषमा खिडकींतून बाहेर पाहात उभी होती. टेबलावर एका काचेच्या फ्रेममध्ये बापूरावाचा फोटो लावलेला दिसत होता. फोटोपुढे गुलाबी रंगाचे कांहीं छापील कागद–लग्नपत्रिका–पडल्या होत्या सुषमा पाठमोरी होती. तिचे माझ्याकडे लक्ष गेलें नाहीं. मी खाकरल्यावर तिनें आपली मान वळवली. मला पहाताच तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. तिनें माझ्या कपाळाकडे पाहिलें. त्या दिवसाची पट्टी माझ्या कपाळावर अजून तशीच होती.

"का हो, तुम्ही कसे इथं ?"

"मी तुमच्या लग्नाला आलो आहे." मी शातपणें म्हणालों.

" पण मी तुम्हांला आमंत्रण नव्हतं दिलं."

" लग्नाच्या गोड गडबडींत तुम्हांला आमची आठवण कशी होणार ?"

यावर सुषमेला कांहीं उत्तर सुचेना.

मी पुढें म्हणालों, " बापूराव कुठं आहेत ?"

" येतील आतां." सुषमेनें तुटकपणें उत्तर केलें.

" लवकर आले म्हणजे बरं ! हा छोकरा बापाला भेटण्यासाठीं फार उतावळा झाला आहे."

" म्हणजे !" सुषमेनें चमकून विचारलें.

" फार गोड मुलगा आहे, नाहीं ?"

सुषमा माझ्याजवळ आली. तिच्या डोळयाला डोळा न लावतां मी मुद्दामच शरदकडे पहात होतों. गोंधळून गेलेल्या सुषमेनें विचारलें, " तुम्ही आता काय म्हणालात ?"

" माझं म्हणणं असं, की आपल्या मुलाला व मुलाच्या आईला न बोलावता एकाग्यानं लग्न करणं म्हणजे बरं आहे का ?"

" नाही समजलें !" सुषमा.

" तुम्हाला या छोकऱ्याची ओळख करून देतों. हा कुमार शरद पिंगळे. याची आई तुम्हाला भेटण्यासाठी आली असून बाहेरच्या हॉलमध्यें बसली आहे."

सुषमा धावतच बाहेर गेली. मीहि तिच्या मागोमाग गेलों व खिडकी-जवळ जाऊन उभा राहिलो. हेडमास्तरानी सुषमेला स्वतःची व शरदच्या आईची ओळख करून दिली व ते रुमालानें डोळे पुसूं लागले. शरदची आई कांहींच बोलली नाही. ती सारखी रडत होती. छोटा शरद बावरल्या-प्रमाणे माझ्या कडेवरून तिच्याकडे पहात होता. सुषमा एखाद्या दगडाच्या पुतळीप्रमाणे स्तब्ध होती. जराशानें आम्हा सर्वांना थांबायला सांगून ती आपल्या खोलींत गेली. खोलीचें दार लावलें गेलें. आम्ही एकमेकांच्या तोंडांकडे पहात स्तब्ध बसलों. चौघडा धुडुम् धुडुम् वाजत होता.

सुमारें दहा मिनिटांनीं खोलीचें दार उघडलें गेलें. सुषमेनें हाक मारली. "अंबादास, जरा इकडे या बरं."

शरदला त्याच्या आईजवळ देऊन मी आत गेलों. सुषमेनें दार लावून घेतले. टेबलावर बापूरावाचा फोटो नव्हता. फ्रेमचे तुकडे फरशीवर पसरले होते. सुषमा कोचावर बसली व म्हणाली, "असे बसा."

मी समोरच्या खुर्चीवर बसलों. सुषमेच्या गालावर गडद लाली चढलेली होती. तिचा उरोभाग खालींवर होत होता. माझ्याकडे एकवार पाहून तिनें आपली नजर खाली वळवली व ती म्हणाली, "अंबादास, तुम्ही हें सगळं कां केलं?"

"उगीच." यापेक्षा दुसरें उत्तर मला सुचले नाहीं.

"मी आतापर्यंत तुम्हाला फार वाईट तऱ्हेनं वागवलं याच मला फार वाईट वाटतं. क्षमा कराल का मला?"

"त्यात कसली क्षमा?"

"पण क्षमा केली असं म्हणा ना!" सुषमा आर्जवानें म्हणाली.

"बरं बुवा! केली."

"अंबादास, तुमचं मन फार मोठं आहे. मी माझ्यासाठी तुम्हाला आणखी काहीं करा म्हणून सांगितलं तर कराल का?"

"हो, अगदी आनंदानं."

सुषमा उठून टेबलाजवळ गेली. तिनें एक लग्नपत्रिका घेतली व झंपरला अडकविलेले फाउटन पेन काढून तिने त्या पत्रिकेवर कायमें लिहिले आणि ती माझ्या हातात दिली. पत्रिकेतल्या बापूराव पिंगळे या नावावर काट मारलेला होता आणि त्या जागी माझे नाव लिहिलेले होतें. अरे बाप रे! हें काय? मी ताडदिशी उठून उभा राहिलों. सुषमेने माझ्या खांद्यावर हात ठेवला व ती म्हणाली, "नाहीं नका म्हणूं!"

बाहेरच्या बाजूला जिन्यावर बरीचशी पावलें वाजू लागली, माझा हात धरून सुषमा म्हणाली, "चला."

दार उघडून आम्ही दोघे बाहेर आलो. बापूराव, बबन साठे आणि आणखी एकदोघेजण जिना चढून वर आले. छोट्या शरदनें हाक मारली, "बाबा!"

फटाकड्याचा एखादा सर पेटवून कोणी अंगावर टाकला असता तरी बापूराव इतका दचकला नसता.

सुषमेनें माझा हात आपल्या हातांत अजून धरून ठेवला होता. ती बापूरावला म्हणाली, "बापूराव, आमच्या लग्नाला तुम्ही सहकुटंब आलात; तुमचे किती आभार मानूं!"

★

## वाघाचा डोळा : : : ६

आज रंगनाथची कोण धादल उडाली होती! मोठ्या पहाटे उठून त्याने दुकानाच्या फळ्याना गेरूचा रंग फासला, खांबाना तेलपाणी दिले आणि हातात केरसुर्णा घेतली. पोत्याच्या मागचापुढचा केर काढून त्यानें दुकान साफ केले. डब्यावर बसलेली धूळ फडक्याने झटकायला तो विसरला नाही. त्याच्या मालकाची–लालचंदशेटची–त्याला तशी ताकीदच होती. बेलापूरच्या बाजारपेठेतले ते छोटेसे किराण्याचे दुकान. करूनकरून किती साफ करणार? जेवढे करतां येईल तेवढे रंगनाथने केले. कारण मुंबईला जाऊन लखपति झालेले लालचंदशेटचे थोरले भाऊ दयारामशेट आज भावाला भेटायला मुद्दाम येणार होते.

लवकर आघोळ अटोपून लालचंद आतल्या घरातून बाहेरच्या दुकानात आले. फुलछाप साबू लावून धुतलेला मलमलचा खमीस त्याच्या अंगात होता. धोतरावरून चढवलेली चांदीची जाड साखळी खमिसाच्या आतून चमकत होती. भुसार मालाच्या व्यापाराची काळजी करून त्याचे शरीर कृश झालें होते. सोन्याच्या जाडजड बाळ्यानी त्याच्या कानाची पाळी लोंबू लागली होती. केसरी पागोट्याखाली आठ्यानी दुमडलेल्या अरुंद कपाळपट्टीवर त्यांनी केशराचे गंध लावले होते. डोळे किलकिले करून त्यानी दुकानाची साफसूफ पाहिली व ते खूष झाले.

एका कोनाड्यात बालाजीची तसबीर ठेवलेली होती. कोनाड्याच्या एका बाजूला 'शुभ' व दुसऱ्या बाजूला 'लाभ' अशी अक्षरे कुकवाच्या बोटानें

काढलेली होती. लालचंदनें बालाजीची पूजा केली व मुद्दाम बनवून आणलेला दोन पैशांचा हार तसबिरीवर चढवला. पूजा संपल्यावर रोजच्याप्रमाणे उदबत्ती विझवून न ठेवता त्यानी ती तशीच पेटत राहूं दिली. गादीवर परीटघडीची चादर टाकून त्यानी तक्क्यावर शुभ्र अभ्रा चढवला.

अकरा वाजण्याच्या सुमारास एक गर्द हिरव्या रंगाची नवीकोरी मोटार दुकानासमोर आवाज न करता येऊन उभी राहिली. दयारामशेट मोटारींतून खाली उतरले. त्याच्या डोक्यावर खादीची टोपी व अंगात पाढराशुभ्र लांब कोट होता. कोटाच्या सोनेरी गुड्या उन्हात चमचम करीत होत्या. सुळसुळीत तलम धोतर पायातल्या काळ्याभोर पपशूवर घोटाळत होते. बारा वर्षांपूर्वी बेलापुराहून पळून गेलेल्या दयारामाला न ओळखूं येण्याइतका फरक पडला होता. गादीवर बसून राहाणाऱ्या श्रीमंतीचा बिलबिलीत डौल त्याच्या अंगाला आला होता. त्याचे घवघवीत गाल नागपुरी संत्र्याप्रमाणे चमकत होते. धुळींत पाय टेकताना त्याच्या कपळावर चुण्या पडल्या. ते दुकानात आले. भावाचें कोणत्या पद्धतीने स्वागत करावें या विचारांत लालचंद उभे होते. दुकानात पाय टाकल्याबरोबर दयाराम उदगारले, "अरे लाल्या, हे काय रे तुझं दुकान! आमची पेढी झाडणारा गडी यापेक्षा चांगल्या जागेत राहातो. छीः!"

लालचंदाचा चेहरा खर्रदिशी उतरून खारकेसारखा झाला. त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. रंगनाथने धावत जाऊन आंतून गरम पाण्याचा तांब्या व टुवाल आणला. दयारामने ओत्यावर पाय व तोंड धुतलें आणि ते गादीवर बसले. रंगनाथने चहाचे कप आणून त्याच्या पुढ्यात ठेवले. लालचंद भावाच्या भपकेबाज मोटारीकडे आणि झकपक कपड्याकडे आळीपाळीने पहात होते तोंड वेडवाकडें करीत दयाराम चहा पिऊं लागले. रंगनाथ आलेल्या गिऱ्हाइकाना माल देऊं लागला भावाभावाच्या गप्पा सुरू झाल्या. गावातले छोटेमोठे लोक दयारामशेठला भेटायला दुकानात येऊं लागले.

तासाभराने आलेली मंडळी पांगू लागली. संध्याकाळी वाचनालयात दयारामशेटचा सत्कारसमारंभ व्हावा असे ठरले. रंगनाथनें आंत जाऊन पाहुण्यांसाठी आंघोळीला पाणी काढले व तसे बाहेर येऊन सांगितले.

आघोळीला निघताना दयाराम बोलले, " अरे लाल्या, हा छोकरा फार चलाख आहे बुवा ! हे लढाईचे दिवस म्हणजे नशीब काढण्याचे. याला मुंबईला धाडून दे. आम्ही ठेवूं आमच्या पेढीवर. हुषार आहे. नशीब काढील. "

रंगनाथच्या अंगावर गोणीभर मास चढलें. तो लाजतलाजत हसला. त्याच्या मनांत महत्त्वाकांक्षेचें रोपटें रुजलें.

संध्याकाळीं श्री सिद्धेश्वर वाचनालयात बेलापूरकरांची झिम्मड उडाली. निरानिराळ्या लोकाचीं भाषणें झालीं. त्यानीं दयारामशेठची तोंडे फाटेपर्यंत स्तुति केली. शेवटीं दयाराम बोलले. आपण मुंबईला जाऊन कसें नशीब काढलें याची त्यानी थोडक्यांत माहिती सागितली. बेलापूरचे त्यांचें अपरंपार प्रेम त्याच्या भाषणातून मधूनमधून निथळत होते. शेवटीं वाचनालयाला आपली पाचशें रुपयांची देणगी जाहीर करून ते खाली बसले. टाळ्यांचा कडकडाट झाला. दयारामच्या छातीवर हारावर हार चढले. त्याच्या हातात गुच्छांची गर्दी झाली.

दयारामचें भाषण ऐकून रंगनाथच्या मनातलें रोप वीतभर उंच वाढलें.

तो देणगीचा आकडा ऐकल्यापासून लालचंदच्या पोटात सारखें डचमळ-डचमळ करीत होते. रात्री पाटावर बसल्यावर त्यानी गोष्ट काढली, " दयाराम, काय ही उधळपट्टी ! पुस्तकाच्या खोलीला पाचशे रुपये म्हणजे काय झालं ! "

" लाल्या ! " दयाराम हसतहसत म्हणाले. " तूं निव्वळ महादेवापुढचा आहेस बघ ! तुला माझा मोहन्या माहीत आहे ना ? "

" मोहन्या ! "

" अरे माझा पोरगा. तुझा पुतण्या. "

" हा हा, बरं मग ! "

" अरे, मोहन्याला पतंग उडवायची फार खोड. पण तो काय करतो ठाऊक आहे का तुला ? तो शंभराच्या नोटा एकीला एक चिकटवून त्यांचा पतंग बनवतो अन् मग उडवतो. त्याला दुसरा पतंग चालत नाहीं. "

तोंडातला घास न चावतां तसाच गिळल्यामुळें लालचंदला ठसका

लागला. नंतर ते कांहींच बोलले नाहीत. रंगनाथ जवळच उभा होता. त्याच्या मनाचा पतंग हवेत उचउंच चढू लागला !

दुसऱ्या दिवशी सकाळींच दयाराम निघणार होते. वाचनालयाचे चिटणीस दुकानात येऊन बसले. दयारामने खिशातलें चेकबुक काढलें, पांचशे रुपयाचा चेक खरडला आणि तो चिटणिसाच्या हातांत दिला. उपकाराच्या ओझ्याखाली दडपून गेलेले चिटणीस चेहरा वेडावाकडा करूं लागले. भावाचा निरोप घेऊन दयाराम मोटारीत बसले. काहींतरी आठवण झाल्यासारखे करून ते चिटणिसाना म्हणाले, "का हो; नगरला बॉंबे मर्चंट्स् बॅंकची शाखा नसेल, नाहीं ?"

"नाहीं."

"चूचच् ! मग तो चेक तुम्ही कसा वटवणार ?"

"दुसऱ्या बॅंका आहेत. वाचनालयाच्या खात्यावर चेक जमा करूं."

"छे छे, ते नाही जमणार. आमची मर्चंट्स् बॅंक फार और आहे. तिचा चेक भलतीकडे नाही वटायचा. आणा तो इकडे. मुंबईला गेल्याबरोबर इंपीरिअल बॅंकेचा चेक मी पाठवून देईन."

चिटणिसानी परत केलेला चेक दयारामशेटने आपल्या खिशात ठेऊन दिला. दुकानाच्या पायऱ्यावर उभा राहलेला रंगनाथ एखाद्या भाविकाच्या नजरेनें त्यांच्याकडे पाहात होता. शेटजींची मूर्ति तो जणूं काय आपल्या डोळ्यांत आणि कानात साठवीत होता. मोटार हालण्यापूर्वी दयाराम त्याच्याकडे पाहून म्हणाले, "रंग्या, या कोबड्यांच्या खुराड्यांत काय नोकरी करतोस ? हा लाल्या चार टिकल्याच्यावर एक टिकली तुझ्या हातांत टिकवणार नाही ! तू मुंबईला ये. नशीब काढ बेट्या !"

रंगनाथला आईबाप नव्हते. तो आपल्या चुलतीच्या घरीं राहात होता. जिजीना–त्याच्या चुलतीला–एक मुलगा होता. त्याचे नाव काशीनाथ. जिजीनें घरोघर धुण्याभाड्यांची कामे करून या दोघाना वाढविलें होतें. काशीनाथ शाळेत जात असे. रंगनाथ कित्येक वर्षे लालचंदकडे नोकरीला होता. त्याला जेवूनखाऊन दरमहा चार रुपये पगार मिळे. आपल्या गोष्टीच्या वेळीं रंगनाथला बाविसावे वर्ष चालू होतें. काशीनाथ त्याला दोन वर्षांनीं धाकटा होता.

दयाराम भावाला भेटायला बेलापूरला एक दिवस आले; पण रंगनाथच्या डोक्याला आग लावून गेले. त्याच्या डोळ्यापुढें मुंबई नाचूं लागली. मुंबईला जाऊन नशीब काढण्यासाठीं त्याचा जीव तळमळ करूं लागला. रंगनाथनें आपल्या मनची बात काशीनाथला सांगितली. काशीनाथ शाळेला कंटाळलेला होता. रंगनाथच्या ऐवजी लालचंदच्या दुकानीं नोकरी करण्याचें त्यानें कबूल केलें. रंगनाथनें जिजींची समजूत घातली. त्याला मुंबईला जायची परवानगी मिळाली.

एक तारखेला पगाराचे चार रुपये हातांत पडल्यावर रंगनाथनें आपला बेत लालचंदला सांगितला. लालचंदने दोन लाख शिव्या मोजल्या-एक लाख रंगनाथला, एक लाख दयारामला. काशीनाथला तीन रुपये पगारावर त्यांनी ठेवून घेतले. बेलापूरच्या पिंजऱ्याचे दार उघडून रंगनाथने आपले पंख पसरले.

एक घोंगडी, नेसूं धोतर व दशम्याचें गाठोडें घेऊन रंगनाथ मुंबईच्या गाडींत बसला. त्याला स्टेशनवर पोंचवायला काशीनाथ आला जिजी आल्या. त्यांना सोडून जाताना रंगनाथच्या डोळ्यात पाणी उभें राहिलें. पगाराचे रुपये तिकिटासाठीं संपून गेले. जिजींने वरखर्चासाठीं त्याच्या हातांत एक रुपया ठेवला. गाडी ढळली.

रात्रीच्या वेळीं तो बोरीबंदर स्टेशनवर उतरला. बरोबर आणलेल्या दशम्या खाऊन तो पाणी प्याला. त्यानें एका कोपऱ्यात घोंगडी अथरली व धोतर अंगावर पांघरून तो विचार करीत पडून राहिला.

नशीब उघडायचें म्हणजे काय? नशीब ही रुपयांनी टाकाटाक भरलेली एक तिजोरी असून तिची किल्ली मुंबईला आल्यावर मिळते असें थोडेंच आहे? बेलापूरसारख्या गावांत रंगनाथनें बावीस पावसाळ्यांचा पाऊस अंगावर घेतला होता. पण त्यांतले कित्येक पाऊस त्यानें लालचंदाच्या दुकानच्या आडोशाला बसून पाहिले होते. लालचंदच्या व्यवहारी तिखट नजरेच्या दाबांत त्यानें आपली चतकोर उमर काढली होती. त्याला रुपयाची खरी किंमत माहीत होती. कडोसरी लावलेला, जिजींनें दिलेला वाघाचा डोळा चाचपीत तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशीं तो मुंबईत फिरूं लागला. मऊमऊ डांबरी रस्ते त्याच्या तळव्याना गुदगुल्या करूं लागले. पाचपाच, सहासहा मजल्यांच्या टोलेजंग इमारतींकडे पाहतांना त्याच्या डोक्यावरली टोपी मागेमागे सरकवून खाली पडूं लागली. बग्या, मोटारी, बसेस व ट्रामगाड्या यांची मुसंड चुकवता चुकवता त्याच्या नाकी नऊ आले. त्यांचीं गरगर फिरणारीं चाकें पाहून त्याची नजर फिरूं लागली.

दयारामशेठची पेढी भुलेश्वरला आहे एवढेंच त्याला माहीत होतें. भुलेश्वरची वाट विचारीत तो वणवण हिंडूं लागला. भुलेश्वरचें नाकें दिसायला दुपार झाली. पेढीचा ठावठिकाणा शोधीत तो भुलावण पडल्याप्रमाणें भटकूं लागला. पण त्याला ती पेढी कांहीं सापडेना. अहो, दयारामशेट असतील मोठे; पण मुंबईच्या दरियात खसखस !

भुलेश्वरच्या बैबखान्यासमोर त्याला सट्टेबाजाराची प्रचंड लाल इमारत दिसली पांढरे स्वच्छ कपडे घातलेले शेकडा शेटिये त्या इमारतींत व आस-पास घोंगावत होते. रंगनाथला वाटले, मुंबई म्हणजे एक झाड, भुलेश्वर ही एक फांदी, समोरची इमारत हे मधाचे पोळे आणि हे सटोडिये म्हणजे मधमाशांचा थवा. टेलिफोनच्या शेकडो घंटा एकसुरी, एकमेळी किणकिणत, ठणठणत होत्या. रंगनाथने बबखान्यातल्या आगीच्या बंबाकडे पाहिलें. त्याला वाटलें, त्या बंबाची घंटा झक मारते आहे ! भावाच्या विचारणा चालल्या होत्या. भाव येत होते. भाव जात होते. तेजीमंदी तालातालानें पुढेंमागें सरकत होती. पिसाटल्याप्रमाणें ते शेकडो सटोडिया हो हो करून ओरडत होते. रंगनाथाला वाटले, बेलापूरच्या मराठी शाळेतले झाडून सारे वर्ग एकच जमून परवाचा म्हणत आहेत.

सट्टेबाजाराच्या आसपास तीनचार निरनिराळ्या बॅंका रंगनाथाला दिसल्या. बॅंकामधून माणसाची इतकी आवजाव चालली होती, कीं मुंगीला रीघ नव्हता. शेकडो नोटांचीं बिंडाळीं क्षणाची उसंत न घेता हात बदलींत होतीं. नोटेला फक्त रंग रुपयाला फक्त आवाज. शेटिया लोकांचें घ्राणेंद्रिय फारसे तीव्र नसते असें म्हणतात. त्या रस्त्याने जाणाऱ्या कोणत्याहि शेटियाला झटकलें तरी केराची टोपली भरण्याइतक्या नोटा खालीं सांडतील. आख्या मुंबईतला ठायींठायीं चाललेला व्यापार ही जर गुलाबाचीं फुलें मानलीं तर

सट्टेबाजारातले.शेटिये म्हणजे अत्तराच्या कुप्या ! तिथे पावलापावलावर आणि क्षणाक्षणाला जिभेच्या पतीवर संपत्तीची बेछूट देवघेव ! रंगनाथ पहातच राहिला. त्याला इसापनीतींतली ' माकड आणि सुसर ' ही गोष्ट आठवली. माकडानें आपलें काळीज झाडाला टांगून ठेवले होतें. म्हणजे झाडाला काळीज टांगून ठेवता येतें ही गोष्ट खरी तर !

म्हणे, लक्ष्मी दुधाच्या समुद्रात कमळाच्या पाकळयात उभी आहे. म्हणे, लक्ष्मी शेषाच्या वेटोळयावर विष्णूचे पाय चुरीत आहे. खोटे ! एकदम खोटे ! लक्ष्मी इथे या शेटियाच्या जिभाच्या शेड्यावर नाचत आहे. शेंगदाणे, कपाशी, सोनें वगैरे जिनसाच्या भावाच्या चढउताराबरोबर वरखालीं चालून तिच्या पायाला पेटके आले आहेत. टेलिफोनच्या घंटेगणिक तिच्या हृदयाचे ठोके जलद पडत आहेत. बिचारीला धाप लागली आहे !

सट्टेबाजारासमोरच्या एका बोळींत उभा राहून रंगनाथ हा सर्व प्रकार डोळे फाडून पाहात होता. अखेरीस कंटाळून तो खालीं बसला. त्याच्या पोटात दुपारची आग पेटली होती. समोरच एक मनुष्य केळीच्या पानावर पोपईच्या पिवळयाजर्द फोडी माडून बसला होता. येणारेजाणारे एकेक आणा देऊन त्या फोडी खात होते. रंगनाथलाहि इच्छा झाली. पण जवळचा एकुलता एक रुपया मोडण्याच त्याच्या जिवावर आलें. जवळच एक म्हातारी बाई मातीची टोपली घेऊन बसली होती. आयाबाया पोतेऱ्याला व शेगडी-साठीं पैसे मोजून माती घेत होत्या. मुंबईत मातीला किमत !

इतक्यात एक आंधळा भिकारी गळयात अडकविलेली बाजाची पेटी वाजवीत त्या ठिकाणी आला. त्याचा दंड धरून एक तरुण पोरगी त्याच्या-बरोबर चालत होती. तिचे कपडे स्वच्छ व केस मोहकपणे विंचरलेले होते. होती काळीसावळीच, पण नाकडोळे ठसठशीत. पान खाऊन तिचे ओठ लालचुट्ट दिसत होते. तो भिकारी म्हणाला, " मैना, इथंच बसू. "

ते दोघेहि त्या बोळीत बसले. भिकाऱ्याचीं बोटें पेटीच्या पट्ट्यावरून शिस्तवारपणे फिरूं लागलीं. रंगनाथला त्या आंधळ्याचें कौतुक वाटलें. मैना उंच आवाजात गाणें म्हणूं लागली. गाणें म्हणताना तिच्या दातांवरल्या सोन्याच्या दोन चुका चमचम करीत होत्या.

हा अंध भिकारी काठी टेकित आला
द्या एकच पैसा, भीक एवढी घाला

उघडिला न यानें जन्मापासुन डोळा
पाहिला न यानें रम्य धरेचा गोळा

माहिती न याला प्रकाश अथवा रंग
दिनरात आपुला अंधारांतच दंग

कुणि देइल कांहीं, तेंच तेवढें खावें
कुणि द्यावें म्हणुनी भीक मागणे ठावें

सांगाल तुम्ही, पण कसें करावें काम?
अंधास तरी द्या कामावाचुन दाम

हा अंध भिकारी रखडत, खरडत येई
पसरितो पदर हा, कीव येउंद्या कांहीं

द्या कान, शब्द हे ऐका—बापुडे
साकडें रुक्याचें एका—कां पडे ?

हा गरीब, याचे तुम्हीच दादा काका
कर खिशांत घाला, एकच दिडकी टाका.

गाणे संपले. बघ्या व ऐक्या लोकांची गर्दी हटू लागली. मैनेने पदर पसरला व वाळे झुम्‌झुम् वाजवीत ती लोकासमोरून फिरूं लागली.

"दादा, खिशात हात घाला. पै-पैसा टाका. देव तुमचं भलं करील."

लोक मैनेच्या पदरांत पैसे टाकूं लागले. तांबड्या पैशाची टंचाई भिकाऱ्याच्या पथ्यावर. मैनेच्या पदरात आणेल्यादुणेल्या जमूं लागल्या. काही हरीचे लाल तिच्या पदरात कुपनांचे तुकडे टाकून मोकळे झाले. मैना रंगनाथच्या समोर येऊन उभी राहिली.

"भाऊ, आंधळ्याची कणव करा. काही द्या ना."

इतक्यात एक हिरवी मोटार गर्दीतून वाट काढीत हमरस्यानें जातांना त्याला दिसली. रंगनाथ बोळींतून बाहेर पडला व धावत सुटला. ती मोटार दयारामशेटची होती.

तीनचार मिनिटांनीं मोटार थांबली. दयाराम खालीं उतरले व पेढीच्या पायऱ्या चढूं लागले. रंगनाथ धापा टाकीत आला.

दयाराम गादीवर बसले व त्यानीं टेलिफोनचें नळकांडें कानाला लावलें. रंगनाथ वर आला आणि त्यांच्यासमोर उभा राहिला.

" जयगोपाळ शेट ! मी सकाळपासून सारखा फिरतो आहे. सापडेनाच तुमची पेढी. "

" तूं कोण ? "

" मी ! मी रंगनाथ. "

" रंगनाथ ? "

" लालजींच्या, तुमच्या भावाच्या दुकानातला नोकर मी. तुम्ही मला बोलावलं म्हणून मुद्दाम बेलापुरासनं आलों—नशीब काढायला आलों. "

दयाराम टेलिफोनमधून कुणाशीं तरी कांहींतरी बोलले व रंगनाथशीं काहीं न बोलता तसेच मोटारींत जाऊन बसले. रंगनाथ कळवळून ओरडला, " असं काय करता शेट ? "

दयाराम मोठमोठ्याने हसले व रंगनाथला म्हणाले, " नशीब काढायचं ना तुला ? मग काढ. तुझं नशीब काही माझ्या खिशात नाही. "

मोटार हालली व दृष्टीआड झाली. पेढीवरचा भय्या हातातला सोटा सरसावीत पुढे आला व त्यानें रंगनाथला गचांडी दिली. पायऱ्यावरून कोलमडत रंगनाथ खाली आला. तो मुकाट्याने त्या बोळाकडे परत चालूं लागला.

गर्दी हटली होती. मैना पदरातले पैसे हाताने खालीवर घोळशीत होती. आधळ्याने तिला विचारलें, " किती आहेत बटा ? "

" बारा आणे. दोन पत्र्याचीं कुपनं अन् चार कागदाचीं कुपनं. "

" बारा आण्यानीं काय व्हायचं ? पेटीचं भाडं— तुझ्या कपड्याचं भाडं— वाळयाचं भाडं— काय काय भागणार ? चल दुसरीकडे जाऊं ! "

मैना पोपईवाल्याजवळ गेली व तिनें हात पुढे केला त्यानें तिच्या हातात एक फोड ठेवली. तिनें त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावले व ती फोड खाऊन टाकली. आधळा उठला व चाचपडत चालूं लागला. घाईघाईनें पदराला हात पुसून मैना त्याच्या मागोमाग गेली.

रंगनाथ पुन्हा वेड्यासारखा भटकूं लागला. सकाळपासून त्याच्या पोटांत अन्नाचा कण नव्हता. पण त्याची भूक मेली होती. त्याचा थकवा थकला होता. संध्याकाळ झाली. रंगनाथ भटकत माधवबागेंत गेला. त्याला मैनेच्या गाण्याचा आवाज ऐकूं आला. तो देवळांत शिरला. मैनेच्याभोवतीं लोकांचें कडें पडलें होतें. तिच्या पदरातली चिल्हर उजव्या हातांत मावत नव्हती. तिच्या दातांवरल्या सोन्याच्या दोन चुका त्याला जंगलाच्या अंधारांत चमकणाऱ्या वाघाच्या डोळ्यांसारख्या वाटल्या.

तो गाभाऱ्यांत गेला. विजेच्या प्रकाशांत देवाच्या अंगावर हिऱ्यामोत्यांचे खंडीभर दागिने चकाकत होते. मुंबईतल्या श्रीमंत शेटियांचा तो श्रीमंत देव. रंगनाथनें मनोभावानें त्याला हात जोडले.

दुपारच्या वेळीं भटकत असतांना रंगनाथनें एक लहानशी खाणावळ हेरून ठेवली होती. देवळांतून बाहेर पडल्यावर तो तिकडे वळला. आंत जाऊन त्यानें चार आण्याचें ताट मागवलें व तो त्यावर तुटून पडला. जेवण करून तो बाहेर पडला व माधवबागेंतल्या गर्दींत जाऊन बसला. रात्रीं फूटपाथवर घोंगडी अंथरून तो पोटाशी पाय घेऊन पडून राहिला.

जिजीनें दिलेल्या रुपयांपैकीं बारा आणे शिल्लक राहिले. या बारा आण्यांत तीन जेवणें मिळतील. आजच्यासारखे तीन दिवस कसेबसे निभतील. पुढें काय ? नन्ना ! ज्या दयारामशेटच्या सावलीसाठीं आपण मुंबईला आलों त्याच्या उंबऱ्यावर आज गचांडी मिळाली ! तीन दिवसानंतर काय ? भिकाऱ्याच्या मौतीनें मरावें लागेल. पण...पण मुंबईत भिकारी मरतात कुठें ? त्याच्या ओंजळींत आणेल्या मावत नाहींत ! पण उगीच नाहीं मिळत त्या ! त्याच्या कानात मैनेच्या गळयाची फिरकत घुमूं लागली. हुन्नर पाहिजे हुन्नर !

सकाळींच उठून रंगनाथ उद्योगाला लागला. शोध करीत तो क्रॉफर्ड मार्केटमध्यें गेला व त्यानें बारा आण्याच्या दोन मोठाल्या पोपया खरेदी केल्या खिशांतला चाकू काढून त्यानें पोपयीच्या बारा फोडी केल्या व त्या रागेनें समोर मांडून तो एका रहदारीच्या रस्त्याला फूटपाथवर बसून राहिला. बारा वाजेपर्यंत बारा फोडी विकल्या व त्याचें भांडवल वसूल झालें. संध्याकाळपर्यंत दुसऱ्या पोपयीच्या फोडी संपल्या. त्याच्या खिशांत दीड रुपयांची चिल्लर खुळखुळूं लागली. खाणावळींत जाऊन त्यानें सहा

आम्यांचें ताट मागवलें. त्या रात्रीं फूटपाथच्या खडबडीत फरशीवर त्याला गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशीं त्यानें तीन पोपया खरेदी केल्या.

एक आठवडा गेला. निरनिराळया फळांच्या फोडी बशींत घालून तो विकूं लागला. त्याची फळाची मिसळ सपाटेबंद खपूं लागली. एक महिना गेला. रंगनाथचा खिसा नोटारुपयांनीं गच्च भरून गेला. फूटपाथवर झोंपणें त्याला धोक्याचें वाटूं लागलें. भुलेश्वरला एका इमारतींत जिन्याच्या खालची अर्धी खण जागा त्यानें भाड्यानें घेतली. व फळफळावळीचें दुकान थाटलें. दुकान झक्क चालूं लागलें. पंधराच दिवसात त्यानें आपल्या हाताखालीं एक पोऱ्या ठेवला. त्याच आठवड्यात त्यानें बेलापूरला पत्र टाकलें. तें असें–

भुलेश्वर, मुंबई.

काशीनाथभाऊ याला पुष्कळ आशीर्वाद.

इकडे आल्याला दीड महिना झाला. तुम्हीं पत्राची खूप वाट पाहिली असेल. पण मुंबईला येऊन नशीब काढल्याशिवाय घरीं पत्र लिहायचें नाहीं असें मीं ठरविलें होतें.

काशीनाथ, तुला ती अलिबाबा आणि चाळीस चोर ही गोष्ट माहीत आहे ना ? चाळीस चोराच्या गुहेंत पैसाच पैसा ! अलिबाबाला त्या गुहेची किल्ली सापडली आणि तो गब्बर झाला. मुंबई ही फार फार मोठी गुहा आहे. या गुहेत चाळीस काय पण चाळीस हजार चोरानीं साठवलेली संपत्ति आहे. आणि काशा, मला–या तुझ्या दादाला–या गुहेची ‘तिळा उघड’ गवसली आहे. यापेक्षा जास्त काय लिहूं ?

सध्या मीं भुलेश्वरला एक फळाचें दुकान काढले आहे. पण हें दुकान म्हणजे अलिबाबाचे मोहरांचें एक मापटेंहि नाहीं. ही नुसती सुरवात ! नुकताच मीं एक पोरगा दुकानात नोकरीला ठेवला आहे.

लवकरच एक मोटार घेण्याचा माझा विचार आहे. या मोटारींत तुला व जिजीला बसवून मी आख्खी मुंबई तुम्हाला हिंडवणार आहें. तूं मुंबईला येण्याची तयारी कर. जिजीलाहि घेऊन ये. लालजीला सांग, कीं त्याच्या दुकानांत नोकरी करतो कोण ?

जिजीला सा. दंडवत.

तुझा—रंगनाथ

कांहीं दिवस गेले. रंगनाथच्या दुकानचा गल्ला दर दिवशीं वाढत चालला. त्यानें दुकानासाठीं मोठी जागा घेतली व आणखी एक नोकर ठेवला. भुलेश्वरला राहून अनेक व्यापाऱ्यांशीं त्याच्या ओळखी झाल्या. वायद्यांच्या बाजाराची त्याला चागली माहिती झाली. तो लहानलहान सौदे करूं लागला. त्याला मिळकत होऊं लागली. वायदेबाजारांत त्यानें जास्त लक्ष घातलें. त्याची पत वाढूं लागली.

कांहीं दिवस गेले. सट्टेबाजारांत रंगनाथनाला खच्चून फायदा होऊं लागला. फळफळावळीचा व्यापार त्याला पोरखेळ वाटूं लागला. अखेरीस तें दुकान एकाला विकून टाकून तो मोकळा झाला.

लढाईच्या बातम्याचा वायद्याच्या बाजारावर कसकसा परिणाम होतो याचा रंगनाथनें बारकाईनें अभ्यास केला. बेसुमार वाढलेली महागाई, मोडीची चणचण, चलनाची वाढ, युरोप खंडात उलटेंपालटे होणारें लढाईचें पारडें आणि आसामच्या दरवाजावर ठोठावणारा शत्रू या गोष्टींचा मनाशी मेळ घालून त्यानें सोन्याच्या बाजारात अफाट खळबळ होणार असा कयास बांधला. गेल्या. दोन महिन्यांतले त्याचे अडाखे तंतोतत बरोबर ठरेल होते. छातीचा कोट करून त्याने आपल्या पतीला न झेपेल इतक्या सोन्याच्या मोठ्या खरेदीचा वायदा केला.

सोन्याचा भाव दर तासीं, दर दिवशीं वाढूं लागला. भावांतली ती जबरदस्त वाढ पाहून व्यापाऱ्याच्या छात्या हबकल्या. रंगनाथचा जीव मात्र खुलत, फुलत होता. सोन्याचा भाव शंभराच्या वर गेला. कधीं न घडणारी गोष्ट घडली. सरकारचे धाबे दणाणले. शेटियाच्या तोंडांना पाणी सुटलें. त्यानीं सपाटेबंद खरेदी सुरू केली. खरेदी वाढूं लागली तसा भाव वरवर झटकूं लागला. रंगनाथची नजर तयार होती. तो बांक्यासारखा टपून होता. ज्या दिवशीं एकशेंसहा रुपयावर भाव सरकला त्या दिवशी त्याने जास्त हाव न धरतां वायदा तोडून टाकला. त्या दिवशीं त्यानें चार लाख रुपये मिळवले असे कोणी म्हणतात, तर कोणी म्हणतात पांच लाख. खरी कमाई त्याची त्याला माहित ! क्षीरसागरात उमललेल्या, पाचूच्या देठावर डोलणाऱ्या कमळाच्या सोनेरी पाकळयांत, हिऱ्यांच्या बिसतंतूवर लोळणारी, मोत्यांनीं भरगच्च लहडलेली लक्ष्मी रंगनाथची बटीक झाली.

रंगनाथचें पत्र आल्यावर काशीनाथला व जिजींना फारफार आनंद झाला. काशीनाथ तें पत्र घेऊन गांवभर हिंडला. लालचंदशेट चाट पडले. काशीनाथनें त्याना आपला मुंबईला जायचा बेत सांगितला. लालचंदनें तीन लाख शिव्या मोजल्या. एक लाख काशीनाथला, एक लाख रंगनाथला आणि एक लाख दयारामला. हरामखोर बेटे!

काशीनाथला मुंबईखेरीज दुसरें काहीं सुचेना. त्याच्या डोळयांपुढें चाळीस चोरांची दागिन्यानीं व मोहरानीं तुडुंब भरलेली गुहा दिसूं लागली. तो लालचंदशीं फटकून वागूं लागला. पुतण्याचें वैभव जातीनें पहाण्यासाठीं आणि त्याच्या मोटारींतून सारी मुंबई हिंडण्यासाठी जिजी उतावीळ झाल्या. दोघानीं मुंबईला जाण्याचे बातबेत व तयारी चालविली.

पण महिना गेला तरी रंगनाथचें पत्र नाहीं! दोन महिने लोटले तरी चिठी नाहीं! काशीनाथची गुर्मीई कमी झाली. लालचंद फी फी करून हसूं लागले. जिजी बांधलेल्या गाठोड्याच्या गाठी सोडूं लागल्या. आणखी दोन महिने गेले तरी रंगनाथ चिडीचिप्प! काशीनाथनें त्याला पत्रावर पत्रें टाकलीं; पण एक ओळ नाहीं त्याच्याकडून!

काशीनाथ चिडीला गेला. त्यानें एकट्यानेंच मुंबईला जाण्याचा चंग बांधला. जिजीहि त्याला म्हणाल्या, "रंग्याचं लक्षण काहीं ठीक नाहीं. जा, एकदा बघून ये."

लालचंदनें, 'पुन्हा नोकरीवर घेणार नाहीं' असा निर्वाळा दिला. काशीनाथनें लवंगमिऱ्याच्या नोकरीला हात धुतले व तो तडक निघाला.

मुंबईला गेल्यावर त्यानें भुलेश्वरमधल्या फळांच्या दुकानांच्या फळ्या ठोठवायला सुरुवात केली. अखेरीस त्याला रंगनाथचें 'माजी' दुकान सापडलें. पण या चार महिन्यात त्या दुकानानें महिन्यागणिक नवा मालक पाहिला होता. सध्याच्या मालकाला रंगनाथचा पत्ता सांगता येईना. काशीनाथ कंटाळला व सट्टेबाजाराममारच्या बोळात जाऊन बसला.

समोरच एक बाबा पोपयीच्या फोडी चिरीत होता. जवळच एक म्हातारी माती विकीत बसली होती. काशीनाथने दोन फोडी विकत घेतल्या व तो

त्या खात बसला. इतक्यांत एक भिकारी पेटी वाजवीत आला व पोपयी-वाल्याजवळ बसला. मातीवाल्या म्हातारीनें विचारलें, " काय रे बाबा, मैना नाहीं दिसत ? अन् तूं आधळा ना ? मग डोळे कसे आले ? "

म्हातारीला कांहीं उत्तर न देता त्या भिकाऱ्यानें आकाशाकडे पाहिलें व गाणें म्हणावयास सुरवात केली—

**उडाली मैना**
**मैना भुर्रदिशीं**
**धुंडुनी बघतों आकाशीं !**

**हरवलें शीड**
**शीड कुठं गेलें ?**
**नाव ही गदगद हिंदोळे !**

**उडाली मैना**
**मैना अज्ञात**
**एकटा उरलों घरट्यांत**

**एकटा जीव**
**जीव जळे, पोळे**
**परतुनी आले मज डोळे !**

गाणें संपलें. काशीनाथनें खिशांतून एक आणा काढून त्या भिकाऱ्याच्या हातांत ठेवला. भिकाऱ्यानें तोंडांतल्या तोंडात कांहींतरी पुटपुटून तो आणा कपाळाला लावला. इतक्यात एक नवी कोरी लालभडक मोटार इमरस्त्यानें जातांना काशीनाथला दिसली. गाडीत रंगनाथ–हां, रंगनाथच बसला होता. काशीनाथ ताड्दिशी उठला व रंगनाथचा मोठमोठ्याने हाका मारीत मोटारीच्या मागून धावू लागला. गर्दीतून वाट काढीत गाडी सुळ्ळदिशी निघून गेली. काशीनाथ मटकन् खाली रस्त्यातच बसला !

त्यानंतर काशीनाथ चार दिवस एकसारखा मुंबईमधून भटकत होता. लाल मोटारींचा त्याने अगदी पिच्छा पुरवला. बरोबर आणलेले पैसे संपून गेले होते. त्याचे पोट सपटालें होतें; पाय गळाठले होते.

रात्रींची वेळ. काशीनाथ एका रस्त्यानें चालला होता. दोन्ही बाजूच्या ारा-खिडक्यांतून रंगीबेरंगी साड्या विजेच्या प्रकाशांत झगझग करीत ोत्या. पेटी, तबला, दिलरुबा व घुंगरें यांचा आवाज हवेत वर चढत होता.

इतक्यांत काशीनाथला एक लाल मोटार दिसली. हो, तीच मोटार ! ंकाच नाहीं. काशीनाथ त्या मोटारीजवळ जाऊन उभा राहिला. उद्या याच ोटारींतून आपण हिंडणार ! काशीनाथच्या उतरलेल्या चेहऱ्यावर हसूं ढलें. पण ही गल्ली तर काहीं बरी दिसत नाहीं ! रंगनाथ इकडे कसा ? ाला असेल कोणा मित्राबरोबर. रंगनाथची वाट पहात काशीनाथ दरवा- ांत उभा राहिला.

वरून गाण्याचे, बजाविण्याचे व हसण्याचे आवाज जिना उतरून खालीं ंत होते. काशीनाथ लक्ष देऊन ऐकूं लागला. रंगनाथच्या हसण्याचा ावाज त्यानें ओळखला. मग मात्र त्याला राहवेना. तो हळूच जिना ढून वर गेला.

बैठकीवर तीनचार माणसे बसलीं होती. कोणी पान खात होते. कोणी ेगारेट ओढीत होते. रंगनाथ होताच त्यांत. समोर एक बाई बसली होती. ेवाळी रंगाचें जरीचें पातळ ती नेसली होती. तिचे दंड उघडेच होते. ेच्या डोक्यावर पावशेराची लफ्फेबाज वेणी होती. तिचे ओठ रंगनाथच्या ोटारीप्रमाणें लालबुंद होते. पिठाच्या गिरणींतून परत आलेल्या मोल- रणीप्रमाणें तिचें तोंड पांढरेंफक्क होतें. तो प्रकार पाहून काशीनाथला ेंसेंच वाटलें. जिन्याच्या कठड्याला रेलून तो गप्प उभा राहिला

साजिंद्यांनीं नवा सूर लावला. तबल्यावर थाप पडली. ती बाई 'मोरा न्सीवाला कान्हा' या चालीवर गाणें म्हणूं लागलीं—

राया गोड गोड बोला
जळला, राग हा कशाला ?
नजर करुनि वर, बघ डोळाभर
हा सोड कीं अबोला
कशांत चुकलें ! कशांत हुकल्यें ?
कां सांग ताल गेला !

**शेज पसरली, फुलें पखरलीं**
**घे शाल, घे दुशाला**

**चल, झोंपीं जा, अलगद माझ्या**
**हा दंड घे उशाला !**

गाणें म्हणतांना ती बाई त्यांतल्या शृंगारिक अर्थाला अनुसरून हावभाव करीत होती. रंगनाथ पूर्णपणें रंगून गेला होता. हातांतली सिगारेट ओढायला तो विसरला होता. गाणें संपल्यावर तो म्हणाला, " तें काहीं नाहीं. आणखी आदा पाहिजे. "

" अगोदर दौलतजादा. मग आदा. " ती बाई बोलली.

खिशातलीं पाकिटें बाहेर पडलीं. त्यांतून नोटा निघूं लागल्या. दौलतजादा अहमहमिकेनें सुरू झाली. एकाच्या नोटेनें सुरवात झाली. तिची जागा पांचाच्या नोटेने घेतली. रंगनाथनें पाकिटांतून दहाची नोट काढली आणि तो उसळून म्हणाला,

" अरे, तुम्हीं काय दौलतजादा करावी ! "

त्यानें ती नोट त्या बाईवरून ओवाळली व टर्‌कन् फाडली. दुसरी नोट काढून त्यानें तिच्या हातांत दिली. काशीनाथच्या छातींत टर्र वाजल्यासारखें झालें. एक नोट तिच्यावरून ओवाळून फाडावी व दुसरी तिच्या हातांत द्यावी असा रंगनाथनें क्रम चालवला. काशीनाथला तें पाहवेना. तो कळवळून ओरडला.

" रंगनाथ, दादा ! "

सर्वांनी चमकून त्याच्याकडे पाहिलें. त्या बाईचे ओठ आश्चर्यानें विलग झाले. तिच्या दातांवर कांहीं तरी चमकत आहे असें काशीनाथला वाटलें. त्या बाईनें विचारलें, " कोण रे तूं ? "

" हा कोण ? " बाकीचे लोक विचारते झाले.

रंगनाथ डोळे तांबारून ओरडला, " मैना, तुझ्या घरीं हा कोण फाल्तू ? "

★

## प्रेमपत्राची भानगड : : ७

परिक्षेचे दिवस जवळ आल्यामुळे रात्रीं बारा वाजले होते तरी वसतिगृहांतले सगळे दिवे जळत होते. कांही खोल्यांतून घोकण्याचे, तर काहींतून स्टोव्हचे आवाज ऐकूं येत होते. कोपऱ्यांतल्या २७ नंबरच्या शामराव गोरेच्या खोलींतसुद्धा आज रात्री दिवा जळत होता. शामराव गोरे व पांडोबा काळे दोघेहिजण एका महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करीत होते. बराच वेळ खल झाल्यानंतर शामराव उठला आणि पॅडमधला एक कागद फाडून घेऊन त्यावर कांहीतरी लिहूं लागला. पांडोबा मधूनमधून डोके घालून बघत होता. पांडोबाच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा दिसेना. तो म्हणाला, "मजकूर ठीक आहे, पण अक्षर अजून जरा तिरपं पाहिजे." दुसरा कागद घेऊन शामराव दातांनी जिभेचें टोक चावीत सावकाश लिहूं लागला.

शामराव व पांडोबा ही जोडी कॉलेजमध्ये सुप्रसिद्ध होती. शिदू माळ्यापासून तों तहत प्रिन्सिपॉलपर्यंत सर्वजण या जोडीला ओळखीत होते. शामरावचे वडील सुखवस्तु असून पुण्याचेच रहिवासी होते. पांडोबाला खामगांवाहून त्याच्या चुलत्याकडून न चुकता मनीऑर्डर येत असे. अभ्यासासाठीं म्हणून शामराव वसतिगृहांतच राहायला आला होता. पांडोबा इंडियन गेम्सचा सेक्रेटरी होता हें त्याच्याकडे पाहिल्याबरोबर कोणीहि सागूं शकत असे. शामराव कॉलेजच्या वाङ्मयमंडळाचा चिटणीस होता.

दुसरे दिवशी संध्याकाळच्या डाकेला पोस्टमन येऊन त्यानें २६ नंबरच्या खोलींत राहाणाऱ्या वसंत लाटकरच्या हातात एक गुलाबी पाकीट दिलें. त्यावरलें अपरिचित अक्षर पाहून त्यानें तें कोठून आलें हें बघण्यासाठीं शिक्का पाहिला. त्याला 'Poona' हीं अक्षरें दिसली. पाकीट फोडल्यावर त्याच्या आश्चर्याची परिसीमा झाली. खालीं 'आपली पाटणकर' अशीं अक्षरें होतीं. उतारावर निघालेल्या सायकलच्या वेगानें त्यानें ते पत्र वाचलें व पत्राला येणाऱ्या सेंटचा वास घेत घेत तो पुन्हां तें पत्र वाचूं लागला. पण तसें कशाला! तुम्हीसुद्धां वाचा कीं—

प्रिय वसंतराव,

पत्र लिहायला घेताना माझें हृदय धडधड करीत आहे. काय लिहावें, कसें लिहावें या विचारानी मनांत गोंधळ उडाला आहे. खरें म्हटलें तर आपला परिचय अगदीं थोडा. नुसती तोडओळख म्हटले तर चालेल. अशा परिस्थितींत मी हें पत्र पाठविण्याचें धाडस करीत आहे, म्हणून माझ्यासंबधीं विपरीत कल्पना आपल्या मनात येतील अशी मला भीती वाटते. पण हृदयाचा कोंडमारा असह्य होत चालल्यानें मला हें पत्र लिहिण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाही.

आपल्याला कॉलेजमध्यें प्रथम पहिल्याबरोबरच माझें आपल्याविषयीं अनुकूल मत झालें. आपले निरनिराळ्या खेळातले प्राविण्य आणि वाद-विवाद-सभेंतलें आपले वक्तृत्वकौशल्य पाहून दिवसेंदिवस माझे मन आपल्याकडे जास्त ओढ घेऊं लागलें. पण मुलीची ओळख करून घेऊन ती उगीचच वाढवण्यामध्ये आपण उदासीन दिसल्यामुळें माझें कांहीं चालेना. आणि नुकत्याच झालेल्या आपल्या कॉलेजच्या गॅदरिंगमध्यें खडाष्टक नाटकांत आपण केलेलें कवीश्वराचें काम पाहून तर मला माझ्या हृदयांतल्या उर्मि दाबणें अशक्यच झालें !

शेवटीं मनाचा हिय्या करून आज हे पत्र लिहिण्याचा निर्लज्जपणा मी पदरीं बाधून घेत आहे. मला अजून कितीतरी लिहायचें आहे, पण कांहींच सुचत नाहीं. आतांपर्यंत जेवढे लिहिलें तेवढेंच कसें लिहिता आलें याचें आश्चर्य वाटतें ! आपली समक्ष भेट झाल्याशिवाय मनावरलें दडपण दूर होणार नाही. कॉलेजमधें तुम्ही माझ्याशीं बोलला तर तो उगीचच चर्चेचा विषय होईल; तरी केव्हा आणि कुठे भेटाल ?

पत्राचे उत्तर पोस्टाने पाठवणे धोक्याचे होईल. आमचा बंगला तुम्हाला माहीत आहेच. उद्या संध्याकाळी, अंधार पडल्यावर तळमजल्यावरच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्यातल्या खोलीच्या खिडकींतून या पत्राचे उत्तर टाकावे. ती माझी अभ्यासाची खोली. मी वाट पाहात उभी राहीन. कळावें.

आपली

**पाटणकर**

ता. क.–आपल्या कॉलेजमधला तो उडाणटप्पू शामराव गोरे कवीश्वरची भूमिका करायला मागत होता म्हणे ! तुम्हांला ती भूमिका मिळाली असें कळल्यावर मला फार आनंद झाला. त्या माकडानें काय नाटकांत काम करावें ! बरें ते जाऊं द्या. उद्या माझ्या पत्राचे उत्तर नक्की घेऊन याल ना ? उद्यां क्लासमधें तुमच्याकडे पहाण्याचा मला मुळींच धीर होणार नाहीं. तुम्हीहि ओळख देऊं नका.

K. P.

दार लावून घेऊन वसंत तें पत्र किती वेळां तरी वाचीत होता. अचानक ओठाशीं आलेला हा इष्काचा प्याला पिताना त्याला ठसका येऊं लागला. कमल पाटणकरसारखी कॉलेजच्या बेहेस्तातील परी आपण होऊन पत्र पाठवून आपली प्रेमयाचना करते म्हणजे काय गोष्ट आहे ! त्याने आरशात आपलें तोंड पाहिलें; पुन्हा पाहिलें आणि त्याला वाटलें, खरेच, आपण सुंदर आहोत कीं ! त्याच्या डोळयांपुढून कल्पनांचे ढग सरकूं लागले—

—आपण टेनिस खेळत असून कमल पाटणकर बाजूच्या रस्त्यानें जाताना मुद्दाम खेळ पहाण्यासाठी थाबली असून तिच्या गालावर प्रेमळ हास्य खेळत आहे.

—आपण वादाचा मुद्दा टेबलावर मूठ आपटून, जोराजोरानें मांडीत असून पुढल्याच बाकावर बसलेली कमल टाळ्या वाजवीत आहे.

—आपण कवीश्वराच्या भूमिकेंत स्टेजवर उभे असून अभिनय करण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि कमल पाटणकर आपलेपणाच्या अभिमानानें शेजारच्या मुलींना आपल्या कामाचा चागुलपगा वर्णन करून सांगत आहे.

आणि काळाच्या जरा पुढें सरकून—

—आपण एका लतामंडपात बसलो असून कमल समोर उभी आहे. आपण तिचा हात आपल्या हातात धरून तिला आपल्या शेजारीं बसवीत आहोत, आणि—

इतक्यांत त्याच्या कल्पनेच्या साखळीची कडी तुटली. दाराची कडी वाजवून बाहेरून कोणीतरी त्याला हाक मारीत होतें. त्यानें पत्राचा कागद गडबडीनें उशीखालीं ठेवून दिला आणि दार उघडलें. शामराव आंत आला.

"काय चाललय् वसंतराव ?"

"कांहीं नाही, आपलं जरा हे करीत होतों."

"हें करीत होता होय? अस्सं!"

उगीचच इकडच्या तिकडच्या सटरफटर गप्पा काढीत शामराव थोडा वेळ बसला आणि निघून गेला. तो गेल्यावर वसंतानें पुन्हा उशीखालचा कागद काढला.

रोज रात्रीं अभ्यासाला पहाटे उठण्यासाठीं लौकर झोपणारा वसंत आज न झोपता कागदाचे तुकडे करीत टेबलाशीं बसला होता. बऱ्याच वेळानें त्याचें लिहिणें संपलें. दुसरे दिवशीं तो कॉलेमध्यें गेला नाहीं. हो, तिनें ओळख देऊं नका म्हणून सांगितलें आणि आपल्या डोळयांनीं आयत्या वेळीं दगा दिला तर!...

* * *

भाऊसाहेब पाटणकर वकील संध्याकाळच्या वेळीं आपल्या बंगल्या-समोरच्या बागेत येरझारा घालीत होते. चष्म्याच्या वरच्या बाजूला दिसणाऱ्या आठ्याच्या जाळयावरून त्याची मनःस्थिति बरी नसावी हें स्पष्ट दिसत होते. तसें पाहिले तर त्याना बागेचा मनस्वी नाद! त्यांची मुलगी कमल आणि पुतणी कावेरी या कधीकधीं केसात घालण्यासाठीं म्हणून फुलें तोडीत, तेंसुद्धां त्याना खपत नसे. आणि आज ते फिरता फिरतां बेशक एकाद्या झाडाचा पाला ओरबाडीत होते. संध्याकाळच्या थंड वाऱ्यानें त्यांच्या डोक्याचा गरमपणा कमी झाला नव्हता हें निश्चित. जराशानें त्यांनीं आपला प्रशस्त देह तिथल्याच एका वेताच्या खुर्चीवर टाकला आणि ते पुटपुटूं लागले.

"अगदीं माझ्या खात्रीची केस होती; पण तो लाटकर वकील मधें आडवा पडला. मंत्ररच्या तारखा सोडून इथं यायचं काय लेकाचं नडलं होतं! आणि आमचा साक्षीदारहि अगदीच कच्चा! उलटतपासणींत सारं भकला शिंचा!"

'शिंचा' ही भाऊसाहेबाची फार आवडती शिवी. घरातल्या पोरीबाळींना सुद्धा ते या शेलक्या शिवीचा नेहमी आहेर करीत. त्या वेळेस ते 'चा'ची 'ची' करीत. तिसऱ्या वर्गातल्या लोकाच्या तोंडून ही शिवी त्यांनीं कधीं न

ऐकल्यामुळें वरच्या दर्जाच्या लोकांची ही राखीव शिवी असावी अशी त्यांची कल्पना होती. अंधार पडला तरी ते तसेच बसून राहिले. मुली कुठेंतरी बाहेर गेल्या होत्या व बंगल्यांत स्वैपाकघराशिवाय चोंहांकडे सामसूम होती. पलिकडच्या कोपऱ्यात कांहींतरी वाजलें; पण त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. असेल माजरबिंजर. (या मांजरी शिंच्या अशाच!)

पण जेव्हां पावलाचा स्पष्ट आवाज ऐकूं आला तेव्हा ते उठून त्या बाजूला गेले. कोपऱ्यांतल्या खिडकीजवळ कोणीतरी व्यक्ति उभी होती. "कोण आहे तिकडे?" भाऊसाहेब गरजले. ती व्यक्ति चट्दिशीं कंपाउंडच्या भिंतीवर चढली. रस्त्यावर उडी टाकल्याचा 'धप्प' असा आवाज झाला. भाऊसाहेब लगबगीनें फाटकाबाहेर पडून त्या बाजूला गेले. रस्त्याच्या कोपऱ्यावर कुणी-तरी वळताना दिसलें. स्वतःच्या पायांवर पुरेसा विश्वास नसल्यानें पाठलाग करण्याच्या भरीस न पडता ते माघारी फिरले. फाटकात शिरताना समोरच्या चिंचेच्या झाडाखालीं एकदोघाचा हसण्याचा आवाज येतो आहे असा त्यांना भास झाला. पण अंधारात कांहीं न दिसल्यानें ते घरात आले. मुलींच्या खोलींत जाऊन त्यानीं दिव्याचें बटण दाबलें व खिडकीशेजारच्या टेबलावरलीं कांहीं पुस्तकें नेलीं आहेत की काय तें पाहूं लागले. पुस्तकें तशींच पडलीं होतीं; पण टेबलाच्या कोपऱ्यावर त्यांना कागदाची एक घडी दिसली. त्यांनीं तो कागद उलगडून दिव्याजळ नेला.

प्रिय K.

तुझें पत्र मिळालें. प्रेमाच्या सागरांत मी इतका आकंठ बुडून गेलो आहे, कीं स्वर्ग आतां दीड बोटसुद्धा राहिला नाहीं असे मला भासमान होत आहे. (पाताळ शिंचा!) तुला भेटण्याची इतकी उत्कंठा लागली आहे, कीं खांद्याला पंख असते तर किती छान झाले असते असे वाटतें. (कशाला? कंपाउंडवरून उड्या मारायला?) आपल्या कॉलेजमधल्या इंटरच्या क्लासच्या समोरच्या गॅलरींत मी उद्या संध्याकाळीं अंधार पडूं लागल्यापासून तुझी वाट पाहीन. त्या बाजूला त्या वेळीं चिटपाखरूसुद्धां नसतें.

तूं या स्पोर्टस्मनची अंपायरीण आहेस. तूं माझा अध्यक्षीण असून मी तुझा वक्ता आहें. तूं या कवीश्वराची गौरी आहेस. तूं या वसंताची कोकिळा (काळा रंग वजा करून) आहेस. जास्त काय लिहूं?

तुझी चातकासारखी वाट पाहीन. तूं न आलीस तर या वसंताचा ग्रीष्म होईल; तरी ये, ये, ये.

तुझा प्रियकर

**वसंत लाटकर**

शेवटचें नांव वाचतांच विंचवानें नांगी मारल्याप्रमाणें भाऊसाहेब किंचाळले--

"अस्सं काय ! आज एका लाटकरनं माझी केस लाटली आणि हा दुसरा लाटकर माझी पोरगी लाटायला पाहातो काय ? बरं आहे बच्चंजी ! नांवाचा भाऊसाहेब आहे म्हणावं ! आणि पोरी तरी शिंच्या काय बिघडल्या आहेत. पत्र पाठवतात काय त्याला ! पण ही भानगड कुणाची ? कमीची कीं कावेरीची ? तें कांहीं नाहीं. या गोष्टीचा पत्ता लावलाच पाहिजे."

बाहेरच्या बाजूला बोलण्याचा, हसण्याचा व बांगड्याचा असे तीन आवाज एकसमयावच्छेदेंकरून आल्यामुळें भाऊसाहेबानीं ती चिठ्ठी तशीच टेबलावर टाकली आणि त बाहेर आले. मुली परत आल्या होत्या. कुणाशींच कांहीं न बोलता भाऊसाहेब आपल्या खोलींत गेले. कावेरीनें स्वैंपाकघराकडे मोर्चा वळवला आणि कमल खोलींत आली. इकडेतिकडे करतांना तिला ती चिठ्ठी दिसली. ती वाचल्यावर आश्चर्याचा चटकाच बसला तिला. तिच्या वर्गांतला वसंत लाटकर तिला चांगलाच माहीत होता. त्याला सभेत बोलताना आणि नाटकात काम करताना तिने पाहिले होते. ती मनांतल्या मनात, म्हणजे आवाज न करता बोलू लागली.

"मुलगा कांहीं एकंदरीत वाईट नाहीं; पण या कावेरीचं आणि त्याचं संधान कधीं जुळलं ? नाहीतरी ती फारच आतल्या गाठीची. हिनं अशा चिठ्ठ्याचपाट्या पाठवणं, त्याची एका बाजूस गाठ घेणं म्हणजे काय ! दादांना कळलं तर ते आकाशपाताळ एक करतील ! तें कांहीं नाहीं. या गोष्टीचा पत्ता लावलाच पाहिजे."

कावेरीच्या टेबलावर बसून समोरच पडलेल्या एका पुस्तकांत तिनें ती चिठ्ठी घालून ठेवली आणि जेवण करायला निघून गेली.

दुसरे दिवशीं सकाळपासून कमलचें कावेरीच्या हालचालीवर सारखें लक्ष

होतें. तिला आज कावेरी जास्तच उल्हसित दिसली. संध्याकाळीं कावेरीला पातळ बदलतांना पाहून तर तिची खात्रीच झाली.

"कां ग ! कुठं निघालीस ?"

"मैत्रिणीकडे जायचय् एका."

"कोणती मैत्रीण ?"

"आहे एक आपली अशीच !"

कमल आणखी काही विचारणार तोंच भाऊसाहेब खोलींत आले. आज ते कोर्टांतून लवकर परत आले होते. उगीचच हसून त्यांनीं दोघींकडे पाहिलें.

"काय ग पोरींनो! काय चाललय्? आणि कावेरी कुठं निघाली?"

"मैत्रिणीकडे." तोंडावर पावडर फिसकारीत कावेरी म्हणाली. भाऊसाहेबांनीं चष्मा काढून त्याचीं भिंगें सदऱ्याच्या टोकानें पुसलीं. चष्मा पुन्हा नाकावर चढवला, जरा खाकरले, आढ्याकडे पाहिलें, नंतर फरशीकडे पाहिलें, पुन्हा आढ्याकडे पाहिलें आणि एक आवंढा गिळून ते बाहेर गेले. कावेरी बाहेर गेल्यावर भाऊसाहेबांनीं मोटार बाहेर काढायला सांगितली आणि कपडे करून ते बाहेर पडले. कॉलेज जवळ आल्यावर ते खालीं उतरले आणि त्यांनीं शोफरला मोटार घेऊन जायला सांगितलें. जराशाने इंटर आर्ट्सच्या क्लाससमोरची गॅलरी त्याना दिसली. अंधार पडायला अजून अवकाश होता. इकडेतिकडे पहात ते वर चढले. जिन्याच्या खालच्या बाजूला पत्रे लावून तयार केलेली एका लहानशी खोली होती. खोलीचे दार उघडेंच होतें आंत काही घमेलीं, एकदोन फावडीं, एक कुदळ, आणि एक सीमेंटचें पोतें एवढे सामान होतें. आजूबाजूला पाहून ते हळूच आत शिरले. सीमेंटच्या पोत्याच्या मागल्या बाजूला त्यांच्या आकाराला दाटीवाटीनें बसण्याइतकी जागा होती. दार लोटून घेऊन ते तिथें बसले. पत्र्याच्या फटींतून त्याना गॅलरीचा काहीं भाग दिसत होता.

थोड्याच वेळानें गुळगुळीत दाढीचा, सेंटचे फवारे मारून घेतलेला लाटकर एक हातानें सदऱ्याची कॉलर वर ओढीत व दुसऱ्यानें केस चोपून बसवीत तिथें आला. बराच वेळ तो मान व डोळे ताणीत उभा होता. शेवटीं त्याची हृदयदेवता दुरून येतांना दिसली. पत्र्यांच्या फटींतून भाऊसाहेब त्यांचे चाळे पहात होते. थोड्याच वेळांत जिन्यावर पावलें वाजूं लागलीं

आणि कावेरी दिसण्याची अपेक्षा करणाऱ्या त्यांच्या डोळ्यांना कमल दिसली! नाकाचा ओरखडा निघेपर्यंत त्यांनी फटीजवळ डोळे आणले. कमलच होती ती. तिनें इकडेतिकडे पाहिलें. तिला दुसरें कोणीच दिसेना! हें कसें काय? कावेरीला तर घरून निघून बराच वेळ झाला होता आणि अंधारहि पडत चालला होता. ती डोळे विस्फारून लाटकरकडे पहात उभी राहिली. तिला काय बोलावें हें सुचेना! ती आतां आपल्या बाहुपाशात येईल, त्याच्यावर मान टाकील म्हणून लाटकर तयारीनें उभा राहिला होता—तो तिच्या वटारलेल्या डोळ्याकडे पहात तसाच उभा राहिला. आणि आता ते दृश्य दिसेल म्हणून भाऊसाहेबानीं डोळे झाकून परत उघडले तरी तें त्याना दिसेना. इतक्यात जिन्यावर पावलें वाजूं लागली. शिदू माळी आपल्या घोगऱ्या आवाजानें त्याचें एकुलतें एक गाणें म्हणत सावकाश वर येत होता—

"एक दिन जानारे भाई..."

आता काय करायचें? तिघांच्याहि डोळयापुढें एकच प्रश्नचिन्ह उभें राहिलें.

"अगऽबाई, आता?"

पावलाचा आवाज जवळ येऊं लागला. तिनें पत्र्याच्या खोलीकडे पाहिलें व चटदिशीं पुढे होऊन, दार उघडून ती म्हणाली,

"या, इकडे या."

सीमेटच्या पोत्यामागे भाऊसाहेबाची त्रेधा उडाली. ते अंग चोरून गप्प बसले. वसंतनें दार लावून घेतले. दोन घमेलीं पालथी टाकून तीं दोघे त्यांवर बसलीं. अंधार!

शिदबा वर आला. गॅलरीत आसन ठोकून त्यानें आपली चिलीम बाहेर काढली व तो र्तीत तंबाखू भरूं लागला. शिस्तींत चाललें होतें त्याचें. चिलीम पेटल्यावर त्याच्या तोंडातून झुरके आणि ताना बाहेर पडूं लागल्या—

"एक दिन जाना रे भाई-"

आजचा दिवस कसा जाणार ही चिंता आंतल्या तिघांना पडली होती. अशा स्थितींत कांहीं मिनिटें गेलीं. पोत्याच्या वर हळूच डोकें काढून भाऊसाहेब डोळे ताणताणून पहात होते. बराच वेळ तिथें काढल्याने त्यांच्या डोळ्यांना अंधाराची सवय होऊन जरा जरा दिसूं लागलें होतें. लाटकर अंधाराचा आणि

दाटीचा हळूहळू फायदा घेऊं लागला होता. एकमेकांना चिटकून बसलेल्या त्या दोघांना पाहून भाऊसाहेबांच्या अंगाची लाही होत हाती ! ते सीमेंटचें पोतें उचलून त्या दोघांच्या डोक्यांवर रिकामें करावें असें सारखे वाटत होतें त्यांना. इतक्यांत लाटकराचा हात दूर करण्याच्या गडबडींत कमलच्या हातांतल्या बांगड्या वाजल्या. बाहेर बसलेल्या शिदबानें टुण्दिशी उडी मारली व खालीं पडलेली चिलीम उचलून न घेतांच 'हरे राम!' म्हणून खालीं धूम ठोकली. कमल चट्दिशी बाहेर आली आणि म्हणाली,

" चल जाऊं लौकर. ही संधि बरी आहे. तो पुन्हा परत येईल. आटपा."

" मग आतां पुन्हा केव्हा भेटणार ? " तिचा हात धरीत वसंत म्हणाला.

" पुढचं पुढं पहातां येईल ! अगोदर निघा इथून ! "

पांच मिनिटात शिदबा आणि दुसरा एक गडी हातांत कंदील व सोटे घेऊन तिथें आले. आपल्या कोटावरलें सीमेंट झटकीत भाऊसाहेब पायऱ्या उतरत होते.

"बरा सापडला लेकाचा ! अन् ती आवा कुठं हाय् ?"

" कोणची आवा ?" भाऊसाहेब हतबुद्ध होऊन उद्गारले.

" काय थेरं करतोय् बामण ! या माज्या कानानं मीं काकणांचा आवाज ऐकला. कुठं पसार झाली वाटतं ती ! चला थोरल्या साहेबांकडे."

भाऊसाहेबांचा काहीं इलाज चालेना ! शिदबानें आणि दत्तू गड्यानें दोघांनीं त्याचे दंड धरले आणि त्याना प्रिन्सिपॉलच्या बंगल्याकडे चालवलें.

प्रिन्सिपॉलसाहेब आतल्या घरांत बायकोशीं हास्यविनोद करीत जेवण करीत होते. शिदबानें बामणाला नीट धरून ठेवण्याची दत्तूला ताकीद दिली आणि आपण बातमी देण्यासाठीं आत गेला. साहेबानीं घास घेतांघेतां मागें वळून पाहिलें—

" काय रे शिदबा कां, आलास ? "

" ती मागली गॅलरी हाय नी, तिथं मी जरा चिलीम वडीत व्हतों— "

" बरं मग ? "

" तिथली ती घमेल्याची खोली हाय ना, तिथं एक आवा अन् एक बामण काय बी करत बसले व्हते. मी दत्तूला घेऊन जाईस्तवर ती आवा पसार झाली. त्या बामणाला आणलाय् धरून. "

"कुठ आहे तो ?"

"भाएर दत्तूनं धरून ठिवलाय् त्याला."

सुग्रास अन्नाच्या ताटावरून उठणें साहेबाच्या जिवावर आलें होतें. त्यांत प्रिन्सिपॉलीणबाईनीं भर घातली. त्या म्हणाल्या,

"जाऊं द्या, कशाला उठतां आतां. जा रे शिदबा, त्या माणसाला आपल्या गॅरेजमध्यें दे ठेवून आणि कुलूप लावून घे. सकाळीं दे त्याला पोलिसच्या ताब्यांत. किल्ली बाहेरच्या दाराजवळ खिळयाला आहे, जा."

शिदबानें त्याप्रमाणें केलें. गॅरेजचें दार लावून घेतांघेतां तो म्हणाला, "ए बामणा ! बस आता पॉम्पॉम् करीत !"

भाऊसाहेबांच्या कानांत पंचवीस हॉर्नस् एकदम वाजूं लागले !

दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां प्रिन्सिपॉल कपडे करून बाहेर पडले. त्यांना कांहीं कामासाठीं गावांत जायचें होतें.

शोफर अजून आला नव्हता. स्वतःच गाडी काढण्यासाठीं ते किल्ली घेऊन गॅरेजकडे निघाले. शिदबाचा 'रपोट' विसरून गेले होते ते. दार उघडल्यावर घोरण्याचा आवाज आला तेव्हा त्याच्या लक्षांत आलें. त्यानीं गाडींत वाकून पाहिलें तों भाऊसाहेब ! रात्रीच्या आळसाबद्दल स्वतःला शिव्या देत त्यांनीं भाऊसाहेबाना उठवलें व दिलगिरी प्रदर्शित केली. भाऊसाहेब कांहींच बोलले नाहींत. प्रिन्सिपॉलच्या आग्रहावरून त्यांनी बंगल्यांत जाऊन तोंड धुतलें, चहा घेतला व घरीं जाण्यासाठीं त्याच्याच मोटारमधें बसले.

भाऊसाहेब पाटणकरांच्यासारखा गांवातला वजनदार वकील आपल्या कॉलेजमधल्या घमेल्याच्या खोलींत काय येऊन बसतो, त्याच्याबरोबर एक बाई काय असते आणि शिदबाच्या हातांत सापडून त्यांना आपल्या हलगर्जी-पणामुळे रात्रभर गॅरेजमध्ये काय झोपावें लागतें–सगळेंच विचित्र ! मोटार चालवताना प्रिन्सिपॉल विचार करीत होते. एकदा शहानिशा करून घ्यावी म्हणून त्यानी मान वळवून पाहिलें; पण भाऊसाहेबांच्या आंबटढाण चेहऱ्याकडे नजर जातांच सध्या कांहीं न विचारणेंच श्रेयस्कर असें त्यानीं ठरवलें. पाटणकरांचा बंगला येताच त्यांनीं गाडी थांबवली. भाऊसाहेब खालीं उतरले.

" आज दुपारीं मी कॉलेजमधें येऊन सगळं कांहीं सांगेन आपल्याला !" इतकें बोलून ते वळले. मोटार निघून गेली.

त्यांची पत्नी दारांतच उभी होती.

" हें काय ? रात्रीं का नाहीं येणं झालं ?"

उभ्या आयुष्यात गावांतच असून रात्र बाहेर काढण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग ! सौभाग्यवतीला काही संशय तर नाही ना आला ! प्रश्नाचें उत्तर न देतां ते आंत गेले. खोलींत जाऊन ते कपडे उतरतात न उतरतात तोंच कावेरी आंत आली व तिनें एक चिठ्ठी त्यांच्या हातात ठेवली.

" काल कॉलेजमधें एका फाजील मुलानें ही चिठ्ठी माझ्या पुस्तकांत घालून ठेवली. नांव लिहिलं आहे त्यानं स्वतःचं. आणि मीं लिहिलेलं पत्र मिळालं असं लिहिलय् धडधडीत ! निर्लज्ज मेला ! "

भाऊसाहेबांनीं चिठ्ठी ओळखली. तीच होती ती.

" आज दुपारी मी कॉलेजमधें येऊन प्रिन्सिपॉलना सागून करतों त्याचीं व्यवस्था. "

" तें कांहीं नाहीं काका. त्याला अगदीं जन्माची आठवण राहील अशी शिक्षा झाली पाहिजे. तुम्हीं प्रिन्सिपॉलना सागितलं म्हणजे करतील ते. "

" मला तसं कसं सांगता येईल काऊ ! ( लाडकें नांव ) त्याची माझी कुठली इतकी ओळख ! "

" तुम्हाला ते स्वतः मोटारींतून घरीं आणून पोचवतात; आणखी किती ओळख पाहिजे ? शिवाय रात्रीं तुम्ही घरीं आलां नाहीं म्हणजे तुम्ही आणि ते... "

" बरं तें जाऊं दे. सागीन मी त्याना. जा तूं आतां. पण काय ग, कमी काय करते आहे ? "

" झोपली आहे. "

" अस्सं ! "

दुपारीं चार वाजतां प्रिन्सिपालच्या बंगल्यावर जाऊन त्यांनीं त्यांना सर्व काहीं सागितलें. पोटच्या पोरीसंबंधानें तसें काहीं बोलताना पोटात तुटत होतें त्यांच्या. पण स्वतःविषयीं होणारा गैरसमज दूर करणें त्यांना प्राप्त होतें.

"मग आतां या बाबतींत मीं काय करावं असं आपलं म्हणणं आहे?" प्रिन्सिपॉलसाहेबांची पृच्छा.

"आपण सध्यां कांहींच करूं नका. मला एकदां त्या मुलाला समक्ष भेटायचं आहे"

"आतां खोलीवर भेटेल तो. खोली दाखवायला गडी देतों मी आपल्या बरोबर."

गड्यानें भाऊसाहेबांना वसतिगृहांतली लाटकरची खोली दाखवली. दत्तूच होता तो. काल आपण धरून ठेवलेला बामण आज साहेबासंगें चाय-बिस्कूट खातो याचें तिरबागडें त्याला उमगत नव्हतें! भाऊसाहेबांबरोबर चालतांना त्याचे पाय लटपटत होते. खोली दाखवून तो जो निसटला तो ही बातमी सांगायला शिदबाकडे गेला.

वसंत आज खुषींत असल्यामुळें त्यानें शामरावाला व पांडोबाला चहाला बोलावलें होतें. स्टोव्हवर चहाचें पाणी उकळत होतें आणि शामराव व पांडोबा लाटकरच्या आनंदी वृत्तीची मनांतल्या मनांत कारणमीमांसा लावीत होते. इतक्यात भाऊसाहेब आले. त्यांना शामराव ओळखीत होता.

"मला लाटकरांना भेटायचय्!"

"मी—माझं नांव लाटकर, या." वसंत पुढे होऊन म्हणाला.

"मला याच्याशीं जरा बोलायचं आहे. आपण थोडा वेळ बाहेर जाल तर बरं होईल." भाऊसाहेब त्या दोघांना म्हणाले.

"आम्हाला चहा घ्यायचा होता." पांडोबा बोलले. पण पांडोबाचा हात धरून शामरावानें त्याला बाहेर नेलें.

"चहा घ्याल का आपण?" वसंतनें विचारलें.

"मीं आताच प्रिन्सिपॉलकडे चहा घेतला. तें दार लावून घ्या आणि स्टोव्ह बंद करा."

वसंतानें तसें केलें आणि तो त्यांच्यासमोरच्या खुर्चीवर बसला.

"तुमचं नांव मला माहीत आहे, हें तुम्ही पाहिलचं. तुमच्या वाडिलाचं नाव काय? त्यांचा धंदा कोणता? राहाण्याचं गाव कोणतं?"

"आमचं राहाण्याचं गाव मंचर. माझ्या वडिलांचं नांव विनायकराव असून ते मंचरला वकिली करीत असतात."

" आँ... ! परवा एक केस चालवायला इथं आले होते तेच का ? "

" हो. "

भाऊसाहेब विचार करीत थोडा वेळ स्तब्ध बसले. त्यांच्या डोक्यांत एक कल्पना आली -

" तुम्हांला भाऊबहिणी किती आहेत ?"

" कोणी नाहींत. मी एकटाच."

" स्थावर इस्टेट किती आहे तुमची ?"

" इथं डेक्कन जीमखान्यावर एक बंगला आहे. मंचरला एक घर आणि दोन मोसंब्याच्या बागा आहेत. "

वसंतला वाटलें, हा म्हातारा आतां आपल्याला गोत्र विचारणार. पण तसें कांहा न विचारतां भाऊसाहेब म्हणाले,

" लग्नासंबंधीं काय मतं आहेत आपलीं ? "

" म्हणजे !"

" म्हणजे असं, कीं तुम्ही वडिलांनीं पसंत केलेल्या मुलीबरोबर लग्न करणार कीं तुम्ही पसंत केलेल्या मुलीशीं लग्न लावून द्यायला त्यांना सांगणार ?"

आपल्याला भेटायला आलेल्या या प्रतिष्ठित गृहस्थाबद्दल प्रथम वसंतला बराच आदर वाटला होता. पण त्याच व्यक्तीचा आपले पाय धरायला आलेला मुलीचा बाप झाल्याबरोबर त्याची भाऊसाहेबाकडे पहाण्याची दृष्टि बदलली आणि सरळ " माझी एक मुलगी आहे, तिला पहायला याल का ? " असें लाचारीनें विचारण्याऐवजीं हा म्हातारा आडवेतिडवे प्रश्न टाकायला लागलेला पाहून त्याच्या अंगात वरपक्ष शिरला. खुर्चीवर मागें रेलून तो म्हणाला.

" आपण काय म्हणतां तें समजलं मला; पण त्याचं उत्तर देण्यापूर्वी मला आपल्याला कांहीं विचारायचं आहे. आपलं नाव काय ? तसंच धंदा ! "

" त्याच्याशीं तुम्हांला काय करायचं आहे ?"

" आपली मुलगी किती शिकली आहे ? वय काय ? "

" तें कांहीं एक सांगायची माझी इच्छा नाहीं ! " भाऊसाहेब खवळून म्हणाले.

" मग माझीहि माझं लग्नासंबंधीचं मत सागण्याची इच्छा नाहीं."

भाऊसाहेबांच डोकें रागानें भिरभिर करू लागलें. कांहीं न बोलतां ते जाण्यासाठी उठले; पण जातांजातां म्हाताऱ्याला चीत करावं म्हणून वसंतनें सांगितलें.

" माझ्या नादाला आपण न लागणच बरं. कारण माझं लग्न ठरलं असून ते लवकरच होणार आहे !"

गोता बसलेल्या पतंगाप्रमाणें भाऊसाहेबानी गिरकी घेतली. फट्दिशी त्यांनीं विचारले,

" लौकरचं म्हणजे केव्हां ?"

" दोनचार दिवसात." वसंत गंभीरपणें म्हणाला.

" तुमच्या वडिलाच्या संमतीन की–"

" वडिलाचा लग्नाच्या बाबतीत काय संबंध? माझं मीच करणार आहे."

" मुलगी कोणती ?"

" आहे अशीच–"

" तिच्या बापाला तरी हें माहीत आहे कीं नाहीं?"

" छे! सगळं चोरून. तिनं बापाला चांगलंच बनवलं आहे."

संतापाने भाऊसाहेब सोड्याच्या बाटलीप्रमाणें फसफस करूं लागले व नेहमीच्या सवयीप्रमाणें त्यांनीं हातातली काठी जोरात फिरवायला सुरवात केली. खोलीच्या मधें टांगलेला ग्लाब आणि आपली काठी याची गाठ पडली तर काय होईल हा विचार करायला त्यांच्या डोक्यात जागा नव्हती; पण गाठ पडलीच तर काय होते हे मात्र त्याना दिसले. वसंतला काचा गोळा करायला ठेवून त्यानी धाड्दशी दार उघडले आणि जोराने पादत्राणें वाजवीत ते निघून गेले.

शामराव आणि पाडोबा एकमेकाच्या तोंडाकडे पहात आपल्या खोलीत बसले होते. मधूनमधून भाऊसाहेबाचे गुरगुरणे त्याना अस्पष्ट ऐकू जात होते एवढेंच. दाराचा आवाज होण्यापूर्वी झालेल्या 'छो' आवाजाची मीमांसा शामरावाने काय लावली होती कोण जाणे; पण पाडोबाचा चेहरा मात्र घामाने तेलिया होत चालला होता. दोघेहि स्तब्ध होते. जराशाने वसंत आला. त्याला सायसगीत दारात उभा पाहून पाडोबाने 'हुश्श' केलें. वसंत बोलू लागला,

'मी हाडाचा फार सच्चा माणूस आहे. एकदा एखाद्याला शब्द दिला कीं मग तो दिला; माघारीं घ्यायचा नाहीं. मघा मी तुम्हांला चहा देईन म्हणालों होतों. देईन म्हणजे देणार होतों; देणार होतों म्हणजे करणार होतों; करणार होतों म्हणजे करणार आणि देणार होतों म्हणजे देणार. चला."

वसंतच्या खोलींत शिरल्यावर फरशीवर एका कागदावर गोळा करून ठेवलेल्या ग्लोबच्या काचा दिसल्या तेव्हा पांडोबाच्या लक्षात आलें. त्या फुटक्या दिव्याने त्याच्या डोक्यात प्रकाश पडला.

"त्या म्हाताऱ्यानं मला फुकट बारा आण्यांचा खर्च आणला!" स्टो पेटवतां पेटवतां वसंत कुरकुरला.

"काय म्हणत होते वकीलसाहेब?" पांडोबांनीं विचारलें.

"कोणते वकीलसाहेब?"

"ते पाटणकर वकील. आतां आले होते ते!"

वसंतानें आश्चर्यानें आ वासला. पुन्हा विचारून त्यानें खात्री करून घेतली आणि मघाच्या ग्लोबचा एखादा तुकडा तर आपल्या डोक्यांत शिरला नाहीं ना, अशी त्याला शंका येऊं लागली. कांहीं न बोलता त्यानें स्टो बंद केला आणि आरामखुर्चीवर तो स्वस्थ पडून राहिला. आपण आपल्या सच्चेपणाला हरताळ फाशीत आहोत, हें त्याच्या ध्यानात आलें नाहीं. दुसऱ्यांदा चहाला मुकलेली ही दुकल परत आपल्या खोलींत आली. शामरावानें पांडोबाच्या डोक्यावर एक टप्पल मारली आणि तो म्हणाला,

"तूं अगदीं महामूर्ख आहेस पांडोबा!"

पांडोबालाहि तें पटलें!

त्यानंतर सुमारे तीन तासांनी भाऊसाहेबांची मोटार मंचरमधे विनायकराव लाटकर वकिलांच्या घरापुढें थांबली. विनायकराव पाटावर बसण्याच्या तयारीत होते. भाऊसाहेब पाटणकर वकिलाना भलत्याच वेळीं आपल्या घरीं आलेले पाहून त्याना आश्चर्य वाटलें! त्यांनी त्यांचे योग्य ते आदरातिथ्य केलें. जेवण करून दोघे माडीवर जाऊन बसल्यावर भाऊसाहेबांनीं अथपासून जी सुरवात केली ती इतीपर्यंत! चिरंजिवाच्या हातची ती चिठ्ठी पाहून आणि भाऊसाहेबांच्या तोंडून त्याचा चार दिवसात लग्न करण्याचा बेत ऐकून लाटकर वकिलाच्या तोंडाला बुडबुडा आला. मध्यरात्रींपर्यंत

दोघांहि बापांचा खल चालला होता. सकाळीं उठून भाऊसाहेब पुण्यास आले.

दुसरे दिवशीं सकाळी अकरा वाजतां वसंत लाटकर कॉलेजमध्यें जाण्याच्या तयारींत असताना भाऊसाहेबांच्या गड्यानें त्याच्या हातांत एक पाकीट दिलें. त्यानें पाकीट फोडून वाचलें—

अनेक आशीर्वाद वि. वि.

काल संध्याकाळीं आपल्या खोलीवर भेटावयास आलेले श्री. भाऊसाहेब पाटणकर रात्रीं मचरला येऊन मला भेटले. तुम्हीं त्यांच्या मुलीला पाठविलेलें पत्र त्यानीं मला दाखवलें. तें वाचून डोळयांचे पाग फिटले! आपल्या चिरंजिवांचे असले पराक्रम पाहून कोणत्या बापाला धन्यता वाटणार नाहीं!

तुम्हां दोघांच्या मुलाखतीचा सर्व भाग त्यानीं मला सांगितला.

कोणत्याहि बाबतींत मी तुम्हाला आतापर्यंत पूर्ण स्वातंत्र्य दिलें असूनसुद्धा लग्नाच्या बाबतींत मी तुमच्या मनाविरुद्ध जाईन असें आपल्याला कां वाटावें हें समजत नाहीं! लग्नासाठीं माझ्या संमतीचीसुद्धा तुम्हाला जरूर वाटत नाहीं! एवढेंच नव्हे, तर लग्नसमारंभाला आम्ही हजरहि राहूं नये असें आपल्याला कां वाटावें? असो. आपली इच्छा नसली तरी आम्ही लग्नाला हजर राहाणार आहोत.

आपल्या प्रेमाच्या उपद्व्यापामुळें माझें हुंड्याच्या बाबतींत अपरिमित नुकसान झालें आहे. भाऊसाहेब पाटणकरांसारखें कुळ. मोसंबीची एक बाग सहज उठली असती.

सोबत लग्नपत्रिकेचा मसुदा पाठवला आहे. तो लगेच छापखान्यांत टाकून छापून घ्यावा. मी उद्यां पुण्यास येईन. बाकीची मंडळी परवा येतील. कळावें.

आपला

**वि. के. लाटकर**

पत्र वाचल्यावर वसंताच्या भोंवतीं जर नुसती रेसिडेन्सीच गरगर फिरूं लागली असली तर दुसऱ्या दिवशीं त्यानें शामरावाच्या व पाडोबाच्या हातांत लग्नचिठ्ठ्या ठेवल्यावर त्याच्या भोंवतीं काय फिरूं लागलें असेल?

## पुणेरी भेळ : : : ८

शामराव गोरे म्हणजे एक सव्यसाची लेखक होता. " त्याने काय लिहिलें आहे ? " असे विचारण्याचे जर तुम्ही धाडस केले, तर " त्यानें काय लिहिलें नाही ते विचारा ! " असे मी म्हणेन. कॉलेजमध्ये नांव दाखल केल्यापासून त्याचें हे चवथे वर्ष. या चार वर्षात त्याने कागदाचीं किती रिमे खराब केली होती याचा अंदाज लागणे कठीण आहे. त्याचा दोस्त पाडोबा काळे याच्याबरोबर उनाडक्या करण्यात त्याचा जो वेळ गेला त्या-व्यतिरिक्त लेखनाशिवाय त्यानें दुसरें कांहीच केले नाही.

शारदा मंदिराच्या दालनातील मानाची जागा काबीज करण्याच्या गडबडींत पहिल्याच वर्षाच्या परिक्षेच्या उंबऱ्यावर त्यानें धडाधड तीन ठेचा खाल्ल्या असल्यास त्यात नवल तें काय ? पहिल्या वर्षी त्यानें कविता लिहायला सुरुवात केली हे मीं न सागताच तुम्ही ओळखले असेल. आजू-बाजूला होत्यानव्हत्या तेवढ्या विषयांचा पिट्टा पाडल्यावर पुढल्या वर्षी त्यानें नाट्यछटेच्या प्रदेशात पदार्पण केलें. तिसऱ्या वर्षी ओघानेंच लघुकथ आल्या. आणि या वर्षी तो काय लिहीत असेल अशी तुमची कल्पना आहे ?— बरोबर ! कादंबरी ! पुढल्या वर्षी नाट्यदेवीच्या पायावर डोके आपटण्याचा त्याचा संकल्प आहे.

पण झाडून साऱ्या संपादकांचें आणि त्याचें हाडवैर असल्यामुळें त्याच्या कवितांचे कपटे आणि लघुकथाची भेंडोळीं जशीं जात तशींच परत येत; नाहींतर मध्येंच गडप होत असत. नाही म्हणायला कॉलेजच्या मॅगेझिनमध्यें त्याचें नाव एकदोनदां छापलें गेले होतें, तेवढेच ! आता त्याच्यापुढें एकच मार्ग शिल्लक राहिला होता. आणि तो म्हणजे आपलें लिखाण स्वतःच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा. पण ती गोष्ट स्वप्नातहि आणणे शामरावाला शक्य नव्हते. पैशांच्या बाबतीत राघोपंतांची—त्याच्या वडिलाची—मूठ किती आवळ होती, याची त्याला पदोपदी जाणीव होत होती. कॉलेज मॅगे-झिनमध्यें त्याची कविता पहातांच राघोपंतांनी किती आकाडतांडव केले होतें

याची त्याला पुरेपूर आठवण होती. या सर्व गोष्टींमुळें शामरावाचा लिहिण्याचा उत्साह अलीकडे बराच मावळत चालला होता. पण योगायोग म्हणतात तो यालाच ! आकाशातून पडल्याप्रमाणें त्याचें पुस्तक छापलें जाण्याचा योग आला. त्याची हकीगत अशी :—

एक दिवस राघोपंतानीं त्याला हाक मारली व ते म्हणाले, " अरे शामू, मला जरा तुझ्याशीं बोलायचं आहे. वर ये. " शामराव माडीवर गेला. " असा समोर बैस– " असे त्यानी सांगताच शामराव पालथी मांडी घालून त्याच्यासमोर बसला. राघोपंत लोडाला टेकून बसले होते. नेहमींप्रमाणें आज त्याच्या आजूबाजूला जमाखर्चाच्या लाल वेष्टणाच्या वह्या उघडलेल्या दिसत नव्हत्या. तपकिरीची एक जर्गी चिमूट नाकात कोंबून ते बोलूं लागले, " तूं इतक्या गोष्टी अन् कविता खरडीत बसतोस; पण त्या छापून कशा येत नाहीत कुठं ? मासिकाना पाठवीत नाहींस का ? "

आपल्याला येत असलेल्या परतभेटीचें टपाल पूर्ण माहीत असूनहि दादा असें काय विचारतात तें शामरावाला उमजेना ! तो काहीच बोलला नाहीं. राघोपंतच पुढे म्हणाले, " तुझ्या गोष्टींचं आणि कवितांचं एक पुस्तक छापून टाकावं असा माझा विचार आहे. "

शामरावचा आपल्या कानावर विश्वासच बसेना ! डोळे विस्फारून तो त्यांच्याकडे पहातच राहिला.

" तुला कसा काय वाटतो हा बेत ? "

" तुमच्या मनांत असेल तर माझी कांही ना नाही ! " हें त्याचे आज्ञाधारकपणें दिलेले उत्तर.

" या वर्षी तूं पुस्तक छापून काढ. मी देईन पैसे तुला. पण माझ्या काहीं अटी आहेत; त्या तू पाळल्या पाहिजेस. "

काहींतरी ज्ञानोबाची मेख आहे हे शामरावानें ओळखलें होतेंच ! पण असतील नसतील तेवढ्या अटी पाळायला त्याची एका पायावर तयारी होती. राघोपंतानी शामरावला घातलेल्या अटींचा मसुदा खाली दिला आहे—

१ या वर्षी परीक्षा पास व्हायला पाहिजे. त्याखेरीज छापखान्याची पायरीहि चढतां येणार नाही.

२ पुस्तकावर लेखक म्हणून शामरावानें आपले नांव घालायचें नाहीं. काहींतरी काल्पनिक नांव घालावें. प्रकाशक म्हणूनहि एखाद्या काल्पनिक संस्थेचें नांव द्यावें.

३ इथून पुढे कसलेंहि 'लिखाण' करणार नाहीं अशी देवघरातल्या बाळकृष्णाच्या लगड्या पायावर हात ठेवून शपथ घ्यायला पाहिजे.

४ पुस्तकाच्या छपाईचा खर्च दोनशे रुपयाच्या पुढें सरकूं नये. एक पैहि जास्त मिळणार नाहीं.

कोणत्याहि माडलिकाला पाळतां न येईल असा तहनाम्याचा हा मसुदा ऐकून शामरावचें काळीज कलकलूं लागले. तो बराच वेळ बापाच्या पाठीमागच्या लोडाप्रमाणें स्तब्ध होता. त्याच्या डोळयापुढे फिल्म मधेंच तुटल्यानंतर भासतो तसा अंधार पसरला होता. राघोपंतांच्या हाकेनेंच त्याला जागें केलें.

"शामू, अगोदर पहिल्या अटीचा काय तो निकाल लाव. मग पुढं पाहूं. दोनशें रुपये बाजूला काढून ठेवतो मी!" कोणता बाप आपल्या मुलाचें इतकें कौतुक करणार आहे?

एखाद्या बड्या माणसानें आपल्याला नमस्कार केला आहे असें वाटून आपण हात जोडावेत आणि नंतर तो इसम डोकें खाजविण्यात अगर नाकावरली माशी उडविण्यात गुंतला आहे असें कळून यावें किंवा वर्गातल्या एखाद्या सुंदर मुलीनें हसतहसत पाहून आपल्याला थांबण्याची खूण करावी आणि पाठीमागून येणाऱ्या सायकलस्वारानें खालीं उतरून तिच्याशीं बोलत उभें राहावें तसें शामरावाला झालें. आपलें पुस्तक छापून तयार झालें आहे, वर्तमानपत्रें आणि मासिकें यातून उत्तमोत्तम अभिप्राय आले आहेत, "मराठी वाङ्मयाच्या क्षितिजावर हा नवा दैदिप्यमान तारा उदयाला आला आहे." असा जिकडे तिकडे आपला बोलबाला झाला आहे–वगैरे दृश्यें त्याच्या डोळयापुढून सरकूं लागलीं न लागलीं तोंच राघोपंतांच्या अटींच्या चौकडीनें त्यांचा चक्काचूर केला! पेंगळलेल्या पायानीं तो पाडोबाकडे निघाला. असल्या आणीबाणीच्या वेळीं त्याचा सल्ला घ्यायलाच पाहिजे.

त्याच्या घरापासून रेसिडेन्सी कितीतरी लांब होती. पायीं चालणें त्याच्या अगदीं जिवावर आलें होतें. मोटार सायकलवरून फट्फट् करीत,

सारा रस्ता गर्जून सोडीत जावें ही त्याची फार दिवसाची मनीषा होती. यापूर्वी तो सायकलवरून भटकत असे; पण त्या सायकलनें गेल्याच महिन्यांत एका फटफटीशी टक्कर दिल्यामुळें तिनें काम देण्याचें नाकारलें होतें. स्वतः शामराव त्यांतून सायसंगीत शिल्लक राहिला होता हेंच नशीब ! मोठ्या मेटाकुटीनें राघोपंत त्याला दुसरी सेकंडहॅंड सायकल घेऊन द्यायला तयार झाले होते; पण त्या फटफटीवर सूड घेण्यासाठी म्हणूनच की काय, शामरावनें आता पण केला होता, की बसेन तर फटफटीवरच, नाहीतर पायीं चालेन. त्या पणाचा त्याला आता पश्चात्ताप होत होता. पण 'पण' तो पण ! आता माघार घ्यायची नाहीं ! हा आपला निश्चयी स्वभाव बापापासूनच उतरला आहे हे त्याला पूर्णपणें माहीत होते. राघोपंतांनीं घातलेल्या चार अटीच्या चाकोरीशिवाय आपल्या पुस्तकाची गाडी पुढे जाणार नाहीं अशी त्याची खात्री होती.

पाडोबाचा सल्ला घेऊन त्याने शेवटीं ठरवलें, की पुस्तक हें काढायचेंच ! आपण लिहिलेल्या कविता अन् गोष्टी छापून झालेल्या पाहणें हेहि कांहीं थोडेथोडकें नाही. आणि त्यासाठी तो पहिल्या अटीचा निकाल लावण्याच्या तयारीला लागला. परीक्षा पास होण्यासाठीं त्याला लागलेली जबरदस्त तळमळ अशी ही पहिलीच ! प्रथम त्यानें परिक्षेला कोणतीं पुस्तकें आहेत याची चौकशी केली. घरीं जी सापडली त्याच्यावरली धूळ झटकली नी बाकीचीं त्याने पैदा केलीं. प्रत्येक विषयाला एक वही करून सर्व तासांना तो न चुकता बसू लागला. पण शेवटी जे व्हायचें तेंच झालें ! म्हणजे नेहमीं जसे पेपर जात तसेच गेले !

आता काय करायचें ? पुस्तकाची प्रेसकॉपी तर त्याने केव्हाच तयार केली होती. आणि ते छापायचे म्हणजे छापायचे ! आणि छापायचे म्हणजे पास व्हायचे ! पास होण्याचा लिहिलेल्या पेपराशीं तितका संबंध असतोच असे नाही. परीक्षा सरल्यावर सुमारे आठ दिवसानीं चेहरा शक्य तितका पाडून इंग्लिशच्या प्रोफेसरना भेटायला तो गेला. तो कशाला आला आहे हे ताडून त्यानीं अजून पेपर न तपासल्याची नेहमीची सबब (खोटी) सांगितली. शामरावने आपलें घरून तयार करून आणलेलें भाषण साभिनय म्हणून दाखविलें.

**भाषण**–"सर, माझे बाकीचे सर्व पेपर अतिशय उत्तम गेले आहेत. त्यांत बहुतेक डिस्टिंक्शनचे मार्क पडतील अशी माझी अपेक्षा आहे. फक्त तुमच्याच पेपरच्या दिवशी मी नर्व्हस झालो. शिवाय माझी तब्येतहि त्या दिवशी चांगली नव्हती. आणि परीक्षेची ही माझी चौथी खेप. या खेपेला नापास झालों, तर वडील मला कॉलेजमधे पायहि ठेवूं देणार नाहीत. माझ्या आयुष्यचें नुकसान होईल. माझें कायमचें कल्याण करणें सर्वस्वी तुमच्याच हातांत आहे."

**अभिनय**– रडवी सुरत. डोळ्याना पाणी आणण्याचा शक्य तो प्रयत्न करणें. अडखळत थाबून बोलणे. 'आयुष्याचे नुकसान' या शब्दप्रयोगाच्या वेळीं एक हुंदका. भाषण संपल्यावर शेवटी पायावर डोके ठेवून नुसते 'सर–सर' असें म्हणणें.

प्रोफेसरानीं आश्वासन दिल्यावर त्यांचे आभार मानून शामराव बाहेर पडला. आळीपाळीने सर्व परिक्षकांच्या घरी जाऊन त्याने हेच नाटक केलें आणि पाडोबाला येऊन सांगितले, "चीत मारलं सगळ्याना!"

रिझल्टच्या दिवशी राघोपतांनीं पांच आण्याचे पेढे वाटले.

कंपनीच्या अमदानीत कलकत्त्याच्या मलमल विणणाऱ्या कलावंतांना त्यांचे आंगठे तोडले जात असताना जे दुःख झाले असेल, त्याची कल्पना शामरावला बाळकृष्णाच्या पायांवर हात ठेवून पुढे कांहीं लिखाण न लिहिण्याची शपथ घेताना आली. नतर छापखान्यातले कपॉझिटर नामक प्राणी त्याच्या लिखाणाचे खिळे जुळवूं लागले. दिवसाचे बारा तास छापखान्यात घालवूं लागलेल्या शामरावाला त्यांना शांतपणे खिळे जुळवितांना पाहून फार आश्चर्य वाटलें. आपल्या जोरदार लिखाणाचे धक्के प्रथम या लोकांना बसतील अशी त्याची कल्पना होती!

आपल्या पुस्तकाला त्याने मोठे चुरचुरीत नाव ठेवलें होतें–"पुणेरी भेळ!" नुसते नाव वाचूनच रसिकाच्या तोडाला पाणी सुटायला पाहिजे. आणि तसे ते नाव साजूनहि दिसण्यासारखे होते. कारण पुस्तकात कविता होत्या, लघुकथा होत्या, कादंबरीचीं दोन प्रकरणं होतीं. एवढेंच नव्हे तर गेल्या वर्षी त्याने बलभीम प्रासादिक मेळयाला करून दिलेलीं तेरा पदें आणि दोन संवादहि त्यांत होते! एकाच पुस्तकात इतकी 'व्हरायटी'! आणखी काय पाहिजे? राघोपंतानी घातलेल्या दुसऱ्या

अटीच्या अन्वयें पुस्तकाच्या मुखपृष्ठावर "लेखक—भडभुजा. प्रकाशक—चुरमुरे वाटाणे आणि कंपनी, पुणें." असें छापलें गेलें.

राघोपंतानीं छापखान्याचें बिल बिनबोभाट भागवलें. पांचशे प्रतींचे गठ्ठे छापखान्यातल्या नोकरानें घरीं आणून टाकल्यावर बापलेक त्याच्याकडे पहात उभे राहिले. दाढी खाजवीत खाजवीत राघोपंतानीं विचारलें, "आतां याचं काय करणार?" मेळवाला तरी हे मेळीचे कागद घेईल कीं नाहीं याची त्याना शंका होती.

"विक्रीस ठेवणार." शामरावानें ठासून उत्तर दिलें.

पुस्तक छापायला परवानगी दिली. त्या दिवशींची स्फूर्ति राघोपंतांच्या अंगात संचारली. तपकीरीच्या डबीवर उजव्या हाताच्या अंगठ्याजवळचें बोट आपटीत ते म्हणाले, "शामू, या पुस्तकांच्या विक्रीचे जे पैसे येतील त्यातला एकहि मी घेणार नाहीं. ती तुझी कमाई. त्यांतून तूं तुला पाहिजे ती फटफटी कीं चटचटी मोटार खुशाल विकत घे. आता सायकलला मात्र पैसे मिळणार नाहींत! आणि हे गठ्ठे माझ्या डोळ्यासमोर नकोत! तुझ्या खोलींत ठेवून दे.'

आपल्या पुस्तकाचें एकहि पान उघडून वडिलानीं वाचूं नये याची शामरावाला खंत वाटली. 'पुणेरी मेळ' ऐवजीं 'तपकीरीची डबी' असें नाव दिले असते तर कदाचित् असा अनुभव आला नसता! त्यानें पुस्तकांचे गठ्ठे उचलून आपल्या खोलींत नेऊन ठेवले. त्यांतून एक पुस्तक काढून त्यावर "प्रिय मित्र पाडुरंग खंडेराव काळे यास–मित्र प्रेमाची भेट–शामराव गोरे." असे लिहून ती प्रत पाडोबाला देण्यासाठीं तो बाहेर पडला. एवढी मोठी उन्हाळ्याची सुट्टी, पण शामरावाच्या पुस्तकाचा खटाटोप करण्यासाठीं पाडोबा गावीं न जाता मुद्दाम पुण्यातच राहिला होता

आज पायी चालताना शामरावाला वाईट वाटत नव्हते. कारण लौकरच पाडोबाला पाठीमागे बसवून आपण मोटारसायकलवरून गावभर हिंडू असा त्याला भरवसा वाटत होता. पण त्याच्या या आशेवर पाडोबानें विरजण घातलें. पाडोबाचा एक मामेभाऊ चागला प्रसिद्ध लेखक होता आपल्या नवीन कादंबरीच्या कांहीं प्रती त्यानें पाडोबाजवळ पुण्यांत खपवण्यासाठीं म्हणून दिल्या होत्या. सारे बुकस्टॉल्स पालथे घातले तरी पुरे पाच रुपयेहि पाडोबाच्या खिशात पडले नव्हते. ती हकीगत ऐकल्याव शामरावचे हातपाय गळाठले! पण तो कच्च्या दिलाचा आदमी नव्हता आणि त्याच्या डोक्यात घुमणारा 'फट्फट्' आवाज त्याला स्वस्थ बसूं देईना

दुसऱ्या दिवसापासून त्यांची मोहीम सुरु झाली. पांडोबानें पुस्तकाच्या प्रत्येक दुकानांत जाऊन ‘पुणेरी भेळ’ पुस्तक मागितलें. दुकानदारानें ‘नाहीं’ म्हणून सांगतांच त्यानें आश्चर्यानें चेहरा विचकून म्हणावें, “काय? ‘पुणेरी भेळ’ पुस्तक तुमच्या दुकानात नाहीं! आश्चर्य आहे! एका अतिशय मोठ्या लेखकानें गंमत करण्यासाठीं म्हणून ‘भंडभुजा’ हें नांव घेऊन हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, असें म्हणतात. मी उद्यापरवा पुस्तक घ्यायला येईन. तोंपर्यंत आणून ठेवा.

शामरावाच्या गल्लींतील काहीं माणसांनीं व वर्गातील काहीं विद्यार्थ्यांनी प्रत्येक दुकानात हिंडून ‘पुणेरी भेळ’ची मागणी केली आणि ‘आणून ठेवा’ म्हणून सांगितलें. एक एक प्रत ‘सप्रेम भेट’ म्हणून देण्याची त्यांना शामरावानें लालूच दाखवली होती.

अशा रीतीनें पार्श्वभूमि तयार झाल्यावर एक दिवस पुस्तकांची पिशवी भरून घेऊन शामराव पुस्तकांच्या दुकानांत फिरूं लागला. चुरमुरे वाटाणे आणि कंपनीचा सेक्रेटरी अशी त्यानें स्वतःची ओळख करून दिली. तें पुस्तक पहातांच दुकानदारांनीं कुणीं पांच तर कुणीं दहा अशा प्रती खरेदी केल्या. दोन दिवसांत शामरावाचा खिसा ३७ रुपयांनी खुळखुळूं लागला.

मुंबईच्या एका प्रमुख बुकसेलरला त्या आठवड्यांत निरनिराळया हस्ताक्षरांतलीं २०-२२ पत्रें मिळालीं. काहीं साताऱ्याहून, कांहीं कोल्हापूराहून अशीं तीं पत्रें आलीं होतीं. त्यांत कांहीं पुस्तकालयाचीं कांहीं पुस्तकविक्रेत्यांचीं आणि कांहीं साधीं होती. साऱ्या पत्रानीं एकमुखानें ‘पुणेरी भेळ’ ची मागणी केली होती. पुस्तक अजून विक्रीला न आल्यामुळें त्या दुकानदाराला मोठा पेच पडला होता. पण एक दिवस हमालाच्या डोक्यावरून पुस्तकांचे गठ्ठे उतरून घेऊन एक गोरेलासा मुलगा दुकानात आला आणि त्यानें ‘पुणेरी भेळ’ हें पुस्तक बाहेर काढलें, तेव्हा त्या दुकानाच्या मालकाला हायसें वाटलें. पण तसें काहीं न दाखवतां तो तें पुस्तक चाळीतचाळीत म्हणाला, “कुणी लिहिलं आहे हें पुस्तक? हा भडभुंजा कोण?”

“लेखकानें मला त्याचं नाव गुप्त ठेवायला सांगितलं आहे. ते महाराष्ट्रांतले एक अत्यंत सुप्रसिद्ध लेखक आहेत एवढंच मी तुम्हाला सागतों.” शामराव गंभीरपणें उद्गारला.

" पुणेरी मेळ काय ! विनोदी दिसतय् पुस्तक !"

" हं."

" बरं ! काय कमिशन द्यायला सांगितलय् त्यांनी !

" चाळीस टक्के."

" आं !" मालक आश्चर्याने उद्‌गारले. पण लगेच त्याना आपली चूक कळून आली. चाळीसच टक्के म्हणून ते कुरकुरणार इतक्यांत शामराव म्हणाला, " पण त्यांची एक अट आहे."

राघोपंतांनाच अटी घालण्याचा कुणीं मक्ता दिला होता असं थोडंच आहे !

" कोणती ?"

" या तीनशें प्रति त्यांनीं पाठविल्या आहेत. पुस्तकाची किंमत फक्त एक रुपया आहे. या सगळ्याच्या सगळ्या प्रति एकदम रोख घेणार असलां तर चाळीस टक्के. किरकोळ घ्यायच्या असल्या तर पंधरा टक्यांच्या वर काहीं-सुद्धा द्यायचं नाहीं. असं त्यांनीं मला बजावून ठेवलं आहे."

मालक कुरकुर करूं लागतांच शामरावानें गठ्ठे उचलून परत घेऊन जाण्यासाठीं दुकानाच्या ओट्यावर जाऊन 'ए हमाल !' म्हणून हांक मारली. पण हमाल न येतां एक खाकी पोषाखातला तारवाला दुकानांत शिरला व त्यानें मालकाच्या हातांत दोन तारा ठेवल्या. मालकानें सही केली व तो तारा वाचूं लागला. तारवाला निघून गेला. शामराव ओट्यावर उभा राहून हमालाच्या नावानें शंख करीत होता. बडोद्याच्या व नागपूरच्या बुकसेलरां कडून आलेल्या त्या तारा वाचताच मालक घाईघाईनें बाहेर आला व शामरावाच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, " अहो मिस्टर, जरा आंत या. हमालाला बोलावण्याची काहीं जरुरी नाहीं."

थोड्या वेळानें १८० रुपयाच्या नोटा निष्काळजीपणानें खिशांत ठेवीत शामराव बाहेर पडला. रस्त्याच्या कोपऱ्यावर मघाचा तारवाला उभा होता त्यानें शामरावाला खूण केली. शामरावानें त्याच्या खांद्यावर हात ठेवल आणि तो म्हणाला,

" फत्ते ! चल, ती ट्राम पकडूं !"

" त्याला म्हणावं, बस आता चुरमुरे खात." ट्रामची दांडी धरून चढता चढतां 'तारवाला' म्हणाला.

★

# आमचें प्रकाशन

★

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | तीन मुलें | ( कादंबरी ) | साने गुरुजी | २—८—० |
| २ | क्रांति | ,, | ,, | ३—०—० |
| ३ | स्त्रीजीवन भाग १ व २ | | ,, | ३—०—० |
| ४ | राष्ट्रीय हिंदुधर्म | | ,, | २—०—० |
| ५ | समाजधर्म | | ,, | ०-१२—० |
| ६ | समाधीवरील फुलें | ( कथा ) | वि. स. खांडेकर | २—०—० |
| ७ | आवा | ( कादंबरी ) | वि. वि. बोकील | ३—०—० |
| ८ | मंगळागौरीच्या रात्रीं | ,, | ,, | २—८—० |
| ९ | अत्तराचे दिवे | ,, | ,, | १—८—० |
| १० | मीना-नीना | ( नाटक ) | ,, | १—०—० |
| ११ | माईची माया | ( नाटिका ) | ना. धों. ताम्हनकर | १—०—० |
| १२ | बोलघेवड्या | ,, | ,, | ०-१२—० |
| १३ | कडू साखर | ( कथा ) | ग. ल. ठोकळ | १—८—० |
| १४ | सुगंध | ,, | ,, | २—४—० |
| १५ | मीठ भाकर | ( काव्य ) | ,, | १—०—० |
| १६ | सुगी | ,, | ,, | १—४—० |
| १७ | काव्यकलेचे अंतरंग | ( प्रबंध ) | के. नारखेडे | २—०—० |
| १८ | जागत्या छाया | ( कथा ) | अनंत काणेकर | २—०—० |
| १९ | चौफुला | | आचार्य भागवत | १—०—० |
| २० | समाज आणि समाज सेवा | | काका कालेलकर | १—०—० |
| २१ | मानलेलीं मुलें | ( कथा ) | मा. भ. मंदुरकर | १—८—० |
| २२ | पांढरपेशांचे जग | | श्री. ज. जोशी | १—८—० |

★

: प्रकाशक :

द. र. कोपर्डेकर,

५२९ सदाशिव पेठ, पुणें २.